

# पालि पकासो

## इयत्ता बारावी





शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



# पालि पकासो

## इयत्ता बारावी

२०२०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४

B9Z8U2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०२०** © **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**पालि भाषा तज्ज्ञ समिती**

डॉ. विमलकिर्ती, नागपूर (अध्यक्ष)
श्री. माधव मेश्राम, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. अशोक पैठणे, अमरावती (सदस्य)
डॉ. संतोष भोसले, औरंगाबाद (सदस्य)
श्री. पंजाब प्रधान, उल्हासनगर (सदस्य)
डॉ. मोहन वानखडे, नागपूर (सदस्य)
श्री. किर्तीराज लोणारे, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. सोपान पठाडे, यवतमाळ (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**पालि भाषा अभ्यासगट सदस्य**

डॉ. योजना भगत
डॉ. विश्वनाथ चौरपगार
श्रीमती. तृप्तीराणी तायडे
श्री. रामकृष्ण तागडे
श्रीमती. विणा नकाते
श्रीमती. निरुपमा भोरे
श्री. पुरुषोत्तम सिरसाठ
श्री. दिलीप सोनोने
श्री. प्रभुदास तायडे
श्री. विश्वजीत रगडे
डॉ. मनीष आनंद
डॉ. बालाजी गव्हाळे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. यशवंत देशमुख, चित्रकार, पुणे

**अक्षरजुळणी**

भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**संयोजन**

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. राजेंद्र चिंदरकर**
निर्मिती अधिकारी

**श्री. राजेंद्र पांडलोसकर**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2020-21/0.10

**मुद्रक**

M/s. Renuka Binders, Pune

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - २५.

# “भारतस्स संविधान”

## उद्देसिका

**मयं, भारतस्स लोक,** भारतस्स एको **बाहुभूमिकं**
**सङ्गणिकावादी धम्मनिरपेक्ख लोकसाही गणरज्ज** रचयतिस्स
च तस्स सब्बे नागरिकानं;
**बाहुजञ्ञ, वित्तिय, च राजनेत्तिक ञाय;**
**वितक्क अभिवेत्ति, विस्सास, सद्धा**
**च उपासना एस्स विमुत्ति;**
**दज्जस च सन्धीस्स समानत्त;**
**एकंस पापेतु कत्वानं ददातिस्स च**
**तं सब्बेस्मिं पुग्गलस्स पतिट्ठा**
**च रट्ठस्स समग्गी च सामग्गीयं**
**एस्स आन दातु बन्धूता**
पवड्ढितुं कितस्स सङ्कप्पपुब्बकं सम्मासङ्कप्प कत्वानं;
**अम्हाकं संविधान सभास्मिं**
अज्ज दिवाङ्क सव्वीसति कत्तिक, एकूनवीसति एकूनपञ्ञासति दिने
इत्थं अयं **संविधान अधिकत च अधिनियत**
कत्वान **सयं पत समप्पयाम.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे।।

## पटिञ्ञा

भारतो मम देसो ।
सब्बे च भारतीया मम बान्धवा ।
अत्थि देसविसये मे पेमं ।
मम देसस्स या समिद्धता,
या च विविधताय मण्डिता परम्परा, तस्साहं मानि ।
एतं दायज्जं उपसम्पादेतुं अहं दळ्हपरक्कमो भविस्सामि ।
अहं मातापितुन्नं च आचरियानं च पाचरियानं च
वयो–अनुप्पत्तानं सक्करिस्सामि ।
सब्बे जने अहं सोरताय पटिपज्जिस्सामि ।
अहं देसविसये देसबान्धवविसये च दळ्हभत्तिं
पटिजानामि ।
यं तेसं कल्याणं तं एव होतु मे कल्याणं,
या तेसं समिद्धि सा मे समिद्धि
यं तेसं सुखं तं मे सुखं।

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हा सर्वांचे इयत्ता बारावीच्या वर्गात स्वागत आहे. '**पालि पकासो**' हे इयत्ता बारावी पालि पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद होत आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यानंतर आपल्या लक्षात येईल, की स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या संविधानिक मूल्यांची जाणीव आपल्यामध्ये व्हावी, या दृष्टीने पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. या पाठ्यपुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठ्यघटकावरील स्वाध्यायांचे स्वरूप आणि त्यामधील विविधता, यामुळे पाठ्यघटकांचे अंतरंग समजून घेण्यास विशेष मदत होऊ शकते. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने स्वाध्यायांतील कृतींची रचना करण्यात आलेली आहे. याच दृष्टीने गद्य-पद्य पाठांची निवड करण्यात आलेली असून त्यातील रंजकता व सुलभता यावर भर देण्यात आलेला आहे. पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना विद्यार्थ्याला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही, पाठांतराचे दडपणही राहणार नाही, अशा प्रकारची या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कृतिपत्रिकेच्या माध्यमातून होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भाषेच्या अध्ययनाची आवड निर्माण होईल, विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया शीलप्रज्ञेनेयुक्त होऊन ज्ञानरचनात्मक पद्धतीने गतिमान होण्यास मदत होईल. पाठ्यपुस्तकात दिलेल्या चित्रांमधून तत्कालिन पोशाख, आभूषणे, राहणीमान, जीवनपद्धती इत्यादीबाबतची माहिती सहजतेने होईल. तसेच अभ्यासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती परिशिष्टे देण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे, ते सदाचारी व्हावेत हा हेतू डोळ्यांसमोर ठेऊनच पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. भिक्खू-भिक्खूनी संघाची संपूर्ण कार्यप्रणाली लोकशाही स्वरूपाची होती. वेगवेगळ्या कुळातून, जातीतून, धर्मातून, प्रांतातून आलेले लोक संघात प्रव्रज्जित झाल्यानंतर ते आपले सर्व भेद विसरून त्यांची केवळ 'शाक्यपुत्रीय श्रमण-श्रमणी म्हणून ओळख असायची, यामधून आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश मिळतो. 'चरियापिटक' या घटकातून कठिणातील कठीण कार्य करण्याचे, आपत्तीला तोंड देण्याचे, सुख-दु:खात समभावाने राहण्याचे विचार दिसून येतात. सर्वच पाठ्यघटक असे आहेत, की जे आपल्याला सुसंस्कृत आचरण करण्यास प्रेरित करतात.

पाठ्यघटकासंबंधी माहिती मिळविण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू.आर. कोडद्वारे उपयुक्त दृक-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल. त्याचा आपणाला अभ्यासासाठी निश्चितपणे उपयोग होईल.

प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या कामी पालि भाषा तज्ज्ञ समिती, पालि भाषा अभ्यासगट सदस्य या सर्वांनी परिश्रम घेऊन पाठ्यपुस्तक तयार केले आहे. पालि भाषेचे शिक्षक व तज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

भाषेच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्यांची नैतिकता, विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्य, परोपकार भावना, स्वमत प्रकटीकरण आणि राष्ट्रीय मूल्ये यांच्या विकासासाठी '**पालि पकासो**' हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल. तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

पुणे
दिनांक :- २१ फेब्रुवारी, २०२०
भारतीय सौर दिनांक : २ फाल्गुन, १९४१

## भाषाविषयक क्षमता : पालि

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषाविषयक खालील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | | क्षमता |
|---|---|---|
| श्रवण | • | पालि तिपिटक साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे. |
| | • | पालि भाषेतील विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यांतील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे. |
| | • | पालि भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संवाद, संभाषण व व्याख्याने ऐकून चिकित्सक विचारासह त्यात सहभागी होता येणे. |
| | • | आपल्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| | • | आंतरजालावरून लिंक्स्, क्यू. आर. कोड, व्हिडिओज, यू-ट्यूब व प्रसारमाध्यमे, दृक्-श्राव्य इत्यादी माध्यमांतून अपेक्षित व अध्ययनपूरक संदर्भ विकसित करणे. |
| भाषण-संभाषण | • | पालि भाषेतील उच्चारवैशिष्ट्यांना अनुसरून तिपिटकातील गाथांचे पठण आणि संभाषण करता येणे. |
| | • | पाठ्यपुस्तकात अंतर्भूत असलेल्या घटकांचे सादरीकरण करता येणे. |
| | • | विषयाला अनुसरून स्वत:चे स्वतंत्र विचार संदर्भासह मांडता येणे. |
| | • | पालि भाषेतील अध्ययन कृतींना विषयाला अनुसरून अनुभव कथन करता येणे. |
| | • | पालि भाषेत एकमेकांशी संभाषण करता येणे. |
| वाचन | • | योग्य गतीने व विरामचिन्हांची दखल घेऊन प्रकट वाचन करता येणे. |
| | • | पालि साहित्यातील तिपिटक व अनुपिटक साहित्यप्रकारांचे वाचन करून त्याचा आस्वाद घेणे. |
| | • | संकेतस्थळावरील ई-बुक्स, ई-साहित्य शोधून वाचन करता येणे व त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करून त्याची पूर्वज्ञानाशी सांगड घालता येणे. |
| | • | पाठाशी संबंधित मूळ साहित्य व संदर्भीय साहित्याचे वाचन करणे. |
| लेखन | • | लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे. |
| | • | भाषा नियमांना अनुसरून संवाद, वर्णन, लघुपरिच्छेद लिहिता येणे. |
| | • | माध्यमभाषेतील भाषा नियमाला अनुसरून अनुवाद लेखन व उपयोजित लेखनाचे तंत्र प्राप्त करणे. |
| | • | लेखननियमांनुसार मुद्रितशोधनाचे कौशल्य प्राप्त करणे. |
| | • | पाठाचा आशय व विचार याबाबत स्पष्टीकरणासह स्वत:चे मत स्वत:च्या भाषेत समर्पक शब्दांत लिहिता येणे. |
| अध्ययन कौशल्य | • | कोणत्याही संदर्भासाठी शब्दकोश अभ्यासता येणे. |
| | • | पालि भाषेत जालरेखाचित्र निर्माण करता येणे. |
| | • | पालि भाषेत कथापूर्ती करता येणे. |
| | • | पालि भाषेत माध्यमभाषेचा अनुवाद करता येणे. |
| | • | बहुभाषा परिचय करून घेण्याची जिज्ञासा निर्माण होणे. |
| | • | संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ई-साहित्याचा, ॲप्लीकेशनचा उत्तमरीत्या कृतियुक्त वापर अभ्यासासाठी करता येणे. |
| भाषाभ्यास | • | इयत्ता बारावीत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे. |
| | • | काळ, काळाचे उपप्रकार, संधी, समास, विशेषण, अव्यय, वाक्यात उपयोग इत्यादी घटक जाणून घेणे. |
| | • | ०१ ते १०० अंक (क्रम) जाणून घेणे. |
| | • | निबंध, अपठित व कथापूर्ती याचे उपयोजन कौशल्यपूर्ण रीतीने करता येणे. |
| | • | पालि भाषेत संवाद करता येणे. |

# शिक्षकांसाठी

**'पालि पकासो'** इयत्ता बारावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील कौशल्ये, नैतिक मूल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार रुजवता येतील अशा पाठ्यघटकांचा पाठ्यपुस्तकात समावेश केलेला आहे. पाठ्यघटकांमधील आशय विद्यार्थ्यांना सहजतेने स्पष्ट व्हावा या दृष्टीने आशयानुरूप पाठ्यघटकांमध्ये चित्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या कृतीबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करून घ्यावेत.

गद्य-पद्य पाठ निवडतांना काही चिरंतन मूल्ये आणि तत्त्वांचा विचार करण्यात आलेला आहे. पाठ्यघटकांची माहिती व्हावी म्हणून पाठ्यघटकाआधी त्याची सारांशरूपात प्रस्तावना देण्यात आलेली आहे. ही प्रस्तावना त्या पाठ्य घटकाचे सार आहे. शिक्षकांनी ही प्रस्तावना अधिक स्पष्ट करताना, पाठ्यघटकांशी संबंधित पालि साहित्यातील इतर संदर्भांचा सुद्धा अध्ययन-अध्यापनात समावेश व्हावा, यासाठी काही पालि संदर्भ ग्रंथांची यादी पाठ्यपुस्तकात देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांना लेखन-वाचन कौशल्य विकासासाठी पाठ्यपुस्तकातील घटकनिहाय कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. विद्यार्थ्यांना पालि भाषा शिकण्याकरिता, शिकवण्याकरिता या कृती घटकांचा विशेष उपयोग होऊ शकतो. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्य विकसित होणार आहेत. इयत्ता बारावीतील लेखन घटकांची मांडणी करतांना विद्यार्थ्यांना ते सहजतेने समजेल याची दक्षता घेण्यात आलेली आहे. शिक्षकांनी प्रत्येक पाठ्यघटक विद्यार्थ्यांना समजून सांगतांना ते त्याला चांगल्या प्रकारे आकलन होईल या दृष्टीने स्वकौशल्य विकसित केल्यास, विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषा शिकण्याची आवड निर्माण होईल.

या पाठ्यघटकांमध्ये व्याकरण घटकांची व कृतींची मांडणी सहज, सुलभ व सोप्या पद्धतीने केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व विद्यार्थ्यांकडून तसा सराव करून घ्यावा.

पालि भाषेचा जर आपल्याला अभ्यास करायचा असेल तर तो तीन अंगांनी करता येतो, तो म्हणजे - परियति, पटिपत्ति व पटिवेदन. परियति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे. पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा करणे, विचार-विमर्ष करणे आणि पटिवेदन म्हणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे. पालिमधील शब्दांचे असे तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही, तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

पालि भाषेच्या अध्ययनाच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब ही, की इतर भाषांचा अभ्यास हा गद्य, पद्य, नाटक, कथा-कथन इत्यादीपुरताच मर्यादित असतो; परंतु पालि भाषेचा अभ्यास आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करू शकतो. पालि भाषा ही आपल्याला नऊ अंगांनी शिकता येते. ज्याला 'नवाङ्गसत्थुसासन' असे सुद्धा म्हणतात. म्हणून पालि शिकण्याकरिता वेगवेगळी दालने उपलब्ध आहेत. या सर्वांचा उपयोग आपल्याला अध्यापनामध्ये निश्चित रूपाने होऊ शकतो.

पालि भाषा शिकतांना-शिकवितांना सर्वप्रथम ती भाषा काय आहे, ती आपल्याला कशा पद्धतीने समजून घेता येईल, ती बोलचालची भाषा कशी होईल? या दृष्टीने पालि भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यामध्ये शिक्षकाचे अध्ययन-अध्यापन निश्चित रूपाने दिशादर्शक ठरू शकते. कारण प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत बौद्ध संस्कृती, तत्त्वज्ञान, इतिहास, जीवनमूल्ये समजून घेण्याच्या दृष्टिने पालि भाषेचे फार महत्त्व आहे. पालि भाषेच्या या महत्त्वामुळेच आज हा विषय राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. म्हणून असे म्हणता येईल, की आधुनिक भारतात पालि भाषेच्या अध्ययनाचे क्षेत्र निश्चितच व्यापक होत आहे. यामध्ये शिक्षक म्हणून आपले योगदान या विषयाला क्रमप्राप्त आहे. म्हणून शिक्षकांनी स्वतःच्या सृजनशीलतेने, कल्पकतेने या पाठ्यघटकांचे अध्यापन करून विद्यार्थ्यांना पालि विषयाच्या अध्ययनासाठी प्रेरित करणे गरजेचे आहे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, विचारक्षमता व कृतीशीलता यांना ही गती प्राप्त होईल. शिक्षक हा केवळ पाठ्यघटकच शिकवत नसतो तर विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण गुणांची वाढ कशी करता येईल? त्यांच्यामधील न्यूनगंड कसा काढता येईल? त्याला समाजाभिमुख कसे करता येईल? ही मूल्ये सुद्धा पाठ्यघटकाच्या अनुषंगाने शिकवत असतो. विद्यार्थ्यांच्या चुकाच न दाखवता त्यांच्यामधील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याची स्तुती करणेही गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक कृती चांगल्याप्रकारे करण्याची प्रेरणा मिळते.

मानवी मूल्यांची जपवणूक व संवर्धन करण्याची फार मोठी जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्या सर्वांवर आहे, कारण या मूल्यांचे बीजारोपण जर आपण विद्यार्थ्यांवर योग्यपणे केले तर उद्याची सशक्त पीढी आपल्या हातून घडणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करुन अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगिण व्यक्तिमत्त्व अधिक कुशल पद्धतीने विकसित होण्यास मदत होईल व शिक्षकांना सुद्धा एक निकोप, सुदृढ व सम्यक विद्यार्थी घडविण्याचे समाधान प्राप्त होईल.

**'पालि पकासो'** इयत्ता बारावीचे हे पाठ्यपुस्तक आपणास निश्चितच आवडेल, अशी अपेक्षा आहे.

# पाठानुक्कमो


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| | **गज्जो खन्धको** | |
| १) | सङ्घसामग्गी सुत्त | १ |
| २) | रथो नाम किं? | ३ |
| ३) | विनिच्छय महामत्त वत्थु | ६ |
| ४) | जनकेन तनया ओवादं | १० |
| ५) | बहुजनसङ्घटको छत्तपति सिवाजि महारञ्ञो | १३ |
| ६) | पियदस्सि असोकस्स थम्भलेखा | १८ |
| ७) | चत्तारि दस्सनियानि ठानानि | २१ |
| ८) | वनरक्खको बोधिसत्तो | २४ |
| | **पज्जो खन्धको** | |
| १) | सिगालसुत्त | २७ |
| २) | सीलानिसंसा | ३० |
| ३) | वसलसुत्त | ३३ |
| ४) | सुनीत थेरो | ३६ |
| ५) | रुरुराजचरियं | ३९ |
| ६) | इणसुत्त | ४२ |
| ७) | अम्बपाली थेरी | ४६ |
| ८) | पकिण्णानि सुभासितानि | ४९ |
| | **थुलवाचन खन्धको** | |
| १) | पाचीन विस्सविज्जालयो | ५३ |
| २) | पटाचारा थेरी अपदानं | ५८ |

| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| | **परिसिट्ठं** | |
| १) | **वेय्याकरण (व्याकरण)** | ६१ ते ७१ |
| | १) सरं च व्यञ्जनं च वग्गिकरणं<br>२) व्यञ्जन परिवत्तनं ३) काळ प्रत्यय ४) सन्धी<br>५) धातुरुपाविषयी माहिती ६) समास ७) अव्यय | |
| २) | **सुलभो पालि** (सुलभ पालि) | ७२ ते ८२ |
| | १) सरीरस्स अवयवानि<br>२) ञातिगणा ३) वण्णानि(रंगानि) ४) रसानि<br>५) गेहसेवक पसु ६) तिरच्छाना ७) जलथलगोचरा<br>८) किमी ९) सकुणा<br>१०) फलफलानि च पुप्फानि च ११) यानानि<br>१२) आयुधं (हत्यारे) १३) संख्या (अंक) | |
| ३) | **संवाद कौशल्य, निबन्धो** (निबंध) | ८३ ते ८४ |
| ४) | **अपठितो** (अपठित उतारे) | ८५ ते ९४ |
| | **गज्ज विभागो–** १) सुंसुमार जातकं<br>२) सठस्स पटिसाठेय्यं<br>३) कम्मेनेव सिद्धि न नामेन<br>४) चीनदेसिय पवासि-युवानच्वांग<br>५) सीहो च सकुणो च<br>**पज्ज विभागो–** १) सम्मापणिहितं चित्तं<br>२) पुण्णिका थेरी<br>३) चंपा नगरी<br>४) पराभव सुत्त<br>५) गोतमचरियं | |
| ५) | **कथापुत्ती** (कथापूर्ती) | ९५ |
| | १) बकजातकं २) नक्खतजातकं<br>३) कलहो हि विनासमुलो ४) सीलविमंसनं | |
| ६) | **धम्मलिपी** | ९६ ते १०० |
| ७) | **पालि भाषेचे महत्त्व** | १०१ |

# १) सङ्घसामग्गी सुत्त

**प्रस्तावना**

प्रस्तुत पाठ्यघटक 'इतिवुत्तकं' या ग्रंथातून घेतला आहे. यात संघाचे अर्थात कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राष्ट्रीय एकता व एकात्मता इत्यादींचे महत्त्व सांगितले आहे. या पाठ्यघटकामध्ये संघाची एकता बहुजन हितार्थ सुखकारक असते, हा संदेश दिलेला आहे. कारण तथागताचा संघ हा बहुजनाच्या हितासाठी, सुखासाठी, कल्याणासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी आहे. तथागताचा उपदेश जर आचरणात आणला तर तो राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने सुद्धा महत्त्वपूर्ण ठरू शकतो, यादृष्टीने या पाठ्यघटकाचे विशेष महत्त्व आहे.

**''भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्याचे संरक्षण करणे''**



वुत्तं हेतं भगवता, वुत्तमरहता ति मे सुतं–
''एकधम्मो, भिक्खवे, लोके उप्पज्जमानो उप्पज्जति बहुजनहिताय बहुजनसुखाय बहुनो जनस्स अत्थाय हिताय सुखाय देवमनुस्सानं। कतमो एकधम्मो? सङ्घसामग्गी। सङ्घे खो पन, भिक्खवे, समग्गे न चेव अञ्ञमञ्ञं भण्डनानि होन्ति, न च अञ्ञमञ्ञं परिभासा होन्ति, न च अञ्ञमञ्ञं परिक्खेपा होन्ति, न च अञ्ञमञ्ञं परिच्चजना होन्ति। तत्थ अप्पसन्ना चेव पसीदन्ति, पसन्नानं च भिय्योभावो होती''ति। एतमत्थ भगवा अवोच। तत्थेतं इति वुच्चति–

''सुखा सङ्घस्स सामग्गी, समग्गानं चनुग्गहो।
समग्गरतो धम्मट्ठो, योगक्खेमा न धंसति।
सङ्घं समग्गं कत्वान, कप्पं सग्गं मोदती'' ति।।

**(संदर्भ–इतिवुत्तकं)**

## शब्दार्थ

**एकधम्म (वि.)**– एक सत्य गोष्ट
**उप्पज्जति (वर्त.क्रि.)**– उत्पन्न होते, उत्पन्न होतो
**कतमो (वि.)**– कोणते
**जन (पु.)**– लोक, प्रजा
**सङ्घ (पु.)**– एकता, एकात्मता
**सामग्गी (वि.)**– संग्रह, एकत्रिकरण, सामग्री
**भण्डनानि (नपु.)**– भांडणे, वादविवाद, कलह
**अञ्ञमञ्ञं**– एकमेकांत, आपापसात, मिळूनमिसळून
**परिभासा (पु.)**– दोषारोपण, शिवीगाळ
**परिक्खेपा (वि.)**– परित्याग
**परिच्च (पूर्व.क्रि.)**– समजून, जाणून
**पसीदन्ति (वर्त.क्रि.)**– प्रसन्न होतात, श्रद्धाळू बनतात
**भिय्यो (वि.)**– फार, पुष्कळ, अती
**एतमत्थ (नपु.)**– या अर्थाला
**अवोच (भू. क्रि.)**– म्हणाला
**वुच्चति (वर्त.क्रि.)**– म्हणाले, म्हणाला
**योगक्खेम (पु.)**– योगक्षेम, आसक्तीपासून मुक्त
**मोदति (वर्त.क्रि.)**– आनंदीत होते
**धंसति (वर्त.क्रि.)**– ढासळते, कोलमडते

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.
१) भांडणे कशामुळे होत नाहीत?
२) कशामुळे सुख प्राप्त होते?
३) संघाच्या एकत्रीकरणामुळे काय होते?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य लिहा.
१) सुखा सङ्घस्स सामग्गी।
२) समग्गे चेव अञ्ञमञ्ञं भण्डनानि होन्ति।
३) योगक्खेमा धंसति।
४) पसन्नानं च भिय्योभावो होति।

### ३. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) सुखा सङ्घस्स सामग्गी | अ) योगक्खेमा न धंसति। |
| २) समग्गरतो धम्मट्ठो | ब) समग्गानं चनुग्गहो। |
| ३) सङ्घ समग्गं कत्वान | क) एतमत्थ भगवा अवोच। |
| | ड) कप्पं सग्गं मोदती' ति। |

### ४ रूपे ओळखा.
१) मोदति २) वुच्चति
३) होन्ति ४) कत्वान
५) धंसति

### ५. माध्यम भाषेत अर्थ लिहा.
१) सुखाय २) सङ्घस्स
३) धम्मट्ठो ४) उप्पज्जति
५) भण्डनानि

### ६. संधी करा.
१) एक+धम्मो २) अत्थ+आय
३) सुख+आय ४) हित+आय
५) च+एव ६) एतं+अत्थ
७) तत्थ+एतं ८) च+अनुग्गहो

### ७. समास ओळखा.
१) सङ्घसामग्गी २) भिय्योभावो

### ८. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.
सङ्घसामग्गी सुत्त या पाठात एकत्रीकरणाचे कोणते फायदे सांगितले ते लिहा.


☆☆☆

# २) रथो नाम किं?

**प्रस्तावना**

पालि अनुपिटक साहित्यातील महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजेच 'मिलिंद प्रश्न'(मिलिन्द पञ्हो) होय. ग्रीक देशातील राजा मिलिंद (मिनॅण्डर) तसेच बौद्ध भिक्खु नागसेन यांच्यातील इ.स.पू १५० मध्ये झालेला संवाद असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. या पाठ्यघटकामध्ये भिक्खु नागसेन यांनी राजा मिलिंद यांनी विचारलेल्या विविधांगी प्रश्नांना वेगवेगळ्या प्रकारच्या उपमा देऊन त्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली आहेत. त्यांची ती उत्तरे तार्किक दृष्टीने आजही प्रेरणादायी आहेत. म्हणून हा पाठ्यघटक विद्यार्थ्यांना दिशादर्शक ठरू शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिलिंद व नागसेन या नावाचे किती आकर्षण होते हे त्यांनी औरंगाबादला स्थापन केलेल्या महाविद्यालयाला दिलेल्या 'मिलिंद' नावावरून व त्या महाविद्यालयाच्या परिसराला दिलेल्या 'नागसेनवन' या नावावरून स्पष्ट होते. त्यांनी आधुनिक भारतातील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या समोर मिलिंद व नागसेनाचे आदर्श ठेवलेले आहेत.

प्रस्तुत पाठ्यघटक 'मिलिंद प्रश्न' या ग्रंथातून निवडला आहे. या पाठातून 'आदर्श संवाद' कसा असावा याविषयीची माहिती मिळते. रथ म्हणजे काय? याविषयी राजा मिलिंद व भिक्खु नागसेन यांचा संवाद या पाठामध्ये आला आहे. **''विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.''**



**नागसेन** – ''सचे त्वं महाराज, रथेनागतोसि, रथं मे आरोचेहि''। किन्नु खो महाराज, ईसा रथो''ति?

**मिलिन्दो** – ''नहि भन्ते''ति।

**नागसेन** – ''अक्खि रथो''ति?

**मिलिन्दो** – ''नहि भन्ते''ति।

**नागसेन** – ''चक्कानि रथो''ति?

**मिलिन्दो** – ''नहि भन्ते''ति।

**नागसेन** – ''रथपञ्जरं रथो''ति?

**मिलिन्दो** – ''नहि भन्ते''ति।

**नागसेन** – '' रथदण्डको रथो'' ति?

**मिलिन्दो** – '' नहि भन्ते'' ति।

नागसेन – “ युगं रथो” ति ?
मिलिन्दो – “ नहि भन्ते” ति।
नागसेन – “ रस्मियो रथो” ति ?
मिलिन्दो – “ नहि भन्ते” ति।
नागसेन – “ पतोदलट्ठि रथो” ति ?
मिलिन्दो – “ नहि भन्ते” ति।
नागसेन – “किन्नु खो महाराज, ईसा, अक्ख, चक्ख रथपञ्जर रथदण्ड युग रस्मिंपतोदारथो”ति ?
मिलिन्दो – “ नहि भन्ते” ति
नागसेन – “ किं पन महाराज, अञ्ञत्त ईसा, अक्ख, चक्ख रथपञ्जरथ, दण्डयुगरस्मिपतोदा रथो” ति ?
मिलिन्दो – “ नहि भन्ते” ति।
नागसेन – “तमहं महाराज, पुच्छन्तो पुच्छन्तो न पस्सामि रथं”।
मिलिन्दो – “ नहि भन्ते” ति।
नागसेन – “रथरट्ठो येव नु खो महाराज रथो” ति ?
मिलिन्दो – “ नहि भन्ते” ति।
नागसेन – “ को पनेत्थ रथो ? अलिकं त्वं महाराज भाससि मुसावादं नत्थि रथो”। त्वंसि महाराज, सकलजम्बुदिपे अग्गराजा। कस्स पन त्वं भायित्वा मुसावादं भाससि ? सुणन्तु मे भोन्तो पञ्चसता योनका, असितिसहस्सा च भिक्खु। अयं मिलिन्दो राजा एवमाहं- रथेनाहं आगतोस्मी’ति। सचे त्वं महाराज, रथेनागतोसि, रथ मे आरोचेहि’ति वुत्तो समानो रथं न सम्पादेति। कल्ल नु खो तदभिनन्दितुं” ति ?
मिलिन्दो – अथ खो मिलिन्दो राजा आयस्मन्तं नागसेनं एतदवोच- “नाहं भन्ते नागसेन, मुसा भणामि। ईसं च पटिच्च,अक्खि पटिच्च चक्कानि पटिच्च, रथपञ्जरं च पटिच्च, रथदण्डकंच पटिच्च रथो’ति सञ्ञा समञ्ञा पञ्जन्ति वोहारो नाममतं पवत्तति”ति।
नागसेन – “साधु खो त्वं, महाराज, रथं जानासि”।

**(संदर्भ- मिलिन्द पञ्हो)**

## शब्दार्थ

**रथं (नाम)** – रथ
**ईसा (स्त्री.)**– दांडा
**अक्खो (पु.)**– आख, आस
**रथदण्डका (नपु.)**– रथाचा दांडा
**युग (नपु.)**– जू, जोखड
**रथपञ्जरा(वि.)**– रथाचा सांगाडा
**रस्मिंयो (रस्मिं स्त्री.)**– कासरा, लगाम
**पतोदलट्ठि (स्त्री.)**– चाबकाची काठी
**योनका (पु.)**– ग्रीक देशातील रहिवासी
**वोहारो (पु.)**– व्यावहारिक, व्यवहारात
**मुसावादं (पु.)**– खोटे बोलणे
**अग्गराजा (पु.)**– श्रेष्ठ राजा
**असितीसहस्सा (संख्या वि.)**– ऐंशी हजार
**पञ्चसता (संख्या वि.)**– पाचशे
**जम्बुदिप(पु.)**– जम्बुद्विप(भारताचे प्राचीन नाव)

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मिलिंद राजा कोणत्या वाहनात बसून आला होता ?
२) मिलिंद राजा मूळ कोणत्या देशाचा होता ?
३) सभेमध्ये किती ग्रीक सैनिक हजर होते ?
४) सभेमध्ये किती बौध्द भिक्खु उपस्थित होते ?
५) प्राचीन काळी ‘जम्बुद्विप’ हे कोणत्या देशाचे नाव होते ?
६) नागसेन भिक्खुने मिलिंद राजाला कोणत्या वाहनाविषयी प्रश्न विचारले होते ?
७) पाठातील संवाद कोणाकोणामध्ये आहे ?

## २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) ''सचे त्वं महाराज रथेनागतोसि,रथं मे आरोचेहि''।

२) ''त्वंसि, महाराज सकलजम्बुदिपे न अग्गराजा''।

३) ''किन्नु खो महाराज रथपञ्जरं रथो''ति?

४) ''साधु खो त्वं, महाराज,रथं जानासि''।

## ३. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

१) सचे

२) पन

३) न

४) साधु

## ४. सूचनेनुसार कृती करा.

### (१) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) किन्नु खो ................ ईसा रथो ति''?। (नागसेन/महाराज)

२) रथरङ्गो ................ नु खो,महाराज रथो''ति?। (नेव/येव)

### (२) माध्यम भाषेत अर्थ लिहा.

१) पतोदलट्ठिं।

२) मुसावादं।

३) अग्गराजा।

### (३) संधी विग्रह करा.

१) तमहं।

२) त्वंसि।

३) एवमाहं।


### (४) संधी करा.

१) एतद + अवोच

२) न + अत्थि

३) न + अहं

### (५) जाळरेखाचित्र पूर्ण करा.




### (६) योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) त्वं महाराज भाससि | अ) आगतोस्मी'ति। |
| २) रथेनाहं | ब) मुसावादं नत्थि रथो''। |
| ३) साधु,खो त्वं महाराज | क) नू खो तदाभिनन्दितुं''ति? |
| | ड) रथं जानासि। |

### (७) दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) भिक्खु नागसेन आणि राजा मिलिंद यांच्यातील संवाद लिहा.

२) पाठातील संवाद आपल्या भाषेत लिहा.

☆☆☆


# ३) विनिच्छय महामत्त वत्थु

**प्रस्तावना**

प्राचीन काळात भारतामध्ये पंचायत व्यवस्था होती, ज्यामध्ये पंचायतीच्या सदस्यांना समाजामध्ये न्याय करणाऱ्या लोकाच्या रुपामध्ये आदरयुक्त सन्मान प्राप्त होत होता. गावातील वेगवेगळ्या प्रकारच्या समस्यांना सोडविण्याकरीता या व्यवस्थेची स्थापना झाली होती. स्वतंत्र भारतामध्ये भारताचे संविधान बनविताना सविधान निर्मात्यांनी सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, दुय्यम न्यायालये अशी न्याय व्यवस्थेची रचना केलेली आहे. या व्यवस्थेच्या माध्यमातून न्यायालयाला मौलिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी संबंधितांना निर्देश, आदेश देण्याचे अधिकार आहेत. न्यायव्यवस्था ही निपक्ष असल्यामुळे सर्वसामान्य व्यक्ती सुध्दा इथे न्यायाची अपेक्षा करीत असतो. न्यायव्यवस्थेच्या निःपक्षपणावरच न्यायव्यवस्थेची विश्वसनीयता अवंलबून असते. 'विनिच्छय महामत्त वत्थु' न्यायव्यवस्थेशीच संबंधित आहे.

प्रस्तुत पाठ 'धम्मपद अट्ठकथा' मधील 'धम्मट्ठवग्गो' यातील आहे. यामध्ये तथागत बुद्धानी, भिक्खूंना न्यायाधिशाविषयी जो अनुभव आला होता, तो त्यांच्याकडून ऐकल्यानंतर तथागतांनी भिक्खुंना अधार्मिक आणि धार्मिक न्यायाधीश कुणाला म्हणतात, याविषयी उपदेश केला आहे.

**''विवक्षित प्रकरणी अटक, निश्चित कायदे व समान न्याय यांची अंमलबजावणी करणे''**



एकदिवसम्हि भिक्खू सावत्थियं उत्तरद्वारगामे पिण्डाय चरित्वा पिण्डपातपटिक्कन्ता नगरमज्झेन विहारं आगच्छन्ति। तस्मिं खणे मेघो उट्ठाय पावस्सि। ते सम्मुखागतं विनिच्छयसालं पविसित्वा विनिच्छयमहामत्ते लञ्जं व गहेत्वा सामिके असामिके करोन्ते दिस्वा ''अहो इमे अधम्मिका, मयं पन इमे धम्मेन विनिच्छय करोन्तीति सञ्ञिनो अहुम्हा'' ति चिन्तेत्वा वस्से विगते विहारं गन्त्वा सत्थारं वन्दित्वा एकमन्तं निसिन्ना तमत्थं आरोचेसुं।

सत्था ''न, भिक्खवे, छन्दादिवसिका हुत्वा साहसेन अत्थं विनिच्छिनन्ता धम्मट्ठा नाम होन्ति, अपराधं पन अनुविज्जित्वा अपराधानुरुपं असाहसेन विनिच्छयं करोन्ता एव धम्मट्ठा नाम होन्ती '' ति वत्वा इमा गाथा अभासि –

**''न तेन होति धम्मट्ठो, येनत्थं साहसा नये।**
**यो च अत्थं अनत्थञ्च,उभो निच्छेय्य पण्डितो।।**

**''असाहसेन धम्मेन, समेन नयती परे।**
**धम्मस्स गुत्तो मेधावी, धम्मट्ठोति पवुच्चती'' ति।।**

तत्थ तेनाति एत्तकेनेव कारणेन, धम्मट्ठोति राजा हि अत्तनो कातब्बे विनिच्छयधम्मे ठितोपि धम्मट्ठो नाम न होति। येनाति येन कारणेन। अत्थन्ति ओतिण्णं विनिच्छितब्बं अत्थं। साहसा नयेति छन्दादीसु पतिट्ठितो साहसेन मुसावादेन विनिच्छेय्य। यो हि छन्दे पतिट्ठाय ञातीति वा मित्तोति वा मुसा वत्वा असामिकमेव सामिकं करोति, दोसे पतिट्ठाय अत्तनो वेरीनं मुसा वत्वा सामिकमेव असामिकं करोति, मोहे पतिट्ठाय लञ्चं गहेत्वा विनिच्छयकाले अञ्ञविहितो विय इतो चितो च ओलोकेन्तो मुसा वत्वा ''इमिना जितं, अयं पराजितो'' ति परं नीहरति, भये पतिट्ठाय कस्सचिदेव इस्सरजातिकस्स पराजयं पापुणन्तस्सापि जयं आरोपेति, अयं साहसेन अत्थं नेति नाम। एसो धम्मट्ठो नाम न होतीति अत्थो। अत्थं अनत्थञ्चाति भूतञ्च अभूतञ्च कारणं। उभो निच्छेय्याति यो पन पण्डितो उभो अत्थानत्थे विनिच्छिनित्वा वदति। असाहसेनाति अमुसावादेन। धम्मेनाति विनिच्छयधम्मेन, न छन्दादिवसेन। समेनाति अपराधानुरूपेनेव परे नयति, जयं वा पराजयं वा पापेति। धम्मस्स गुत्तो ति सो धम्मगुत्तो धम्मरक्खितो धम्मोजपञ्ञाय समन्नागतो मेधावी विनिच्छयधम्मे ठितत्ता धम्मट्ठोति पवुच्चती ति अत्थो।

**(संदर्भ– धम्मपद अट्ठकथा)**



## शब्दार्थ

पिण्डाय (वि.)– भिक्षाटनाकरिता
चरित्वा (पूर्व.क्रि.)– विचरण करून, फिरून
पटिक्कन्तं (कृ.)– परत आलेला
नगरमज्झेन (नपु.)– नगरामध्ये, नगरामधून
आगच्छन्ति (क्रि.)– येतात
खणे (क्रि.वि.)– क्षणात
मेघ (पु.)– ढग, बादल
उट्ठाय (पूर्व.क्रि.)– क्रियाशील
पावस्सि(पु.)– पाऊस, वर्षा
विनिच्छयसाल (नपु.)– न्यायालय, सरकारी कचेरी
पविसित्वा (पूर्व.क्रि.)– प्रवेश करून
विनिच्छयमहामत्ते (पु.)– न्यायाधीश
लञ्चं (नपुं.)– लाच
गहेत्वा (पूर्व.क्रि.)– घेऊन
सामिक (पु.)– स्वामी
करोन्त (कृ.)– करत असताना, करताना
दिस्वा (पूर्व.क्रि.)– पाहून
अहु(प.म.पु.ए.व.)– होणे
चिन्तेत्वा (पूर्व.क्रि.)– विचार करून
वस्स (पु.)– वर्षा, पाऊस
विगत (भू.क्रि.)– निघून गेला
सत्था (पु.)– शास्ता, मार्गदर्शक, बुद्ध
आरोचेसु (भू.क्रि.)– कथन केले
छदन (नपु.)– छत
हुत्वा (पूर्व.क्रि.)– होऊन
साहसेन (नपु.)– स्वैराचार, स्वैरवर्तन
धम्मट्ठ (वि.)– धर्मस्थित
समेन– अपराधानुरुप समानभावाने विचारांचा निर्णय करतो.
अभासि(भू.क्रि.)– म्हटले
तेन (अव्यय)– या कारणाने
नये (पु.)– योग्य परिणाम
अत्थ (वि.)– अर्थ, कल्याणकारक
निच्छेय्य (पु.)– निश्चय, निर्धार
गुत्त (कृ.)– संरक्षित
पवुच्चति (वर्त.क्रि.)– म्हणतो, सांगतो
तत्थ (क्रि.वि.)– तिथे, त्या ठिकाणी
एत्तो (अव्यय)– येथे, येथून
कातब्ब (नपु.)– कर्तव्य
ठित (नपु.)– ठिकाण
ओतिण्ण (कृ.)– अवतरित, येत असता
पतिट्ठितो (वि.)– प्रतिष्ठित
अत्तनो (पु.)– स्वतः, आपोआप
वेरी (वि.)– वैरी, शत्रू
अञ्ञ (पु.)– सन्माननीय व्यक्ती, वेगळा
विहितो (कृ.)– योग्य, उचित
विय (पु.)– समान, सारखा
ओलोकेति (वर्त.क्रि.)– अवलोकन करतो, पाहतो
नीहरति (वर्त.क्रि.)– बाहेर येऊन जातो
परं (वि.)– दुसरा
इस्सर (पु.)– स्वामी, प्रमुख, महान
जाति (स्त्री.)– जन्म
पापुणन्तं (कृ.)– पोहोचता, गाठता
आरोपेति (वर्त.क्रि.)– दोष देतो, आरोप करतो
नेति (वर्त.क्रि.)– नेतो, घेऊन जातो
एसो (सर्व.ना.)– हा
भूत (कृ.)– होऊन गेलेला
विनिच्छिनित्वा (पूर्व.क्रि.)– निर्णय लावून
पापेति (वर्त.क्रि.)– पोहोचवितो, मिळवितो
समन्नागत(वि.)– युक्त
ठितत्त(नपु.)– स्थितत्व, संयत

## स्वाध्याय

### १.खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) 'विनिच्छय महामत्त' याचा अर्थ सांगा.

२) 'विनिच्छय महामत्त वत्थु' ही धम्मदेसना तथागतांनी कुठे दिली ?

३) 'अधार्मिक' म्हणजे काय ?

४) 'धार्मिक' म्हणजे काय ?

५) 'धार्मिक न्यायाधीश' कुणाला म्हटले जाते ?

६) तथागत बुध्दांनी भिक्खुंना कशाविषयी उपदेश दिला ?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) 'न तेन होति धम्मट्ठो, येनत्थं साहसा नये।'

२) 'अधम्मस्स गुत्तो मेधावी, धम्मट्ठोति, पवुच्चती' ति।

३) 'साहसा नयेति छन्दादीसु पतिट्ठितो साहसेन मुसावादेन विनिच्छेय्य।'

४) असाहसेन धम्मेन समेन नयती परे।

५) साहसेनाति मुसावादेन, धम्मेनाति विनिच्छयधम्मेन, नछन्दादिवसन।

### ३.योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.

१) एकदिवसम्हि भिक्खू सावत्थियं उत्तरद्वारगामे पिण्डाय ............ पिण्डपातपटिक्कन्ता।
(चरित्वा/ कातुं)

२) ''अहो इमे............, मयं पन 'इमे धम्मेन विनिच्छयं करोन्ती ति।''
(अधम्मिका/धम्मिका)

३) अपराधं पन...........अपराधानुरुपं असाहसेन विनिच्छयं करोन्ता।
(विज्जित्वा/अनुविज्जित्वा)

४) मोहे पतिट्ठाय लञ्चं गहेत्वा विनिच्छयकाले ............विय इतो चितो।
(अञ्ञविहितो/विहितो)

५) अयं...........अत्थं नेति नाम।
(असाहसेन/साहसेन)

### ४. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) न तेन होति धम्मट्ठो | अ) उभो निच्छेय्य पण्डितो। |
| २) असाहसेन धम्मेन | ब) येनत्थं साहसा नये। |
| ३) यो च अत्थं अनत्थञ्च | क) धम्मट्ठोति पवुच्चती' ति। |
| | ड) समेन नयती परे। |

### ५. सूचनेनुसार कृती करा.


१) विहारं आगच्छन्ति। (काळ ओळखा)

२) 'दिस' (पूर्वकालवाचक अव्यय करा.)

३) 'विनिच्छयसालं' (माध्यम भाषेमध्ये अर्थ लिहा)

४) 'धम्मिक न्यायाधिस'(पालिभाषेमध्ये लिहा)

### ६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




### ७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) विनिच्छय महामत्त (न्यायाधीश) यावर स्वमत प्रकट करा.

२) 'विनिच्छय महामत्त वत्थु' या पाठाच्या आधारे धम्मिक आणि अधम्मिक निर्णय याविषयी लिहा.


☆☆☆

# ४) जनकेन तनया ओवादं

**प्रस्तावना**

प्रस्तुत पाठ्यघटक 'धम्मपद अट्ठकथा' यामधुन घेतलेला आहे. ह्या पाठ्यघटकात विशाखेच्या वडिलांनी तिला सासरी जातांना दहा उपदेश सांगितलेले आहे. तथागत बुद्धाच्या धम्मोपदेशाने तत्कालीन समाजातील, वर्गातील अनेक लोक प्रभावित झाले होते. त्यामध्ये गरीब, श्रीमंत, राजा, सेनापती, शेतकरी, व्यवसायी, गणिका इत्यादींचा समावेश होता. तथागताकडे जो कुणी यायचा तो त्यांच्या उपदेशाने प्रभावित होऊन संघात दीक्षित व्हायचा. असाच प्रकार विशाखाचे आई वडील, धनंजय व सुमना यांच्याबाबतीतही झाला. विशाखा सात वर्षांची असतांनाच तिचे आई वडील भिक्खू संघात दीक्षित झाले होते. विशाखा वयात आल्यानंतर तिच्या आईवडिलांनी श्रावस्ती येथील मिगारश्रेष्ठीचे पुत्र पुण्यवर्धन यांच्याशी तिचा विवाह केला. सासरी जात असताना तिच्या वडिलांनी कोणत्या गोष्टीचे पालन केले पाहिजे याविषयीचे वर्णन या पाठ्यघटकात करण्यात आलेले आहे. जे आजच्या आधुनिक काळात सुध्दा तंतोतंत लागू पडते म्हणून या पाठ्यघटकाचे सामाजिक दृष्टीने विशेष महत्त्व आहे.

**''भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, भेदभावास प्रतिबंध व संधीची समानता प्राप्त करून देणे''**



खिट्ठपुब्बं पुराणकाले पञ्चव्देविसति सा किरं अङ्गरट्ठे भद्दियनगरे मेण्डकसेट्ठि च चन्दपदमा पुत्तस्स धनञ्जयसेट्ठिनो अग्गमहेसिया सुमना कुच्छिस्मिं विसाखा निब्बति। तस्सा सत्तवस्सिक काले खिट्ठपुब्ब पञ्चसति पञ्चदसमो वस्से सत्था सेलब्राह्मणावादितं बोधनेय्य बन्धनानं उपनिस्सयसम्पतिं दिस्वा महाभिक्खुसङ्घपरिवारो चारिकं चरमानो तं नगरं पापुणि दिक्खातिं।

सावत्थियं पि खो मिगारसेट्ठिनो पुत्तो पुण्णवड्ढकुमारो नामं वयप्पत्तो कालेन खिट्ठपुब्ब चतुसतिसत्तवस्से परिणय विसाखा पन्धरस वस्स वयस्स अहोसि।

इमिस्सा पन पिता इधागमनकाले इमं ओवदन्तो गुय्हे पटिच्छन्ने दस ओवादे अदासि,तेसं अत्थं जानामि, तेसं मे अत्थ कथेतु?

१) इमिस्सा पन पिता – **'अन्तो अग्गि बहि न नीहरितब्बो ति** आह। सक्का नु खो अम्हेहि उभतो पटिविस्सकगेहानं अग्गिं अदत्वा वसितुं'' ति? ''एवं किर अम्मा ति''?

"ताता मय्हं पिता न एतं सन्धाय कथेसि। इदं पन सन्धाय कथेसि– अम्म, तव सस्सुससुर सामिकानं अगुणं दिस्वा बहि तस्मिं गेहे ठत्वा मा कथेसि। एवरूपो हि अग्गिसदिसो अग्गि नाम नत्थि" ति?

२) "अय्या, एतं ताव एवं होतु, इमिस्सा पन पिता **बाहिरतो अग्गिं न अन्तो पवेसेतब्बो' ति** आह। किं सक्का अम्हेहि अन्तो अग्गिम्हि निब्बुतं बाहिरतो अग्गि अनाहरितुं" ति? एवं किर अम्मा' ति? "ताता मय्हं पिता न एतं सन्धाय कथेसि, इदं पन सन्धाय कथेसि "सचे पटिविस्सकगेहेसु हत्थियो वा पुरिसो वा सस्सुससुरसामिकानं अगुणं कन्थेन्ति। तेहि कथितं आहरित्वा 'असुको ' नाम तुम्हाकं एव अगुणं कथेति' ति पुन मा कथेय्यासि। एतेन हि अग्गिना सदिसो अग्गि नाम नत्थि" ति। एवं इमस्मिं पि कारणं सा निद्दोसा व अहोसि। यथा च एत्थ एवं सेसेसुपि। तेसु पन अयमधिप्पायो"–

३) यम्पि हि तस्सा पितरा **"ये ददान्ति, तेसं येव दातब्बं" ति** वुत्तं तं "या चितकं पकरणं गहेत्वा ये पटिदेन्ति,तेसञ्ञेव दातब्बं" ति सन्धाय वुत्तं।

४) **ये न देन्ति, तेसं न दातब्बं" ति** इदं पि'ये याचितकं गहेत्वा न पटिदेन्ति, तेसं न दातब्बं" ति सन्धाय वुतं।

५) **ददन्तस्सापि अददन्तस्सापि दातब्बं"ति** इदं पन दलिद्देसु ञातिमितेसु सम्पतेसु ते पटिदातुं सक्कोन्तु वा मा वा, तेसे दातुमेव वट्ठति'ति सन्धाय कतं।

६) **"सुखनिसिदितब्ब" ति** इदं पि सस्सुससुरसामिके दिस्वा वुट्ठानब्बट्ठाने निसीदितुं न वट्ठति, ति सन्धाय वुतं।

७) **"सुखं भुञ्जितब्बं" ति** इदं पन सस्सुससुरसामिकेहि पुरे तरं अभुञ्झित्वा ते परिविसित्वा सब्बेहि लद्धालद्धं ञत्वा पच्छा सयं भुञ्झितु वट्ठति' ति सन्धाय वुतं।

८) **"सुखं निपज्जितब्बं" ति** इदं पि सस्सुससुरसामिकेहि पुरेत्तरं सयनं आरुय्ह न निपज्जितब्बं, तेसं कतब्बयुत्तकं कत्वा पच्छा सयं निपज्जितुं युत्तं' ति सन्धाय वुतं।

९) **"अग्गि परिचरितब्बो" ति** इदं पन सस्सु पि ससुरंपि सामिकं पि अग्गिक्खन्धं विय उरगराजानं विय च कत्वा पस्सितुं वट्ठति, ति सन्धाय वुतं।

१०) **"अन्तो देवता नमस्सितब्बा" ति** इदं सस्सुं च ससुरं च सामिकं च देवता विय कत्वा दट्ठुं वट्ठति' ति सन्धाय वुतं"। एवं सेट्ठि इमेसं दस ओवादानं अत्थं सुत्वा पटिवचनं अपस्सन्तो अधोमुखो निसीदि।

**(संदर्भ–धम्मपद अट्ठकथा)**

## शब्दार्थ

**जनक (पु.)**– वडील, निर्माता
**देसना (स्त्री)**– उपदेश
**निब्बति (स्त्री)**– उत्पन्न होतो, जन्मास येतो
**पापुणि (कृ.)**– पोहोचला, गाठलेला
**ओवदन्तो (कृ.)**– सांगण्यासारखे
**पटिविस्सक (पु.)**– शेजारी, शेजाराचा
**सन्धाय (पु.कि.)**– मेळ करून, जुळणी करुन
**सस्सु ससुर (सा. ना)**– सासू सासरा
**आहरित्वा (पूर्व.क्रि.)**– आणून
**असुको (अव्यय)**– अमुक
**सकोन्तु (नपु.)**– समर्थ होणे, शक्य होणे
**वुट्ठातब्बट्ठाने (नपु.)**– उठून उभे राहणे
**वट्ठति (क्रि.)**– फिरतो, फिरवितो
**निप्पज्जितब्ब (क्रि.)**– झोपले पाहिजे
**अपसन्तो (वि.)**– स्वावलंबी
**निसीदि (भू.क्रि.)**– बसला, बैठक मारलेला
**जनेसि (स्त्री.)**– आई, (जन्म देणारी) जननी
**बोधनेय्य(वि.)**– बुद्धत्व प्राप्त करून घेणारा
**इधागमन**– येथेच, याच जन्मी
**पटिच्छन्ने (कृ.)**– झाकलेला, लपविलेला
**निहरितब्बो (वि.)**– बाहेर नेले, काढले पाहिजे
**सामिकानं (पु.)**– धन्याला, मालकाला, स्वामीला
**अग्गि** – अग्नी (उष्णता) तापटपात्र
**ओवदे (पु.)**– उपदेश, उपदेसक
**निद्देसा (पु.)**– स्पष्टीकरण, खुलासा
**अयमाधिचो (पु.)**– कमविते, उत्पन्न करणारे
**ञातिमित्तेसु**– नातलग–मित्रामध्ये
**सम्पति (स्त्री)**– धन, श्रीमंती, संपत्ती

# स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) धनंजय व सुमना यांच्या मुलीचे नांव काय होते?
२) विशाखाच्या आईवडिलाचे नाव काय होते?
३) विशाखाच्या आजी आजोबाचे नाव काय होते?
४) विशाखाचा जन्म केव्हा झाला?
५) विशाखाचे लग्न केव्हा झाले?
६) विशाखाने दीक्षा केव्हा व कोणत्या वर्षी घेतली?
७) विशाखाच्या आईवडिलांनी विशाखाला कोणकोणते उपदेश दिले?
८) विशाखाच्या सासुसासऱ्याचे नाव काय होते?
९) विशाखाच्या सासरचे नाव काये होते?
१०) विशाखाच्या पतीचे नाव काय होते?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अन्तो अग्गि बहि न नीहरितब्बो।
२) ताता मय्हं पिता न एतं सन्धाय काथेसि।
३) बाहिरतो अग्गि अन्तो पवेसेतब्बो।
४) ददन्तस्सापि अददन्तस्सापि न दातब्बं।
५) देवता विय कत्वा दट्ठुं न वट्ठति।
६) एवरुपो हि अग्गि सदिसो अग्गि नामे होति।

**३. रूपे ओळखा.**

१) सावत्थियं २) अहोसिं
३) भुञ्जितुं ४) अदासि
५) जानामि ६) होतु
७) कथेय्यासि ८) सुत्वा
९) निसीदिसुं १०) कत्वा

**४. सूचनेनुसार कृती करा.**

१) ................पि खो मिगारसेट्ठिनो पुत्तो पुण्णवड्ढन कुमारो नाम अहोसि।
(रिकाम्या जागा भरा.)(सावत्थियं/सारनाथ)
२) येन न देन्ति, तेसं न................ ।
(वाक्य पूर्ण करा.)
३) ददन्तस्सापि अददन्तस्सापि................।
(वाक्य पूर्ण करा.)
४) ................नाम तुम्हाकं एवं च अगुणं कथेति ति।(वाक्य पूर्ण करा.)
५) इमेसं दस ओवादानं अत्थ................ अपस्सन्तो................निसीदि।
(वाक्य पूर्ण करा.)

**५. संधी करा.**

१) लध्दा + अलध्द
२) इदं + अपि
३) इमं + अस्सा

**६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**

किं दस ओवादो अत्थि?
- अन्तो अग्गि बहि नीहरितब्बो।
- ...
- ये ददन्ति तेसं येव दातब्बं।
- ...
- ददन्तस्सापि अददन्तस्सापि दातब्बं।
- ...
- सुखं भुञ्जितब्बं।
- ...
- अग्गि परिचरितब्बो।
- अन्तो देवता नमस्सितब्बा।

**७. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) परिणय विसाखा | अ) पापुणि दिक्खातिं। |
| २) सुमना कुच्छिस्मि | ब) पुत्तो पुण्णवड्ढन। |
| ३) चरमानो तं नगरं | क) विसाखा निब्बति। |
| | ड) पन्धरसवस्स वयस्स अहोसि। |

**८. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) मुलगी सासरी जात असतांना वडिलांनी विशाखेला कोणता उपदेश केला?
२) 'जनकेन तनया ओवादं' चा सारांश लिहा?


# ५) बहुजनसङ्घटको छत्तपति सिवाजि महारञ्ञो

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्याचा इतिहास महत्त्वपूर्ण इतिहास आहे. या महाराष्ट्रामध्ये अनेक महापुरुषांनी जन्म घेतला आणि आपल्या कार्यकर्तृत्वाने ते इतिहासात अजरामर झाले. त्यापैकी एक महत्वपूर्ण नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.

छत्रपती शिवाजी महाराज हे राष्ट्राला विदेशी आणि आतताई राजसत्तेपासून स्वतंत्र करून राज्यामध्ये एक सार्वभौम स्वतंत्र राजसत्ता स्थापन करणारे एक महानायक ठरतात, म्हणून ते स्वातंत्र्याचे जनक, मुक्तीदाते तर ठरतातच; परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे या व्यतिरिक्तही असे अनेक पैलू आहेत जे त्यांना मानवतेचे पुजारी सुध्दा ठरवितात. त्या पैलूमध्ये नैतिक वर्तणूक, स्त्रियांप्रती सन्मान, जात,धर्म,पंथ इत्यादी भेदभावरहित प्रगल्भ वैचारिकता, विज्ञानवादी विचारसरणी, प्रजाहितदक्ष राजा, कुशल आणि कार्यक्षम प्रशासक इत्यादी गुणवैशिष्ट्यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण होते. ते सर्व धर्मांचा सन्मान करीत असत. त्यांच्या सेनेमध्ये अनेक बहुजन सरदार होते. त्यांचा संघर्ष हा कट्टरता आणि उदंडता याविरुद्ध होता.

‘मुलाचे पाय पाळण्यात दिसतात’ अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणेच त्यांची आई व कुशल मार्गदर्शक जिजाई यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविले होते, म्हणूनच लहानपणात किल्ले जिंकण्याचा खेळ खेळणारे शिवाजी महाराज नंतर अतिशय कमी वयात वास्तविकरित्या किल्ले जिंकतात. म्हणून व्यक्तीच्या मनात जर इच्छाशक्ती असेल, कार्यक्षमता, धैर्यशीलता व नैतिक मूल्य असतील तर या बळाच्या सहाय्याने तो सर्व समस्यांवर मात करु शकतो, ही प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वातून घेता येते. याच उद्देशाने या पाठ्यघटकाची रचना करण्यात आली आहे. **‘‘राजाने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करून नवीन राज्याची निर्मिती करणे.’’**



महारट्ठ रज्जे अनेका इतिहासिका राजवंसेहि रज्जा अकरि। तेसु छत्तपति सिवाजि महारञ्ञोस्स नाम अग्गट्ठानि अत्थि। पितुनो सहाजि मालोजि भोसले च मातुया जिजाई लखुजी जाधवेनं उदरे बालको सिवाजिस्स सिवनेरि दुग्गस्मिं इसावस्से तिंसति सोळस्ससते फरवरि मासे एकुणवीसति दिवाङ्क पुणे नगरिस्स सन्तिके विजायि।

जिजाईनेन अप्पवयोन्ते’ व सिवाजिस्स अन्तकरणस्मिं धम्मनिट्ठा, साधिनता,चरित्तेनिट्ठा च साभिमानो तथेव ञाणं-


पटिसम्भिदा, विञ्ञाणं च वंसपम्परास्स सङ्खारो अदासि। मूनयो, इसयो परितो असिमो सद्धा अविसित्थता,सुद्धो चारित्तो, सेनासु मादकवहा वत्थु निसेधेति, पुत्तदारका आदिके मा हञ्ञितब्बं ति सो तस्स आणाय होति। किञ्चि इत्थिस्स अवमानेति न भवति इदं परितो दल्हा पायोजेति निम्मनासिप्पी, इदं छत्तपतिस्स गुणविसेसो तस्मिं समये सेनानिस्मिं सन्दिस्सति न सन्ति। छत्तपति सिवाजिस्स इदं गुणा तेसेस्मिं तेसं मातेम्हा अलभि। जिजाई नं वीरकञ्ञा, वीरभरिया च वीरमाता अत्थेन सम्बोधन्ति।

सन्त तुकाराम महाराजानेन सब्ब गामेसु बहुजन समाजानं सामाजिको च राजकियो दिट्ठिया सति-सम्पञ्ञ अकरि। तुकोबा महाराजो दारको सिवाजिस्स 'छत्तपति' अयं उपाधि आयुस्स द्वेदस वस्सी अदासि। छत्तपति करणियेन होति, न जच्चा होति। महारट्ठ पदेसस्मिं सन्ते कतो धम्मिको च सामाजिको च उन्नतेसु छत्तपति सिवाजि महारञ्ञो राजकियो च सामजिको च अवत्ताना अकरि। छत्तपति सिवाजि महारञ्ञो साधु-सन्तानं-समणानं सोत्थाना अदित्वा अत्तरज्जस्स पतिट्ठापना अकरि। अत्तरज्जस्स कम्मानं सब्ब संगनिकरतानं (समाजानं) अनुग्गहा लभितुं महारञ्ञो बहुजनानं हत्थेस्मिं सब्बपठमो सत्थ अदासि च 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' पवत्तेसि। नत्थि एत्तावता व हवालदारो च सरनोबत इदं धुरन्धरता मराठासमाजं अदासि, तथेव सबनीसो ब्राह्मणसमाजं, कारखानिसो पभूसमाजं,रामोसि च महारो समाज रक्खनानं कम्मं अदासि। इमे सब्बे सुरानं 'मावळे' इति सम्बोधन अकरि।

तथेव छत्तपति सिवाजि महाराजानं अनेका दुग्गे सुरक्खिता रक्खि। छत्तपति सिवाजि महारञ्ञो च तस्स विचारसरणीनानं सुर वीरेन उत्तरो भारतेसु अनेका पदेसानं अत्तनो दमि। तेसानं पेसावरहि दक्खिणेस्मिं मद्दास याव, बंगालेहि पच्चिमं गुजराते याव रज्जसत्ता पटित्थापना अकरि।

छत्तपति सिवाजि महारञ्ञो सामाजिको च राजकियो विरोधनासमना पवत्तेन्तुं 'अट्ठपधानमण्डलस्स' पतिट्ठापना अकरि। **महान्नवापधानो**–रज्जस्सपमुखा, **अमाच्च**–हिसाबनिस, **सचिवो**–सन्देसविनिमया, **मन्ति**–हेरपमूखो, **सेनापती**–सेनानं पमुखो, **सुमन्त**–विदेसा उपदेसका, **दण्डन्यायका**–न्यायपमुखो, **पण्डितराव**–धम्म पमुखो।

छत्तपति सिवाजि महारञ्ञोस्स समत्थिया च सम्पदाना (आचरणा) सल्लक्खनीया अत्थि। महारञ्ञो अत्तरज्जस्स ठापना,पब्बत-निन्नभूमिया सेनाय सहाय्येन 'गनिमीकावा' इदं युज्झनीतिं अत्थेन वड्ढि। उत्तमा सेनानि, विजानाति रञ्ञो रज्जापालन्यायता जानाति (जानकार), धम्मिको अधिवासका, दुतेय्या नेतु, धम्मिका वत्तना, कम्मक्खमा सासना, इत्थिया परितो आदरा, दयादारहा पटिपज्जति



विनासेति (विनासका), मनुजानं यथाभूता उपपरिक्खा, देसीया पेमं, लक्खरो उद्दि, नाविका दला पटित्थापि। कल्याणपट्ठने आरमारं पतिट्ठापेत्वा पोतुगिजस्स च बिटीसस्स वड्ढमानस्स पभावं विच्छेदं कता च निवारेसि। सुवण्णदुग्गं, सिन्धुदुग्गं इदं समद्दपाकार मापेत्वा समुद्दतीरं रक्खि। ''जनहिताय रज्ज, पजानं सुखा इमे'व रञ्ञोस्स सुखो, पजानं हिता इमे'व रञ्ञोस्स हितो,'' इत्थं पुरातणा चिन्तनानं यथानुरुपं छत्तपति सिवाजि महारञ्ञो वत्तेतु अहोसि।

भारत अयं कसिपधान देस अत्थि। रज्जस्स कसिकम्मेसु'व अत्थविन्यासं (परिपालना) निस्सिता अहोसि। छत्तपति सिवाजि महारञ्ञो कसि उन्नमति अभिमुखं विसेसो अवधाना अदासि। कस्सके कसि कातुं उत्तेजिता अदासि। आपतन भूमिं कसिकम्मेसु आहरि। कस्सको च गामिकेन च तेसानं वपितानं आरक्ख अदासि। रज्जेस्मिं कसिनं विज्जानुगता गणनायित्वा इति यथानुरुपं खेत्तसारा (कसनया) निच्चिता अकरि। अनाथा कस्सके बीजा-बीजायेण अदासि, उसभा-नवनकुसा अटिग्गण्हातुं रुपिया अदासि, नेसग्गिका अपदा समयी कस्सकानानं पुब्बा खेत्तसारा लोपेति अकरि। दयादानं अदुहालेसु उपलभात जनानं मुत्तित्वा विसेस पच्चहारन्तुं पदत्था (अधिकारी) नियामि। कसिनानं धरणेन च बन्धारेन निम्माणि तथेव दुग्गेसु उत्तमा जलपरिपालना अकरि।

बहुजनानं हत्थेसु सब्ब पठमो 'सत्थ' च गामानं पाटिलकी दायी रञ्ञोस्स' ति' एप्पिले छ सत सहस्सानि असीती रायगडदुग्गे ठाणं निब्बानं अधिगच्छि।

छत्तपति सिवाजि महारञ्ञोस्स रायगडेस्मिं चेतिया (समाधि) गवेसतित्वा सिवजयन्तिउस्सवो पकाटिकतान्तुं सम्पादकसभा पतिट्ठापेतुं तथेव जगानं पच्चमुखस्मिं सब्बपठमो छत्तपति सिवाजि महारञ्ञोस्स जयन्ति महाजनायदिट्ठेन आरम्भा करापेतु मानवानं पुजका रट्ठपिता जोतिबा फुले यस्स छत्तपति सिवाजि रञ्ञोस्मिं भूमिदब्बी (पोवाडा) योजित्वा छत्तपति सिवाजि महारञ्ञोस्स पसंसा अकरि च 'कुळवाडी भूसण छत्तपति सिवाजि' एवं कथना अकरि।

तस्मा अज्ज'पि तेसानं कम्मरुपेन ते पच्चेकानं समुत्तेजेन्ति।

**(स्वरचित)**



## शब्दार्थ

**रज्ज (नपु.)**– राज्य
**अग्गट्ठानि (वि.)**– अग्रस्थानी
**दुग्गस्मिं (पु.)**– किल्ल्यावर
**साधिनता (पु.)**– स्वातंत्र्य
**चरित्तनिट्ठा (वि.)**– चारित्र्यनिष्ठा
**पटिसम्भिदा (वि.)**– मीमांसापूर्ण ज्ञान विचारविनिमयातून प्राप्त ज्ञान
**संक्खारो (पु.)**– संस्कार
**असिमो (वि.)**– असिम
**अवसित्थता (वि.)**– साधेपणा
**करणियेन (वि.)**– कर्तृत्वाने
**अवत्ताना (वि.)**– क्रांती
**सोत्थाना (पु.)**– आशीर्वाद
**अदित्वा (पूर्व.क्रि.)**– घेऊन

**अत्त (पु.स.ना.)**– स्वतः
**किञ्चि (अ.)**– काही
**उपरि (अ.)**– वर
**सुर (वि.)**– शूर
**दमि (भू.क्रि.)**– नियंत्रणात आणले
**याव (अ)**– पर्यंत
**पतिट्ठापना (पु.)**– स्थापना
**अकरि (भू.क्रि.)**– केले
**विरोधनासमना (नपु.)**– सलोखा
**पवत्तेन्तु (नि.अ.)**– राखण्यासाठी
**पमुखो (नपु.)**– प्रमुख
**उपदेसका(पु.)**– उपदेशक
**समत्थिया (वि.)**– योग्यता, समर्थता
**सम्पदाना (वि.)**– कामगिरी
**सल्लक्खनीया (वि.)**– उल्लेखनीय, चिंतनीय
**पब्बत (पु.)**– पर्वत
**विजानाति (वर्त.क्रि.)**– जाणतो
**वड्ढि (भू.क्रि.)**– विकसित केला
**वत्तना (स्त्री.)**– व्यवहार, वर्तन, आचरण
**इत्थि (स्त्री.)**– स्त्री, महिला
**पभाव (पु.)**– प्रभाव
**निवारेसि (भू.क्रि.)**– थांबविले, संपविले
**सुखं (क्रि.वि.)**– सुखकारक
**पुरातणा (वि.)**– प्राचीन
**वत्तन (नपु.)**– वर्तन, वागणूक
**कसि (स्त्री.)**– शेती
**पधान (नपु.)**– प्रधान
**निस्सिता (कृ.)**– आश्रित, अवलंबून
**उन्नमति (वर्त.क्रि.)**– प्रगती करतो
**कातुं (पूर्व.क्रि.)**– करण्यासाठी
**उत्तेजिता (स्त्री.)**– उत्तेजित करणारी, प्रोत्साहित करणारी
**आपत (नपु.)**– पडीक
**वपित (कृ.)**– बीज पेरता
**उसभ (पु.)**– बैल
**अपदा (नपु.)**– आपत्ती
**पुब्ब (वि.)**– पूर्वीचे
**खेत्तसारा (पु.)**– शेतीकर, जकात
**लोपेति (वर्त.क्रि.)**– नष्ट होते, लोप पावते
**मुत्ति (स्त्री)**– मुक्ती, स्वातंत्र्य
**विसेस (पु.)**– विशेष
**पच्चहारन्तुं**– परत आणण्यासाठी, वसुलीसाठी
**दायी (वि.)**– देणारा
**कालकिरिया (स्त्री.)**– मरण, अंत, शेवट
**निब्बान (नपु.)**– निर्वाण
**अधिगच्छि (भूत.क्रि.)**– प्राप्त केले
**गवेसतित्वा (पूर्व.क्रि)**– शोधून
**पसंसा (स्त्री.)**– प्रशंसा
**पच्चक (वि.)**– प्रत्येक
**समुत्तेजेन्ति (वर्त.क्रि.)**– प्रेरित करतात, उत्तेजित करतात.

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शिवाजी महाराजांचा जन्म कुठे झाला?
२) शिवाजी महाराजांच्या आई-वडीलांचे नाव काय होते ?
३) शिवाजी महाराजांना कोणती उपाधी मिळाली होती?
४) शिवाजी महाराजांना छत्रपती ही उपाधी कुणी दिली?
५) जिजाबाई यांच्या वडीलांचे नाव काय होते?
६) सर्व शूर-वीरांना कोणत्या नावाने संबोधल्या जात असे?
७) शिवाजी महाराजांनी कोणत्या मंडळाची स्थापना केली व कां केली?
८) पर्वत-डोंगर दऱ्यांमध्ये शिवाजी महाराजांनी कोणते युध्द तंत्र विकसित केले होते?
९) शिवाजी महाराजांचा मृत्यू केव्हा झाला?
१०)शिवाजी महाराजांची समाधी कुणी शोधून काढली?

## २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) बालको सिवाजिस्स सिवनेरि दुग्गस्मि विजायि।

२) जिजाईनं वीरकञ्ञा, वीरमाता न सम्बोधन्ति।

३) सिंहगडदुग्गे अत्तरट्ठस्स अग्गनगरा मापिता।

४) तुकोबा महाराजो दारको सिवाजिस्स छत्तपति उपाधि द्वेदस वस्सी अदासि।

५) सब्बे सुरानं मावळ इत्थं सम्बोधन अकरि।

## ३. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) सोळसवयोपत्तो........ विजित्वा अत्तरट्ठं पतिट्ठापि। (सिन्धुदुग्गं/तोरणादुग्गं)

२) ........ अत्तरट्ठस्स अग्गनगरा मापिता। (रायगडदुग्गे/विजयदुग्गे)

३) सिवाजि महाराजस्स पितु नाम........ अत्थि। (संभाजि भोसले/सहाजि भोसले)

४) कुळवाडी भूसण........ एवं कथना अकरि। (छत्तपति सिवाजि/छत्तपति संभाजि)

५) सिवाजि महारञ्ञा........कालकिरियं अहोसि। (सिंहगडदुग्गे/रायगडदुग्गे)

## ४. संधी विग्रह करा.

१) तेसानं


२) तस्मिं

३) तथेव

## ५. जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) सिवाजिस्स पितुनो | अ) सहाजिरञ्ञो भोसले |
| २) सिवाजिस्स विजायि इदं दुग्गे | ब) छत्तपति |
| ३) अत्तरट्ठस्स अग्गनगरा | क) सिवनेरि |
| ४) सिवाजिस्स उपाधि | ड) संत तुकाराम महाराज |
| ५) महान सन्तो | इ) रागयडदुग्गे |
| | फ) तोरणादुग्गे |

## ६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




## ७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) बहुजन संघटक छत्रपती शिवाजी महाराजांची कार्यशैली स्पष्ट करा.

२) प्रजाहितदक्ष आणि मानवतावादी-विज्ञानवादी राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन करा.

☆☆☆

# ६) पियदस्सि असोकस्स थम्भलेखा

**प्रस्तावना**

प्रियदर्शी अशोकाचे नाव केवळ भारतातच नव्हे तर जगामध्ये मोठ्या आदराने घेतले जाते. प्रियदर्शी अशोकाचा जन्म इ.स.पूर्व ३०४ मध्ये झाला होता. त्यांचा राज्याभिषेक इ.स.पूर्व. २७० मध्ये झाला होता. अशोकाने आपल्या जीवनात कलिंगचे एकच युध्द केले. या युध्दात झालेली जीवित हानी पाहून त्यांनी यापुढे युध्द न करण्याची प्रतिज्ञा घेतली.

अशोकाने शिलालेख, गुहालेख, स्तंभलेख यांच्या माध्यमातून विविध बाबींना प्रोत्साहन दिले. स्तंभलेखाचा दुसरा व पाचवा भाग या ठिकाणी अभ्यासाला घेतलेला आहे. कोणत्याही जीवाची हिंसा करू नये याचा अंगीकार सर्व प्रजेने करावा व हे कार्य चिरकाल चालत राहावे, ही शिकवण अशोकाने टोपरा स्तंभलेख दिल्ली या स्तंभलेखाच्या माध्यमातून प्रजेला दिलेली आहे.

**''व्यक्ती व प्राणी यांचे संरक्षण, कृषि व पशुसंवर्धन संरक्षण व्यवस्था करणे.''**



देवानंप्पियो पियदस्सि राजा एवं आह।
धम्मं साधू, कि अयं च धम्मो? इति अनसनं बहु अकरि।
दया, दानं, सच्चं सोचेय्य, चक्खुदानं अपि बहुविधा दिन्ना।
दुप्पादचतुप्पादेसु पक्खिवारिचरेसु विविधं मे अनुग्गहं कता, आपानं- दुक्खिणा, अञ्ञानि अपि च मया बहूनि किच्चानि अकरि।

इमं अत्थाय धम्मलिपिं लिखापिता।
इवं अनुपटिपज्जन्तु चिरट्ठितिका च होतु इति।
यो च इदं संपटिपज्जिस्सति सो सुकतं करिस्ससि।

देवानंप्पियो पियदस्सि राजा एवं आह। छब्बीसतिवस्सेन अभिसत्तेन मया इमानि जातानि अवधितु कातुं। तं यथा सुको, सालिका, अरूणो, चक्कवाको, हसो, नंदिमुखो,

गेलाटो जतुका, अम्बपिपिलका, दण्डी, अनट्ठिकमच्छे, वेदवेयको गंगाकुक्कटा, सुवण्णमच्छा, कुम्मका, सलक्का, पण्णससका, सिमला सण्डके, ओकासहिण्डे, पलासते, सेतकपोता, गामकपोता सब्बे चतुप्पदा ये पटिभोगं; न एतानि खादन्तु। एव्विका, सुकरी च गब्भिनी, वा पायिता एतं अवधिन्तु। च पोतकानि अपि च एकानि अत्थि मासिको। कुक्कटं वधं न कत्तब्बो; तुसे सजीवे न झापेतब्बो, दावो अनत्थाय विहिंसा वा न झापेतेय्युं। जीवेन जीवो न पोसेय्युं। तीणि चातुमासस्स, तीणि पुण्णमिया तीणी दिवसानि चतुद्दिसं पञ्चद्दिसं पटिपज्जेय्युं धुवाय च अनपोसथ, मच्छे अवधिथ न अपि विक्किणाथ। एतानि अयं दिवसानि नागवनेसु, केवटभागेसु यानि अञ्ञानि अपि जीवानी कायानि न हनेय्य। अट्ठमीपक्खे, च चातुद्दसे, पञ्चमद्दसे तिस्से पुनब्बसु तीसु चातुमासे सुदिवसे गोणायं न लक्ख करेय्युं। अजका एळका सुकरा वा अञ्ञानि लक्खति नो लक्खय्युं। तिस्साय, पुनब्बसुनो, चातुमासे, चातुमासपक्खाय अस्सस्स वा गोणस्स लक्खं न कत्तब्बो। याव छबीसतिवस्सो अभिसित्तो मे एताय अन्तरे पञ्चवीस बंधनमोक्खनि कतानि।

**(संदर्भ– असोकस्स थम्भलेखा)**



## शब्दार्थ

**अनसनं(नपु.)–** वाईट कर्मापासून दूर राहाणे.
**सोचय्यं(नपु.)–** सुचिता (पवित्रता)
**दुप्पादचतुप्पादेसु–** दोन पायांच्यामध्ये आणि चार पायांच्यामध्ये
**पक्खिवारिचरेसु (पु.)–** पक्षी आणि जलचर
**अनुग्गहं–** उपकार (अनुग्रह)
**किच्चानि(नपु.)–** सत्कर्म
**अनुपटिपज्जन्तु (भ.)–** आचरण करतील
**चिरट्ठितिका (वि.)–** चिरकाल टिकणारे
**सकतं(वि.)–** सत्कर्म
**जातानि (नपु.)–** जन्मलेले
**अवधितुं (पूका.)–** अवध्य
**सुको (पु.)–** पोपट
**सालिका (स्त्री)–** मैना
**चक्कवाको (पु.)–** चक्रवाक, चकवा पक्षी
**हंसो (पु.)–** हंस
**अम्बपिपिलका (स्त्रि)–** लहान मुंगी
**अनट्ठिकमच्छे(पु.)–** बिना हाडाचा मासा
**गंगाकुक्कटा (पु.)–** एक प्रकारचा कोंबडा
**सुवण्णमच्छा (पु.)–** सवर्णमासा
**कुम्मका (पु.)–** कासव
**पण्णससका(स्त्रि)–** पर्णशश, एकप्रकारची खार (खडुळ)
**सिमला (पु.)–** बारसिंघा
**सण्डके (पु.)–** सांड(वळू)
**ओकासहिण्डे (पु.)–** ओकपिंड, ओक पक्षी
**पलासते (पु.)–** गेंडा
**सेतकपोता (पु.)–** श्वेत कबुतर

**पटिभोगं (नपु.)–** उपयोगात येणारे
**एळिका (पु.)–** एडका
**गब्भिनी (स्त्री.)–** गर्भवती
**पायिता (स्त्री.)–** दूध पाजणारी
**पोतक (पु.)–** पिल्ले
**तुसे (स्त्री.)–** भुसा
**न झापेतब्बो(क्रि.)–** जाळल्या जाऊ नये
**दावो (पु.)–** जंगल
**पटिपज्जेय्युं (स्त्री.)–** प्रतिपदेला
**केवटभागेसु (पु.)–** मासेमारी करणाऱ्यांचे तळे
**जिवानि कायानि (वि.)–** जीव समूह
**सुदिवसे (वि.)–** शुभ दिवशी
**लक्खं (वि.)–** चिन्ह, डाग
**बंधनमोक्खानि (नपु.)–** बंधनातून मुक्त झालेले.

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कोणत्या राजाद्वारे धम्मलिपी लिहीली गेली आहे?
२) देवांनाप्रिय प्रियदर्शीराजाने धम्म कशाला म्हटले आहे?
३) देवांनाप्रिय पियदर्शीराजाने कोणत्या कारणाने ही धम्मलिपि लिहीली आहे?
४) देवांनाप्रिय प्रियदर्शी राजाच्या मते कोणत्या दिवशी मासे मारु नयेत व विक्री करू नयेत?
५) देवांनाप्रिय प्रियदर्शी राजाने किती वेळा कैद्यांची कैदेतून सुटका केली

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) दुप्पादचतुप्पादेसु पक्खिवारिचरेसु विविधं मे अनुग्गहं अकता।
२) यो च इदं संपटिपज्जिस्सति सो सुकतं करिस्ससि।
३) छब्बीसतिवस्सेन अभिसित्तेन मया इमानि जातानि वधितुं कातुं।
४) जीवेन जीवो पोसेय्युं।
५) नागवनेसु, केवटभागेसु यानि अञ्ञानि अपि जीवानि कायानि न हनेय्य।
६) सब्बे चतुप्पदा ये पटिभोगं, न एतानि खादन्तु।

### ३. रूपे ओळखा.

१) अवधिथ २) संपटिपज्जिसति
३) अकरि

### ४. नकारार्थी वाक्य तयार करा.

१) एळिका, सुकरि च गब्भिनी वा पायिता एतं वधिन्तु।
२) अजका, एळका, सुकरा वा अञ्ञानि लक्खति लक्खेय्युं।

### ५. होकारार्थी वाक्य तयार करा.

१) दया, दानं, सच्चं, सोचय्यं, चक्खुदानं अपि बहुविधा अदिन्ना।


### ६. संधी करा.

१) एवं+आह
२) सो + अपि
३) गोण + आयं

### ७. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) धम्मं साधु, किं अयं च................?। (धम्मो/धम्मं)
२) तिस्साय, पुनब्बसुनो, चातुमासे, चातुमासपक्खाय अस्ससस्स वा गोणस्स लक्खं................। (कत्तब्बो/न कत्तब्बो)

### ८. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




### ९. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.

प्रियदर्शी अशोकाच्या दुसऱ्या व पाचव्या स्तंभलेखाची माहिती लिहा.

# ७) चत्तारि दस्सनियानि ठानानि

**प्रस्तावना**

प्रस्तुत पाठ दीघनिकाय ग्रंथातील महापरिनिब्बाणसुत्त मधून घेण्यात आलेला आहे. या पाठातून तथागत बुध्दाच्या जीवनातील चार महत्त्वाच्या घटना कोणत्या चार ठिकाणी घडल्या ते कळते. शिवाय आजही ह्या स्थानांना प्रेरणादायी स्थळे का म्हटले जाते ते लक्षात येते.

लुम्बिनी, बोधगया, सारनाथ, आणि कुसीनारा अशी नावे असणाऱ्या त्या महत्वांच्या स्थानांवर आजही जगभरातील लोक प्रेरणा घेण्यासाठी येत आहेत हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. ही ठिकाणे प्रेरणादायी असून कोणत्या प्रदेशात आहेत याची भौगोलिक माहिती या पाठामध्ये देण्यात आलेली आहे.

**" राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके, स्थाने आणि वस्तु यांचे संरक्षण तसेच संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून ते जतन करणे."**



**लुम्बिनी**



**बोधगया**

'पुब्बे भन्ते! दिसासु वस्सं वुत्था भिक्खु आगच्छन्ति तथागतं दस्सनाय, ते मयं लभाम मनोभावनीये भिक्खु दस्सनाय लभाम पयिरुपासनाय। भगवतो पन मयं भन्ते! अच्चयेन न लभिस्साम मनोभावनीये भिक्खु दस्सनाय न लभिस्साम पयिरुपासनाया' ति।

चत्तारिमानि आनन्द! सध्दस्स कुलपुत्तस्स दस्सनीयानि संवेजनीयानि ठानानि। कतमानि चत्तारि?

१) 'इध तथागतो जातो' ति'(लुम्बिनी) आनन्द! सध्दस्स कुलपुत्तस्स दस्सनीयं सवेजनीयं ठानं।


२) 'इध तथागतो अनुत्तरं सम्मासम्बोधि अभिसम्बुध्दो'ति' (बोधगया) आनन्द! सध्दस्स कुलपुत्तस्स दस्सनीयं संवेजनीयं ठानं।

३) ‘इध तथागतेन अनुत्तर धम्मचक्कं पवतितन्ति’ (सारनाथ) आनन्द! सध्दस्स कुलपुत्तस्स दस्सनीयं संवेजनीयं ठानं।

४) ‘इध तथागतेन अनुपादिसेसाय निब्बाणधातुया परिनिब्बुतो’ति (कुसिनारा) आनन्द! सध्दस्स कुलपुत्तस्स दस्सनीयं संवेजनीयं ठानं।

इमानि खो आनन्द! चत्तारि सध्दस्स कुलपुत्तस्स दस्सनीयानि संवेजनीयानि ठानानि। आगमिस्सन्ति खो आनन्द! सद्धा भिक्खु भिक्खुनिया उपासका उपासिकायो, ‘इध तथागतो जातो’ति पि’। ‘इध तथागतो अनुत्तरं सम्मासम्बोधिं अभिसम्बुध्दो’ति पि। ‘इध तथागतेन अनुत्तरं धम्मचक्कं पवत्तितन्ति पि। ‘इध तथागतो अनुपादिसेसाय निब्बाणधातुया परिनिब्बुतो ति पि’। येहि केचि आनन्द! चेतियचारिकं अहिण्डन्ता पसन्नचित्ता कालं करिस्सन्ति सब्बे ते कायस्स भेदा परं मरणा सुगतिं सग्गं लोकं उपपज्जिस्सन्तिति।

**(संदर्भ–दीघनिकाय महापरिनिब्बाणसुत्त)**



**सारनाथ**



**कुसिनारा**

## शब्दार्थ

**दिसासु (वि.)–** दिशामध्ये
**पयिरुपासनाय (स्त्री)–** सतत संपर्कात राहण्यासाठी
**अच्चयेन (अव्यय.)–** नंतर
**कुलपुत्त (पु.)–** कुळपुत्र, कुळवान, सदाचारी
**दस्सनीयानि (वि.)–** दर्शनीय
**संवेजनीयनि (वि.)–** वैराग्य निर्माण करणारा, संवेग निर्माण करणारा
**अनुत्तर (नपु.)–** सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम.
**अभिसम्बुध्दो (पु.)–** संपूर्ण ज्ञानी
**पवत्तित्तानि (नपु.)–** चालू असता, विद्यमान असता.
**अनुपादिसेसाय–** काहीही शिल्लक न ठेवता,
**परिनिब्बुतो (वि.)–** पूर्णपणे शांत झालेला
**चेतिय चारिकं (नपु.)–** चैत्य प्रदक्षिणा, चैत्ययात्रा
**पसन्नचित्ता (वि.)–** प्रसन्नमनाने

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सिद्धार्थ गौतम कोठे जन्मले?

२) तथागताने सम्यक सम्बोधि कोठे प्राप्त केली ?

३) तथागताने धम्मचक्र प्रवर्तन कोठे केले?

४) तथागताचे महापरिनिर्वाण कोठे झाले?

५) श्रध्दाळू कुळपुत्रासाठी किती स्थान दर्शनीय आहेत?

६) सुगतीला कशा प्रकारे प्राप्त होतील?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) इध तथागतो जातो' ति।

२) आनन्द, सध्दस्स कुलपुत्तस्स संवेजनीय ठानं नत्थि ।

३) सब्बे ते कायस्स भेदा परं मरणा दुगतिं उपपज्जिस्सन्ति।

**३. रुपे ओळखा.**

१) लभाम

२) लभिस्साम

३) गच्छन्ति

४) करिस्सन्ति

५) गमिस्सन्ति

**४. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

१) ते मयं लभाम मनोभावनीये..........दस्सनाय। (भिक्खुनि/भिक्खु)

२) ...........कुलपुत्तस्स दस्सनीयानि संवेजनीयानी ठानानि। (सध्दस्स/असध्दस्स)

३) ते मयं..........मनोभावनिय भिक्खु दस्सनाय। (लभामि/लभाम)

४) ..........तथागतो जातो' ति। (इध/तत्थ)


५) येहि केचि आनन्द! चेतियचारिकं अहिण्डता पसन्नचित्ता.......... करिस्सन्ति। (अकालं/ कालं)

६) सब्बे ते कायस्स भेदा परं मरणा..........सग्गं लोक उपपज्जिस्सन्ति।(दुग्गतिं/सुगतिं)

**५. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) इध तथागतो जातो ति | अ) कुसिनारा |
| २) इध तथागतो अनुत्तर सम्मासम्बोधि अभिसम्बुज्झति। | ब) सारनाथ |
| ३) इध तथागतो अनुत्तर धम्मचक्क पवत्तितन्ति | क) लुम्बिनी |
| ४) इध तथागतो अनुपादिसेसाय निब्बाणधातुया परिनिब्बुत्तो' ति | ड) बोधगया |
| | इ) सावत्थि |

**६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**७. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.**

चार दर्शनीय स्थळांची माहिती लिहा?

☆☆☆

# ८. वनरक्खको बोधिसत्तो

**प्रस्तावना**

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वाघाचे महत्त्व, 'वनरक्षक बोधिसत्व' या पाठात विशद केले आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासाला प्रत्यक्ष- अप्रत्यक्षरित्या मनुष्य कसा जबाबदार आहे, हे लक्षात आणून देण्यासोबतच आपला खरा मित्र कोण? हे स्पष्ट केले आहे. वाघाच्या वाढत्या शिकारीमुळे वाघांच्या संख्येत घट तर झालीच; परंतु इतर पशुपक्षी व मानवसमाज यांच्या अस्तित्वाला सुध्दा धोका निर्माण झाला आहे. जंगल तोड, जंगलातील अतिक्रमण व वाघाची शिकार यामुळे पर्यावरणाचा समतोल कसा बिघडतो तसेच तथागत बुध्दाने आजपासून २५६३ वर्षापूर्वी दिलेला पर्यावरण संवर्धनाचा संदेश आजही किती संयुक्तिक आहे, हे लक्षात येते. प्रस्तुत पाठ हा 'जातकअट्ठकथा' ह्या ग्रंथातून निवडण्यात आलेला आहे.

**" वने व वन्य जीवाचे रक्षण तसेच नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे."**



अतिते वाराणसियं ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो अञ्ञतरस्मिं अरञ्ञायतने रुक्खदेवता हुत्वा निब्बत्ति। तस्स विमानतो अविदूरे अञ्ञतरस्मिं वनप्पतिजेट्ठके अञ्ञा रुक्खदेवता वसति। तस्मिं वनसण्डे सीहो च व्यग्घो च वसन्ति। तेसं भयेन कोचि तत्थ न खेत्तं करोति, न रुक्खं छिन्दति, निवत्तित्वा ओलोकेतुं समत्थो नाम नत्थि। ते पन सीहव्यग्धा नानप्पकारे मिगे वधित्वा खादन्ति, खादितावसेसं तत्थेव पहाय गच्छन्ति। तेन सो वनसण्डो असुचिकुणपगन्धो होति। अथ इतरा रुक्खदेवता अन्धबाला कारणाकारणं अजानमाना एकदिवसं बोधिसत्तं आह-"सम्म, एते नो सीहव्यग्घे निस्साय वनसण्डो असुचिकुणपगन्धो जातो, अहं एते पलापेमी" ति। बोधिसत्तो "सम्म,इमे द्वे निस्साय अम्हाकं विमानानि रक्खियन्ति, एतेसु पलायन्तेसु विमानानि नो विनस्सिस्सन्ति, सीहव्यग्घानं पदं अपस्सन्ता मनुस्सा सब्बं वनं छिन्दित्वा एकङ्गणं कत्वा खेत्तानि करिस्सन्ति, मा ते एवं रूच्ची" ति वत्वा पुरिमा द्वे गाथा अवोच-


**"येन मित्तेन संसग्गा, योगक्खेमो विहिय्यति।**
**पुब्बेवज्झाभवं तस्स,रक्खे अक्खिव पण्डितो।।**
**"येन मित्तेन संसग्गा, योगक्खेमो पवड्ढति।**
**करेय्यत्तसमं वुत्तिं, सब्बकिच्चेसु पण्डितो" ति।।**

एवं बोधिसत्तेन कारणे कथितेपि सा बालदेवता अनुपधारेत्वा एकदिवसं भेरवरुपारम्मणं दस्सेत्वा ते सीहव्यग्घे पलापेसि। मनुस्सा तेसं पदवलञ्जं अदिस्वा ''सीहव्यग्घा अञ्ञं वनसण्डं गता'' ति ञत्वा वनसण्डस्स एकपस्सं छिन्दिंसु। देवता बोधिसत्तं उपसङ्कमित्वा,''अहं सम्म, तव वचनं अकत्वा ते पलापेसिं, इदानि तेसं गतभावं ञत्वा मनुस्सा वनसण्डं छिन्दन्ति, किं नु खो कातब्ब'' न्ति वत्वा ''इदानि ते असुकवनसण्डे नाम वसन्ति गन्त्वा ते आनेही'' ति वुत्ता तत्थ गन्त्वा तेसं पुरतो ठत्वा अञ्जलिं पग्गय्ह ततियं गाथमाहं –

**''एथ व्यग्घा निवत्तण्हो, पच्चुपेथ महावनं।**
**मा वनं छिन्दि निव्यग्घं, व्यग्घा माहेसु निब्बना'' ति।**

मा वनं छिन्दि निव्यग्घन्ति अम्हाकं वसनकवनसण्डं इदानि तुम्हाकं अभावेन निव्यग्घं मनुस्सा मा छिन्दिंसु। व्यग्घा माहेसु निब्बनाति तुम्हादिसा च व्यग्घराजानो अत्तनो वसनट्ठाना पलायित्वा निब्बना वसनट्ठानभुतेन वनेन विरहिता मा अहेसुं। ते एवं ताय देवताय याचिय–मानापि ''गच्छ त्वं,न मयं आगमिस्सामा'' ति पटिक्खि–पिंसुयेव। देवता एकिकाव वनसण्डं पच्चागच्छि। मनुस्सापि कतिपाहेनेव सब्बं वनं छिन्दित्वा खेत्तानि करित्वा कसि कम्मं करिंसु।

**(संदर्भ–जातकअट्ठकथा)**



## शब्दार्थ

**रज्जं (नपु.)–** राज्य
**अरञ्ञातने (नपु.)–** अरण्यात
**रुक्खदेवता (स्त्री.)–** वृक्षदेवता
**निब्बति (स्त्री.)–** जन्म घेणे, प्रकट होणे
**अविदूर (वि.)–** जवळ, समीप
**वसति (वर्त.क्रि.)–** राहतो
**सीहो (पु.)–** सिंह
**खेतं (नपुं.)–** क्षेत्र, शेत, जमीन
**छिन्दति(वर्त.क्रि.)–** कापतो
**पलापेसि(भूत.क्रि.)–** पिटाळून लावले
**योगक्खेम(पु.)–** आसक्तीपासुन मुक्त
**पण्डितो (पु.)–** पंडीत, विद्वान
**भयेन (वि.)–** भितीने
**ओलोकेतुं (हेत्वर्थक अ.)–** प्रकाशित करण्याकरिता
**छिन्दित्वा (पूर्व.क्रि.)–** कापून
**करित्वा (पूर्व.क्रि.)–** करून
**कथिते (क्रि.)–** सांगणे, कथन करणे
**पवड्ढति (वर्त.क्रि)–** प्रौढ होतो, वाढतो
**वधित्वा (पूर्व.क्रि.)–** वध करून

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) प्राचीन काळी वाराणसीमध्ये कोणता राजा राज्य करीत होता ?
२) त्या वनामध्ये कोण कोणते प्राणी राहत होते ?
३) सिंह व वाघ कोणत्या प्राण्याची शिकार करीत होते ?
४) वन दुर्गंधीयुक्त कशाने होत होते ?
५) प्राण्याच्या पावलांचे ठसे न दिसल्याने लोकांना काय वाटले ?
६) प्राणी दुसऱ्या वनात गेल्याने लोकांनी काय केले ?
७) बोधिसत्वाने वृक्षदेवतेला काय सांगितले ?
८) वृक्षदेवतेने प्राण्यांना कोणती विनंती केली ?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) तेसं भयेन कोचि तत्थ न खेतं करोति।
२) ते पन सिहव्यग्घा नानप्पकारे मिगे वधित्वा न खादन्ति।
३) येन न मित्तेन संसग्गा योगक्खेमो विहिय्यति।
४) वनसण्डस्स एकपस्सं न छिन्दिंसु।
५) ''मा वनं छिन्दि निव्यग्घं, व्यग्घा माहेसु निब्बनो'' ति।
६) देवता एकिकाव वनसण्डं पच्चागच्छि।

### ३. रुपे ओळखा.

१) वाराणसियं
२) वसन्ति
३) निवतित्वा
४) विनस्सिसन्ति
५) गच्छति
६) छिन्दिंसु

### ४. समास सोडवा.

१) रुक्खदेवता
२) सीहव्यग्घो
३) महावनं


### ५. संधी विग्रह करा.

१) नत्थि
२) मनुस्सापि
३) गाथमाहं
४) तत्थेव

### ६. योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) वाराणसियं | अ) रुक्खदेवता हुत्वा निब्बति। |
| २) बोधिसत्तो | ब) ततियं गाथमाहं। |
| ३) गच्छ त्वं | क) ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते। |
| | ड) न मयं आगमिस्सामा ति। |

### ७. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




### ८. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.

'वनरक्खको बोधिसत्तो' या पाठाचा सारांश व बोध लिहा.

☆☆☆


# १) सिगालसुत्त

**प्रस्तावना**

तथागत एकदा पहाटे राजगिरीमध्ये पिण्डपातासाठी जात असताना त्यांना सिगाल गृहपती नदीतील पाण्यात उभा राहून ओल्या कपड्याने सहादिशांना हात जोडून वंदन करताना दिसतो. त्याला 'काय करतोस'? असे विचारले असता सिगाल गृहस्थ सांगतो, की वडिलांनी मरतेसमयी सहा दिशांची पूजा करायला सांगितली आहे, तेच करतोय.

त्यावर बुद्ध त्याला त्याच्या वडिलांच्या शब्दांचे अर्थ समजावून सांगताना सहा दिशा कोणत्या आणि त्यांची पूजा कशी करायची हे स्पष्ट करतात. हुशार, सदाचारी, उद्योगी आणि आदर्श मित्र असणारा व्यक्ती यशस्वी होतो, हे स्पष्ट करतांना संग्रहाचे चार धम्मसुध्दा स्पष्ट करतात.

**'' पालकाने पाल्याचे योग्य पालन पोषण व शैक्षणिक संस्काराची संधी उपलब्ध करून देणे.''**



''मातापिता दिसा पुब्बा,आचरिया दक्खिणा दिसा।
पुत्तदारा दिसा पच्छा, मित्तामच्चा व उत्तरा''।।१।।

''दासकम्मकरा हेट्ठा, उध्दं समणब्राह्मणा।
एता दिसा नमस्सेय्य, अलमत्तो कुले गिही''।।२।।

''पण्डितो सीलसम्पन्नो, सण्हो च पटिभानवा।
निवातवुत्ति अत्थद्धो, तादिसो लभते यसं''।।३।।

''उट्ठानको अनलसो, आपदासु न वेधति।
अच्छिन्नवुत्ति मेधावी, तादिसो लभते यसं''।।४।।

''सङ्गाहको मित्तकरो, वदञ्ञू वीतमच्छरो।
नेता विनेता अनुनेता, तादिसो लभते यसं''।।५।।

''दानञ्च पेय्यवज्जञ्च, अत्थचरिया च या इध।
समानत्तता च धम्मेसु, तत्थ तत्थ यथारहं''।।६।।

''एते खो सङ्गाह लोके, रथस्साणीव यायतो।
एते च सङ्गाह नास्सु, न माता।
लभेथ मानं पूजं वा, पिता वा पुत्तकारणा''।।७।।

''यस्मा च सङ्गाह एते, सम्मपेक्खन्ति पण्डिता।
तस्मा महत्तं पप्पोन्ति, पासंसा च भवन्ति ते'' ति।।८।।

**(संदर्भ–दीघनिकायो पाथिकवग्गपालि)**

## शब्दार्थ

**नमस्सेय्य** – नमस्कार

**अलमत्तो**– पुरेशी मात्र/ प्रमाण

**सण्हो**– स्नेह

**निवातवुत्ति (वि.)**– विनम्र, अति लीन

**अत्थद्धो (वि.)**– अर्थ समजणारा, जाणणारा

**अनलसो (वि.)**– आळसरहित

**आपदासु (नपुं.)**– आपत्ती, संकट

**अच्छिन्नवुत्ति (वि.)**– निर्भयस्वभाव

**सङ्गाहको (वि.)**– संग्रह करणारा

**रथस्साणीव (पु.)**– रथवाहक

**यायतो (स्त्री.)**– जी कोणी, जेथून

**सम्मपेक्खन्ति (वर्त.क्रि.)**– तपासतात

**पप्पोन्ति (वर्त.क्रि.)** – मिळतात, पोहोचतात

**पासंसा (नपुं.)**– स्तुती, प्रशंसा

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पूर्व आणि उत्तर दिशा कोणासाठी सूचित केली आहे?

२) बायकोमुले आणि नोकरचाकर म्हणजे कोणती दिशा?

३) समण बाह्मण आणि आचरिय म्हणजे कोणती दिशा?

४) कोणास यश लाभते?

५) मेधावी माणसास कशामुळे यश लाभते?

६) चार सङ्गाह कोणते?

७) समाजात सङ्गाह नायक नसल्यास काय होईल?

८) आई वडिलांना सन्मान कशामुळे असतो?

९) हुशार व्यक्तीची प्रशंसा कशी होते?

**२. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) पण्डितो | अ) अत्थद्धो |
| २) निवातवुत्ती | ब) अनालसो |
| ३) उट्ठानको | क) सीलसम्पन्नो |
| ४) अच्छिन्नवुत्ति | ड) मेधावी |
| | इ) धम्मेसु |

**३. समास सोडवा.**

१) मातापिता

२) पुत्तदारा

३) मित्तामच्चा

४) दासकम्मकरा

५) समणब्राह्मणा

**४. रूपे ओळखा.**

१) वेधति

२) पप्पोन्ति

३) भवन्ति

४) पेक्खन्ति

**५. रिकाम्या जागा भरा.**


१) मातापिता दिसा,......आचरिया दक्खिणा दिसा। (पच्छा/पुब्बा)

२) दानञ्च, पेयवज्जञ्च अत्थचरिया च या......। (इध/एत्थ)


३) ''उट्ठानको......, आपदासु न वेधति। (अनलसो/ अलसो)

**६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**

१)




२)




**७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) सिगालसुत्ताच्या आधारे सहादिशांची पूजा म्हणजे काय ते स्पष्ट करा.

२) सङ्गाह म्हणजे काय? ते स्पष्ट करून संग्रहामुळे समाजामध्ये प्रशंसा कशी होते ते सांगा.


☆☆☆

# २) सीलानिसंसा

**प्रस्तावना**

तिपिटकातील अनेक ग्रंथावर विस्तृत पालि टीका लिहिणारा टीकाकार म्हणजे अट्ठकथाकार म्हणून आचार्य बुद्धघोष प्रसिध्द आहेत. त्यांनी बौद्ध तत्वज्ञानाविषयी 'विसुद्धिमग्ग' नावाचा एक उत्कृष्ट स्वतंत्र ग्रंथही लिहिला आहे. त्यामधून प्रस्तुत उतारा घेतला आहे. शीलगंध म्हणजे सदाचरणाचा सुगंध कसा असतो, याचे वर्णन या गाथांमध्ये केले आहे. तसेच कुठल्याही नदीच्या पाण्यापेक्षा माणसाला पवित्र करण्याचे सामर्थ्य शीलरूपी पाण्यात कसे असते, शील अन्य सर्व अलंकारांना मागे सारून माणसाची शोभा कशी वाढविते, अशाप्रकारे शीलाची प्रशंसा यामध्ये आहे.

**'' सर्व लोकात सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावून त्यांना शील, सदाचार व नितीमूल्याची जाणीव करून देणे''**



सासने कुलपुत्तानं, पतिट्ठा नत्थि यं विना।
आनिसंसं परिच्छेद, तस्स सीलस्स को वदे।।१।।

न गङ्गा यमुना चापि, सरयु वा सरस्सति।
निन्नगा वा अचिरवती, मही वा पि महानदी।।२।।

सक्कुणन्ति विसोधेतुं, तं मलं इध पाणिनं।
विसोधयति सत्तानं, यं वे सीलजलं मलं।।३।।

न तं सजलदा वाता, न चा पि हरिचन्दनं।
नेव हारा न मणयो, न चन्दकिरणङ्कुरा।।४।।

समयन्तीध सत्तानं, परिळाहं सुरक्खितं।
यं समेति इदं अरियं सीलं, अच्चन्तसीतलं।।५।।

सीलगन्धसमो गन्धो, कुतो नाम भविस्सति।
यो समं अनुवाते च, पटिवाते च वायति।।६।।

सग्गारोहणसोपानं, अञ्ञं सीलसमं कुतो।
व्दारं वा पन निब्बाननगरस्स पवेसने।।७।।

सोभन्तेव न राजानो, मुत्तामणिविभूसिता।
यथा सोभन्ति यतिनो, सीलभूसन भुसिता।।८।।

अत्तानुवादादिभयं विध्दंसयति सब्बसो।
जनेति कित्तिहासं च, सीलं सीलवतं सदा।।९।।

गुणानं मूलभूतस्स, दोसानं बलघातिनो।
इति सीलस्स विञ्ञेय्यं, ञातिसंसकथामुखं ति।।१०।।

**(संदर्भ–विसुद्धिमग्ग)**

## शब्दार्थ

**सीलानिसंसा (स्त्री.)** – सदाचरणाची स्तुती, आनंद
**सासन (नपु.)**– शासन, शिकवण, सिध्दांत
**पतिट्ठा (स्त्री.)**– स्थैर्य, प्रतिष्ठा
**परिच्छेद (पु.)**– मर्यादा
**निन्नग (स्त्री.)**– नदी(वरून खाली वाहणारी)
**सीलजलं (नपु.)**– सद्गुणरूपी पाणी
**चन्दकिरणङ्कुरा (पु.)**– चंद्राचे कोवळे किरण
**मलं (नपुं.)**– मळ
**न समयन्ति (वर्त.क्रि.)**– शांत करीत नाहीत.
**परिळाहं (नपुं.)**– दाह
**अनुवाते (वि.)**– वाऱ्याच्या दिशेने
**पटिवात (वि.)** – वाऱ्याच्या विरुध्द दिशेने
**सग्गारोहणसोपानं (वि.)** – सन्मार्गाने जाण्याची पायरी
**मुत्तामणिविभूसिता (वि.)**– मोती व रत्ने यांनी अलंकृत
**अत्तानुवादादिभयं (नपु.)** – दुसरे आपली निंदा करतील या भितीने.
**कित्तिहासं (वि)**– कीर्ती आणि हास्य, आनंद
**मूलभूत (नपुं)**– उगमस्थान
**बलघातिनो (पु,)**– बळ नष्ट करणारे

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कुलपुत्राची कशामुळे प्रतिष्ठा नसते?
२) गंगा, यमुना व इतर नद्यांचे पाणी कोणत्या मळाला स्वच्छ करू शकत नाही?
३) सर्वांत शीतल कोणते जल आहे?
४) शीलाचा सुगंध कोणत्या दिशेने वाहतो?
५) निर्वाणरुपी नगरात प्रवेश करण्यासाठी कोणत्या प्रवेशद्वारासारखे द्वार नाही?
६) भिक्खू कशामुळे शोभून दिसतो?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) सीलगन्धसमो गन्धो कुतो नाम भविस्सति।
२) सासने कुलपुत्तानं, पतिट्ठा यं विना।
३) सग्गारोहणसोपानं, अञ्ञं सीलसमं कुतो।
४) यथा न सोभतियतिनो सीलभूसनभूसिता।


**३. खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.**

१) तस्स.........को वदे। (सीलस्स/सीलं)
(योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण निवडा)
२) सग्गारोहण........ अञ्ञं सीलसमं कुतो।
(सोपानं/द्वार)(योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.)
३) सीलगन्ध (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)
४) नत्थि (संधी-विग्रह करा.

**४. संधी करा.**

१) सोभन्त+एव
२) चन्दकिरण+ अङ्कुर
३) सत्त + अत्तानं
४) न + एव
५) सील+आनिसंसा

**५. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**६. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) सीलगन्धोसमो गन्धो | अ) मुत्तामणिविभूसिता। |
| २) सग्गारोहणसोपानं | ब) कुतो नाम भविस्सति। |
| ३) सोभन्तेव न राजानो | क) अञ्ञं सीलसमं कुतो। |
| | ड) सीलभूसन भुसिता। |

**७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) सदाचाराचा सुगंध कसा असतो त्याचे वर्णन करा.
२) सर्व अलंकारामध्ये शीलाचा अलंकार कसा श्रेष्ठ आहे? ते स्पष्ट करा.


☆☆☆

# ३) वसलसुत्त

**प्रस्तावना**

वसलसुत्त हे सुत्तनिपातातील महत्त्वाचे सुत्त आहे. यामध्ये वसल कुणास म्हणावे याविषयी सांगितलेले आहे. एकदा तथागत बुद्ध श्रावस्तीमधील अनाथपिंडिकाच्या जेतवन आरामामध्ये विहार करीत होते. सकाळच्या वेळी ते भिक्षाटन करीत असतांना श्रावस्ती नगरीत राहणाऱ्या अग्गिक भारद्वाजाच्या घराजवळ जाऊन उभे राहिले. अग्गिक भारद्वाजाने तथागतांना दुरूनच येतांना पाहून तिरस्कृत नजरेने म्हटले, हे मुण्डका! हे श्रमण! हे वसल! तिथेच थांब, पुढे येऊ नको. तेव्हा तथागत त्याला शांतपणे म्हणाले, हे ब्राह्मण! वसल कुणाला म्हणावे? किंवा माणुस कशामुळे वसल समजला जातो, हे तू जाणतोस काय? अग्गिक भारद्वाज ब्राह्मणाने नम्रपणे अज्ञान मान्य करून तथागतांना त्या संबंधी उपदेश करण्याची विनंती केली. तेव्हा तथागतांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमध्ये वसल कुणास म्हणावे? याविषयी त्या अग्गिक भारद्वाज ब्राह्मणाला उपदेश दिला.

**'' माणसा–माणसांत कोणत्याही प्रकारचा भेद न करता लोकांच्या कल्याणासाठी समाजव्यवस्थेची निर्मिती करणे.''**



कोधनो उपनाही च, पापमक्खी च यो नरो।
विपन्नदिट्ठी मायावी, तं जञ्ञा वसलो इति।।१।।

गामे वा यदि वा, रञ्ञे यं परेसं ममायितं।
थेय्या अदिन्नं आदियति, तं जञ्ञा वसलो इति।।२।।

यो हवे इणमादाय, चुज्जमानो पलायति।
न ही ते इणमत्थी'ति, तं जञ्ञा वसलो इति।।३।।

यो अत्तहेतु परहेतू, धनहेतू च यो नरो ।
सक्खिपुट्ठो मुसा बुति, तं जञ्ञा वसलो इति।।४।।

यो मातरं वा पितरं वा, जिण्णकं गतयोब्बनं।
पहु सन्तो न भरति, तं जञ्ञा वसलो इति।।५।।

यो अत्थं पुच्छितो, सन्तो अनत्थमनुसासति ।
पटिच्छन्नेनं मन्तोति तं, जञ्ञा वसलो इति।।६।।

यो वे परकुलं गन्त्वा, भुत्वान सुचिभोजनं ।
आगतं न पटिपूजेति, तं जञ्ञा वसलो इति।।७।।

यो ब्राह्मणं वा समणं वा, अञ्ञं वापि वनिब्बकं।
मुसावादेन वञ्चेति, तं जञ्ञा वसलो इति।।८।।

यो ब्राह्मणं वा समणं वा, भत्तकाले उपट्ठिते ।
रोसेति वाचा न च देति, तं जञ्ञा वसलो इति।।९।।

न जच्चा वसलो होति, न जच्चा होति ब्राह्मणो।
कम्मुना वसलो होति, कम्मुना होति ब्राह्मणो।।१०।।

**(संदर्भ– सुत्तनिपात)**

## शब्दार्थ

**वसलो (पु)–** नीच
**कोधनो (वि.)–** रागीट, क्रोधी
**उपनाही (वि.)–** वैरी
**पापमक्खी (वि.)–** पापात बुडालेला
**विपन्नदिट्ठी (वि.)–** ज्याचा दृष्टिकोन किंवा मत चुकीचे आहे असा
**ममायितं (नपु.)–** माझे, माझे(करतो)
**इण (नपु.)–** ऋण, कर्ज
**सक्खिपुट्ठो (वि.)–** साक्ष काढलेला
**जिण्णकं (वि.) –** म्हातारा
**गतयोब्बनं (वि.)–** ज्याचे यौवन, तारुण्य नष्ट झाले आहे असा म्हातारा
**पहु (वि.)–** ताकदवान, समर्थ
**वनिब्बकं (पु.)–** भिकारी
**जच्चा (स्त्री.)–** जन्माने

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वसलसुत्तात तथागतांनी कुणाला उपदेश दिला आहे?
२) वसल व्यक्ती दुसऱ्यांच्या संपत्तीचे काय करतो?
३) वसल व्यक्तीला दिलेले कर्ज मागीतल्यावर काय म्हणून पलायन करतो?
४) स्व:ताच्या हितासाठी खोटी साक्ष कोण देतो?
५) वसल व्यक्ती समर्थ असुनही कोणाचे पालणपोषण करीत नाही?
६) वसल व्यक्ती दुसऱ्यांच्या घरी जाऊन काय करतो?
७) जन्माने कोण होत नाही?

८) दुसरा व्यक्ती आपल्या घरी आल्यावर वसल काय करीत नाही?

९) कर्माने कोण होते?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अक्कोधनो अपनाहि च पापमक्खीच यो नरो।

२) यो हवे इणमादाय चुज्जमानो पलायति।

३) यो अत्थं पुच्छिन्तो सन्तो अनत्थमनुसासति।

४) मुसावादेन वञ्चेति तं जञ्ञा वसलो इति।

५) रोसेति वाचा न च दोन्ति,तं जञ्ञा वसलो इति।

**३. खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करुन उत्तरे लिहा.**

१) विपन्नदिट्ठि................ तं जञ्ञा वसलो इति। (अमायावी/मायावी) (योग्य पयार्य निवडून वाक्य पूर्ण करा.)

२) यो.............. पुच्छितो सन्तो अनत्थमनुसासित। (अनत्थं/अत्थ) (योग्य पयार्य निवडून वाक्य पूर्ण करा.)

३) यो ब्राह्मणं वा समणं वा................ उपट्ठिते। (मत्तकाले/भत्तकाले) (योग्य पयार्य निवडून वाक्य पूर्ण करा.)

४) जिण्णकं (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

५) सुचिभोजनं (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

६) विपन्नदिट्ठी (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

७) ब्राह्मणं समणं (समास ओळखा)

८) मातरं पितरं (समास ओळखा)

**४. संधी ओळखा.**

१) अनत्थं + अनुसासति

२) इण + आदाय

३) एतद + अवोच

४) न + अत्थि

५) वसलो + इति

**५. खालील शब्दांचे रूपे ओळखा.**

१) पलायति

२) भुत्वान

३) रोसेति

४) इणमादाय

५) भरति

**६. खालील पालि शब्दांचा वाक्यात उपयोग करा.**

१) न

२) च

३) यो

४) वा


५) तं

६) आगतं

**७. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) न जच्चा वसलो होति | अ)कम्मुना होति ब्राह्मणो। |
| २) कम्मुना वसलो होति | ब) न जच्चा होति ब्राह्मणो। |
| ३) यो ब्राह्मणं वा समणं वा वनिब्बकं | क) मुसावादेन वञ्चेति। |
| | ड) रोसेति वाचा न च देति। |

**८. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**९. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.**

वसल (निच) कुणाला म्हणावे? या विषयीचा तथागत बुद्धाचा उपदेश तुमच्या शब्दांत लिहा.


☆☆☆

# ४) सुनीत थेरो

**प्रस्तावना**

सुनीत हा राजगृहातील गरीब कुळात जन्माला आला होता. साफसफाईचे आणि झाडूवाल्याचे काम करून तो आपली उपजीविका करीत होता. सहाजिकच लोकांकडून त्याला सतत अपमान आणि उपेक्षेचाच अनुभव येत होता. पण तथागत बुद्धाच्या संघात प्रवेश केल्यावर हीन जातीचा हा त्याच्यावरचा शिक्का आपोआप नष्ट झाला. तो भिक्खु होऊन ज्ञानाच्या आणि ध्यानाच्या मार्गाला लागला. पुढील गाथामध्ये तो आपले पूर्वायुष्य कसे होते हे सांगून सत्य कसे जाणले त्याचे तो कथन करीत आहे.

**'' माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागून सर्वांना जगण्याची समान संधी उपलब्ध करू देणे.''**



नीचे कुलम्हि जातो'हं, दलिद्दो अप्पभोजनो।
हीन कम्मं ममं आसि, अहोसिं पुप्फछड्डको।।१।।

जिगुच्छितो मनुस्सानं, परिभूतो च वम्भितो।
नीचं मनं करित्वान, वन्दिस्सं बहुकं जनं।।२।।

अथ'द्दसासिं सम्बुद्धं, भिक्खुसङ्घपुरक्खतं।
पविसन्तं महावीरं, मगधानं पुरुत्तमं।।३।।

निक्खिपित्वान व्याभङ्गिं, वन्दितुं उपसङ्कमिं।
ममेव अनुकम्पाय, अट्ठासि पुरिसुत्तमो।।४।।

वन्दित्वा सत्थुनो पादे, एकमन्तं ठितो तदा।
पब्बज्जं'हं आयाचिं, सब्बसत्तानमुत्तमं।।५।।

ततो कारुणिको सत्था, सब्बलोकानुकम्पको।
'एहि भिक्खु'ति मं आह, सा मे आसुपसम्पदा।।६।।

सोहमेको अरञ्ञस्मिं, विहरन्तो अतन्दितो।
अकासिं सत्थुवचनं, यथा मं ओवदी जिनो।।७।।

रत्तिया पुरिमे यामे, पुब्बजातिमनुस्सरिं।
रत्तिया मज्झिमे यामे, दिब्बचक्खुं विसोधयिं।।
रत्तिया पच्छिमे यामे, तमोक्खन्ध पदालयिं।।८।।

ततो रत्या विवसने, सुरियस्सुग्गमनं पति।
इन्दो ब्रह्मा च आगन्त्वा, मं नमस्सिंसु पञ्जलिं।।९।।

नमो मे पुरिसाजञ्ञ, नमो ते पुरिसुत्तम।
यस्स ते आसवा खीणा, दक्खिणेयो'सि मारिस।।१०।।

ततो दिस्वान मं सत्था, देवसङ्घपुरक्खतं।
सितं पातुकरित्वान, इममत्थमभासथ।।११।।

तपेन ब्रह्मचरियेन, संयमेन दमेन च।
एतेन ब्राह्मणो होति, एतं ब्राह्मणमुत्तमं ति।।१२।।

**(संदर्भ–थेरगाथा)**

## शब्दार्थ

**नीच (वि.)**– निकृष्ट, हलका
**कुल (नपु.)**– जात
**जाति (स्त्री.)**– जन्म
**हीन (वि.)**– नीच
**कम्म (नपु.)**– काम, कार्य
**दिस (नपु.)**– पाहणे
**खीण (कृदन्त.)**– क्षीण
**अप्पभोजनं**– अल्पभोजन
**दळहं (क्रि.वि.)**– दृढतापूर्वक
**जिगुच्छा (स्त्री.)**– घृणा
**परिभूत (कृदन्त.)** – निंदायोग्य
**पुरक्खतं (अ.)**– समोर
**पुरुत्तम (नपुं.)**– उत्तमनगर
**व्याभङ्गि** – झाडू, केरसुणी
**अनुकम्पा**– सहानुभूती
**सत्थु (पु.)**– शास्ता, बुद्ध
**पञ्जलिं (क्रि.)**– हात जोडले
**दक्खिणेय्यो (क्रि.वि.)**– दान देण्यायोग्य
**पुप्फछड्डको (वि.)**– फुलांचा कचरा
**एकमन्तं(क्रि.)**– एका बाजूला
**ठित (भू.क्रि.)**– उभा राहिलेला
**ततो (अव्य.)**– नंतर
**अरञ्ञ (नपु)**– जंगल, वन
**ओवदनं(नपुं)**– उपदेश देणे
**जिन (वि)**– बुद्ध, विजयी
**याम (पु.)**– प्रहर
**विसोधित ( कृ.)**– शुद्ध केले.
**वम्भितो (वि.)**– घृणीत
**भिक्खुसङ्घ (वि.)**– भिक्खु संघ
**निक्खिपित्वान (पूर्व.क्रि.)**– बाजूला ठेवून
**उपसम्पदा (स्त्री.)**– बौद्ध भिक्खूसंघाकडून दिली जाणारी भिक्खूदीक्षा, उपसंपदा

**अतन्दितो (वि.)**– क्रियाशील
**अनुस्सरिं (भूत.क्रि.)**– स्मरण केले
**पदालयिं (भूत.क्रि.)**– नाश केला
**विवसनं (नपु.)**– उजाडल्यावर
**सितं (नुपं.)**– स्मित हास्य

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सुनीतचा जन्म कोणत्या कुळात झाला?
२) सुनीत कोणाला वंदन करीत असे?
३) भिक्खुसंघाच्या समोर सुनीतने कोणाला पाहिले?
४) शास्त्याला वंदन करून सुनीत कोठे उभा राहिला?
५) सुनीतची उपसंपदा कशी झाली?
६) सुनीतने रात्रीच्या शेवटच्या प्रहरी काय केले?
७) ब्राह्मण कोणाला म्हणावे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) नीचं मन करित्वान वन्दिस्स एको जनं।
२) ममेव न अनुकम्पाय अट्ठासि पुरिसुत्तमो।
३) सो' हमेको आरामे विहरन्तो अतन्दितो।
४) रत्तिया मज्झिमे यामे दिब्बचक्खु विसोधयिं।
५) बुद्धो ब्रह्मा च आगन्त्वा मं नमस्सिंसु पञ्जलिं।

**३. सुचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.**

१) जिगच्छितो................परिभूतो च वम्भितो (मनुस्सानं/मनुस्सा) (योग्य पर्याय निवडा)
२) वन्दित्वा सत्थुनो ................एकमन्त ठितो तदा। (हत्थे/पादे) (योग्य पर्याय निवडा)
३) अथाद्दसासि (संधी विग्रह करा)
४) पुरिसुत्तमो (संधी विग्रह करा)
५) दलिद्दो. (माध्यम भाषेत अर्थ लिहा)


**४. संधी करा.**


१) जातो + अहं
२) पब्बज्जं + अहं
३) आस + उपसम्पदा
४) एकं+अन्त


**५. योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) पविसन्तं महावीरं | अ) वन्दिस्स बहुकं जनं। |
| २) रत्तिया मज्झिमे यामे | ब) दिब्बचक्खुं विसोधयिं। |
| ३) नीचे कुलम्हि जातो'हं | क) दलिद्दो अप्पभोजनो। |
| | ड) मगधानं पुरुत्तमं। |

**६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**

१)



२)



३)



**७. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.**

सुनीत थेरोचे जीवन चरित्र थोडक्यात लिहा.


☆☆☆

# ५) रुरुराजचरियं

**प्रस्तावना**

पालि तिपिटकात खुद्दकनिकायातील चरियापिटक नावाचा एक लहानसा परंतु महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. तथागत बुद्धाच्या पूर्वजीवनातील निरनिराळ्या कथा यामध्ये गाथाबद्ध केलेल्या आहेत. यामध्ये बोधीसत्व हरिणाच्या रूपाने अरण्यात जन्मला हा कथाभाग प्रस्तुत गाथांमध्ये आला आहे. दुसऱ्याचा जीव वाचवून शीलाच्या रक्षणासाठी स्वतःचे बलिदान देणाऱ्या हरिणांच्या राजाची ही कथा आहे.

**'' यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली म्हणजे दृढनिश्चय होय. अडचणीत स्वतःचा जीव धोक्यात घालून मित्राचे प्राण वाचवून शीलाचे रक्षण करणे.''**



'पुनापरं यदा होमि, सुतत्तकनकसन्निभो ।
मिगराजा रुरुनाम, परमसीलसमाहितो।।१।।

रम्मे पदेसे रमणीय, विवित्ते अमनुस्सके
तत्थं वासं उपागच्छिं, गङ्गाकूले मनोरमे।।२।।

अथ उपरि गङ्गाय, धनकेही परिपीळितो।
पुरिसो गङ्गाय पतति, जीवामि वा मरामि वा।।३।।

रत्तिं दिवं सो गङ्गाय, वुय्हमानो महोदके।
रवन्तो करुणं रवं मज्झे, गङ्गाय गच्छति।।४।।

तस्साहं सद्दं सुत्वान, करुणं परिदेवतो।
गय तीरे ठत्वान, अपुच्छिं कोसि त्वं नरो।।५।।

सो मे पुट्ठो च व्याकासि, अत्तनो कारणं तदा।
धनिकेहि भीतो तसितो, पक्खन्तोहं महानदिं।।६।।

तस्स कत्वान कारुञ्ञं, चजित्वा मम जीवितं।
पविसित्वा नीहरिं तस्स, अन्धकारम्हि रत्तिया।।७।।

अस्सत्थ कालमञ्ञाय, तस्साहमिदमब्रविं।
एकं तं वरं याचामि, मा मं कस्सचि पावद।।८।।

गनरं गन्त्वान आचिक्खि, पुच्छितो धनहेतुको।
राजानं सो गहेत्वान, उपागच्छि ममन्तिकं।।९।।

यावता कारणं सब्बं, रञ्ञो आरोचितं मया।
राजा सुत्वान वचनं, उसुं तस्स विकप्पसि।।१०।।

तमहं अनुरक्खन्तो, निम्मिनि मम अत्तना।
तिट्ठं तेसा महाराज, कामङ्करो भवामि ते।।११।।

अनुरक्खिं मम सीलं, नारक्खि मम जीवतं।
सीलवा हि तदा आसिं, बोधिया येव कारण'।।१२।।

**(संदर्भ–चरियापिटक)**



## शब्दार्थ

**मिगराजा (पु.)**– हरिणांचा राजा
**विवित्ते (वि.)**– गर्दीपासून दूर असलेल्या, एकांतातील
**उपागच्छि (भूत.क्रि.)**– जवळ गेला
**वुय्हमानो (वि.)**– (पाण्याबरोबर) वाहत जाणारा
**रवन्तो (वि.)** – ओरडणारा
**परिदेवतो (वि.)**– रडणारा
**व्याकासि (भूत.क्रि.)**– सांगितले, स्पष्ट केले
**चजित्वा (पूर्व.अव्यय)**– त्याग करून
**नीहरन्तस्स (वि.)**– प्रवाहाबरोबर, लोंढ्याबरोबर वाहत जाणाऱ्यावर (दया दाखवून)
**अस्सत्थ कालं (पु.)**– सांत्वन करण्याची वेळ, संधी
**आचिक्खि (भूत.क्रि.)** – सांगितले
**उसुं (पु/स्त्री)**– सुळावर
**विकप्पयि – (भूत.क्रि.)**– (सुळावर देण्याचे) ठरविले

# स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) रुरु नावाचा प्राणी कोण होता?

२) रुरुराज कोठे निवास करीत होते?

३) रुरु मिगराजा कोणते विचार करीत होता?

४) रुरुने नदीच्या काठावर जाऊन, उभे राहून काय विचारले?

५) रुरु मिगराजा कोणाद्वारे भयभीत होते?

६) मिगराजाने सत्य कथन केल्यानंतर काय म्हटले?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) मिगराजा रुरुनाम परमसीलसमाहितो।

२) अथ उपरि यमुनाय पतति धनकेहि परिपीळितो।

३) पुरिसो गङ्गाय पतति जीवामि वा मरामि वा।

४) सो मे पुट्ठो च व्याकासि अत्तनो कारणं तदा।

५) यावता कारणं सब्ब रञ्ञो आरोचितं मया।

६) तमहं अनुरक्खन्तो निम्मिनि मम अत्तना।

७) असीलवा हि तदा आसि बोधि येव कारणा।

**३. रिकाम्या जागा भरा.**

१) पुनापरं यदा......... सुतत्तकनकसन्निभो। ( होमि/होहि)

२) पुरिसो गङ्गाय पतति...........वा।(जीवाम/जीवामि)

३) रत्तिं दिवं सो गङ्गाय.........महोदके।(वुय्हमानो/अवुय्हमानो)

४) रवन्तो करुणं रवं.........गङ्गाय गच्छति। (मज्झे/पूरतो)

५) अस्सत्थ.........तस्साहमिदं ब्रविं।(अज्जमञ्ञाय/कालमञ्ञाय)

६) तिट्ठं तेसा महाराज.........भवामि ते।( कामङ्करो/कामङ्करा)

७) सीलवा हि तदा आसिं..........येव कारणा। (बोधिया/अबोधिया)

**४. संधी करा.**

१) पुन + आपर

२) महा + ओदके

३) नीह + अरन्त

४) सु + त्वान


५) न + आरक्खिं

६) तस्साहं + इदमब्रविं

७) मम + अन्तिकं

८) तं + अहं

**५. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**६. रूपे ओळखा.**

१) जीवामि

२) अपुच्छि

३) आचिक्खि

४) सुत्वान

५) अन्धकाम्हि

६) कारुञ्ञ

**७. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) पुनापरं यदा होमि | अ) गङ्गाकुले मनोरमे। |
| २) तत्थ वासं उपागच्छिं | ब) गङ्गाय गच्छति। |
| ३) पुरिसो गङ्गाय पतति | क) सुतत्तकनकसन्निभो। |
| | ड) जीवामि वा मरामि वा। |

**८. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.**

रुरुराजचरियचा सारांश लिहा.

☆☆☆

# ६) इणसुत्त

**प्रस्तावना**

प्रस्तुत पद्यपाठ पालि तिपिटकाच्या अङ्गुत्तरनिकायातील ‘छकनिपातो’ यातुन घेतला आहे. यामध्ये कर्जाच्या दुष्परिणामाचे वर्णन केले आहे. एखादी व्यक्ती आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच आपली दारिद्र्यता नष्ट करण्यासाठी दुसऱ्यांकडून कर्ज घेते. त्या घेतलेल्या कर्जाचे त्यास व्याज भरावे लागते. कर्जाच्या रकमेची परतफेड वेळेवर न केल्यास कर्ज देणाऱ्याकडून मानहानी, अपमान, कारागृहात रवानगी, दंड इत्यादी भोगावे लागते. त्यामुळे समाजात आपली प्रतिमा मलिन होते. आपला दोष लपविण्यासाठी काया, वाचा व मनाने दुष्कृत्य घडते. म्हणून व्यक्तीने आपल्या गरजांवर नियंत्रण ठेवून कर्ज न काढता आपला जीवनव्यवहार करावा. अर्थात ‘अंथरूण पाहून पाय पसरावे’ या म्हणीप्रमाणे जीवन जगावे हा संदेश या पाठात दिलेला आहे.

“ **कर्जाचे दुष्परिणाम जाणून काया, वाचा व मनावर संयम ठेवून जीवनयापन करणे.**”



दालिद्दियं दुक्खं लोके, इणादानं च वुच्चति।
दलिद्दो इणमादाय, भुञ्जमानो विहञ्ञति।।१।।

ततो अनुचरन्ति नं, बन्धनम्पि निगच्छति।
एतञ्हि बन्धनं दुक्खं, कामलाभाभिजप्पिनं।।२।।

तथेव अरियविनये, सद्धा यस्स न विज्जति।
अहिरीको अनोत्तप्पी, पापकम्मविनिब्बयो।।३।।


कायदुच्चरितं कत्वा, वचीदुच्चरितानि च।
मनोदुच्चरितं कत्वा, मा मं जञ्ञू' ति इच्छति।।४।।

सो संसप्पति कायेन, वाचाय उद चेतसा।
पापकम्मं पवड्ढेन्तो, तत्थ तत्थ पुनप्पुनं।।५।।

सो पापकम्मो दुम्मेधो, जानं दुक्कटमत्तनो।
दलिद्दो इणमादाय, भुञ्जमानो विहञ्ञति।।६।।

ततो अनुचरन्ति नं, सङ्कप्पा मानसा दुक्खा।
गामे वा यदि वारञ्ञे, यस्स विप्पटिसारजा।।७।।

सो  पापकम्मो दुम्मेधो, जानं दुक्कटमत्तनो।
योनिमञ्ञतरं गन्त्वा, निरये वापि बज्झति।।८।।



एतञ्हि बन्धनं दुक्खं, यम्हा धीरो पमुच्चति।
धम्मलद्धेहि भोगेहि, ददं चित्तं पसादयं।।९।।

उभयत्थ कटग्गाहो, सद्धस्स घरमेसिनो।
दिट्ठधम्महितत्थाय, सम्परायसुखाय च।
एवमेतं गहट्ठानं, चागो पुञ्ञं पवड्ढति।।१०।।

तथेव अरियविनये, सद्धा यस्स पतिट्ठिता।
हिरीमनो च ओत्तप्पी, पञ्ञवा सीलसंवुतो।।११।।

एसो खो अरियविनये, सुखजीवी ति वुच्चति।
निरामिसं सुखं लद्धा, उपेक्खं अधितिट्ठति।।१२।।

**(संदर्भ– अङ्गुत्तरनिकाय छकनिपातो)**

## शब्दार्थ

**इणं (नपु.)–** कर्ज
**इणादानं (नपु.)–** कर्ज देणे
**दालिद्दियं (वि.)–** दारिद्र्यता
**लोके (पु.)–** लोकात, जगात
**वुच्चति (वर्त.क्रि.) –** म्हणतो
**भुञ्चमानो (वि.)–** भोगणारा
**विहञ्ञति (वर्त.क्रि.)–** प्राप्त होतो
**अरियविनये (वि.)–** बुध्दशासनात
**सद्धा (नपुं)–** श्रद्धा
**अनोत्तप्पी(नपुं.)–** निर्भय
**कामलाभ (पु.)–** कामोपभोगाची प्राप्ती
**अहिरीको (वि.)–** लज्जारहित, संकोचरहित
**काया (स्त्री.)–** शरीर
**वाचा(स्त्री) –** वाणी
**मनो (नपुं)–** मन (चित्त)
**दुच्चरितं (नपु.)–** वाईट आचरण
**मा (आज्ञार्थ)–** नको, नका
**जञ्ञु (वि.)–** अन्य, कुलीन
**इच्छति (वर्त.क्रि.)–** इच्छा करतो
**पापकम्मं (वि.)–** पापकर्म
**दुम्मेध (वि.)–** वाईट बुद्धीचा
**दुक्कट (वि.)–** वाईट कृत्य
**सङ्कप्प (पु.)–** संकल्प
**योनिमञ्ञत्तरं (नपु.)–** मृत्यूनंतर
**धीरो (पु.)–** बुद्धिमान
**पमुच्चति(वर्त.क्रि.)–** मुक्त होतो
**लद्ध (कृदन्त)–** प्राप्त
**गहट्ठ (पु.)–** गृहस्थ
**चागो (नपु.)–** त्याग
**पुञ्ञं (नपु.)–** पुण्य
**पवड्ढति (वर्त.क्रि.)–** वाढते, वाढतो
**पञ्ञवा (वि.)–** प्रज्ञावान
**सीलसंवुतो (वि.)–** सदाचारी
**सुखजीवी (वि.)–** सुखी जीवन जगणारा
**उपेक्खा (स्त्री.)–** उपेक्षा
**निरामिस (नपु.)–** निरपेक्ष
**अधितिट्ठति (वर्त.क्रि.)–** (ध्यानात) स्थिर होतो

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) या जगात दुक्ख कशाला म्हणतात?
२) कर्जाची परतफेड न केल्याने कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते?
३) पापकर्म कोण करतो?
४) कोणत्या तीन गोष्टी दुसऱ्यांनी जाणू नये असे आपणास वाटते.
५) सुखाची इच्छा असणाऱ्यास कोणत्या कारणांनी दुक्खातच मरण येते?
६) तथागताप्रती श्रध्दा प्रकट केल्यास कशापासून मुक्ती मिळते?
७) घरातील त्याग आणि पूण्य कसे वाढते?
८) सुखजीवी कोणास म्हणावे?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) तथेव अरियविनये सध्दा यस्स न विज्जति।
२) मनोदुच्चरितं कत्वा, ‘‘मा मं जञ्ञू’ ति न इच्छति।
३) गामे वा यदि वारञ्ञे यस्स विप्पटिसारजा।
४) धम्मलद्धेहि भोगेहि इदं चित्तं न पसादयं।
५) एसो खो अरियविनय ‘सुखजीवी ति वुच्चति।

### ३. रिकाम्या जागा भरा.

१) दलिद्दो इणमादाय भुञ्जमानो................। (विहञ्ञति/जहन्ति)
२) मनोदुच्चरितं कत्वा. मा ................जञ्ञू ति इच्छति। (त्वं/मं)
३) सो................ दुम्मेधो, जानं दुक्कटमत्तनो। (पुञ्ञकम्मो/पापकम्मो)

**४. सुचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.**

१) विज्जति ( काळ ओळखा)
२) कत्वा (अव्यय ओळखा)
३) सद्धा (माध्यम भाषेत अर्थ लिहा)
४) सो (विरुध्दार्थी शब्द लिहा)

**५. योग्य जोड्या लावा.**


| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) एतञ्हि बन्धनं दुक्खं | अ) बन्धनम्पि निगच्छति। |
| २) ततो अनुचरन्ति नं | ब) कामलाभाभिजप्पिनं। |
| ३) निरामिसं सुख लद्धा | क) चागो पुञ्ञ पवड्ढति। |
| | ड) उपेक्खं अधितिट्ठति। |

**६. संधी करा.**


१) इणं + आदाय
२) तथ + एव
३) एवं + एत
४) वा + अपि

**७. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**


१)




२)




३)




**८. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.**

कर्ज काढण्याचे दुष्परिणाम कोणते ते सांगा.


☆☆☆

# ७) अम्बपाली थेरी

**प्रस्तावना**

खुद्दक निकायातील थेरीगाथा या ग्रंथातून हा पद्य उतारा घेतला गेलेला आहे. आम्रपाली अतिशय सुंदर व देखणी होती. तारुण्यात पदार्पण केल्यावर ती इतकी देखणी दिसू लागली, की तिच्या प्राप्तीसाठी अनेक राजपुत्रात स्पर्धा निर्माण झाली. शेवटी सर्वांचीच म्हणून ती गणिका झाली. नंतर तथागताचा उपदेश ऐकूण ती विरक्त झाली व तिने प्रवज्जा घेतली. एकेकाळी ती आपल्या सौंदर्याने सर्वांना आकर्षित करणारी होती; परंतु पुढे त्यातील नश्वरता तिला उमगली. 'पूर्वी मी कशी होते व आता कशी झाली आहे' याचे वर्णन करताना तिने प्रस्तुतच्या गाथा म्हटल्या आहेत. पालिमधील अलंकारीत शैलीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. तसेच शरीर सौदर्य नश्वर आहे, याचा साक्षात्कार एका गणिकेला होणे यातील विरोधाभासही आहे.

आम्रपाली तारुण्याची व म्हातारपणाची स्वानुभवावरून तुलना करीत असून जिला सौंदर्यसंपन्नता प्राप्त झाली होती, तिलाच सौंदर्याच्या अनित्यतेचा व क्षणभंगुरतेचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला. तो मन संतुलनाला पोषक ठरणारा वाटतो.



''काळका भमरवण्णसदिसा, वेल्लितग्गा मम मुद्धजा अहुं।
ते जराय साणवाकसादिसा, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१।।

''वासितोव सुरभी करण्डको, पुप्फपूर मम उत्तमङ्गजो।
तं जराय सलोमगन्धिकं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।२।।

''काननं व सहितं सुरोपितं, कोच्छसूचिविचितग्गसोभितं।
तं जराय विरलं तहिं तहिं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।३।।

''कण्हखन्धकसुवण्णमण्डितं, सोभते सुवेणीहिअलङ्कतं।
तं जराय खलितं सिरं कतं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।४।।

''चित्तकारसुकताव लेखिका, सोभते सुभमुका पुरे मम।
ता जराय वलिभिप्पलम्बिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।५।।

''भस्सरा सुरुचिरा यथा मणी,नेत्तहेसुमभिनीलमायता।
ते जरायभिहता न सोभरे, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।६।।

''सण्हतुङ्गसदिसी च नासिका, सोभते सुअभियोब्बनं पति।
सा जराय उपकूलिता विय, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।७।।

''कङ्कणं व सुकतं सुनिट्ठितं, सोभते सुमम कण्णपाळियो।
ता जराय वलिभिप्पलम्बिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।८।।

''पत्तलीमकुलवण्णसादिसा, सोभते सुदन्ता पुरे मम।
ते जराय खण्डिता चासिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।९।।

''काननम्हि वनसण्डचारिनी, कोकिलाव मधुरं निकूजिहं।
तं जराय खलितं तहिं तहिं, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१०।।

''सण्हकम्बुरिव सुप्पमज्जिता, सोभते सुगीवा पुरे मम।
सा जराय भग्गा विनामिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।११।।

''वट्टपलिघसदिसोपमा उभो, सोभते सुबाहा पुरे मम।
ता जराय यथ पाटलिब्बलिता, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१२।।

''सण्हमुद्दिकसुवण्णमण्डिता, सोभते सुहत्था पुरे मम।
ते जराय यथा मूलमूलिका, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१३।।

''कञ्चनस्सफलकंव सुम्मट्ठं, सोभते सुकायो पुरे मम।
सो वलीहि सुखुमाहि ओततो, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१४।।

''एदिसो अहु अयं समुस्सयो, जज्जरो बहुदुक्खानमालयो।
सो पलेपपतितो जराघरो, सच्चवादिवचनं अनञ्ञथा''।।१५।।

**(संदर्भ–थेरीगाथा)**



## शब्दार्थ

**भमरवण्णसदिसा (वि.)**– भुंग्याच्या रंगासारखे
**वेल्लितग्गा (वि.)**– कुरळे
**सच्चवादिवचन (नपु.)**– सत्य बोलणाऱ्या बुद्धाचे वचन
**अनञ्ञथा (वि.)**– खरे (खोटे ठरत नाही असे)
**पुप्फपूर– (नपु.)** फुलांनी माळलेल्या
**उत्तमङ्गजो(नपु.)**– डोक्यावर वाढणारे केस
**सलोमगन्धिक (वि.)**– दुर्गंधीयुक्त केस
**सोभरे (नपु.)**– सुंदर दिसणे
**चित्तकारसुकतोव (पु.)**– चित्रकाराने रंगविलेल्या
**भमुका (स्त्री.)**– भुवया
**वलि (वि.)** – सुरकुत्या
**भस्सरा** (वि.)– प्रकाशमान
**नासिका (स्त्री.)**– नाक
**अभियोब्बन (पु.)**– तरुण
**उपकुलिता (स्त्री.)**– संकुचित
**कण्णपाळियो (वि.)**– कानाच्या पाळ्या
**दन्ता (नपु.)**– दात
**चासित(वि.)**– काळे (जे पांढरे नाहीत असे)
**वनसण्डचारिनी (स्त्री.)**– वनात राहणारी
**मधुरं (वि.)**– गोड आवाज
**निकूजिहं (नपु.)**– आवाज, पक्षांची चीवचीव
**गीवा (स्त्री.)**– मान, गळा
**बाह (पु .)**– बाहु (दंड )
**हत्थ (पु.)**– हात
**बहुदुक्खानमालयो (वि.)**– नाना दुःखाचे आगार
**जराय (वि.)**– म्हातारपणामुळे

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अम्बपालीचे केस कसे होते?
२) अम्बपालीचे चित्रकाराने कोरल्यासारखे काय होते?
३) पूर्वीची अम्बपालीची मान कशी होती?
४) सत्यवादी बुद्धाचे वचन कसे ठरत नाही?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) सच्चवादिवचनं अनञ्ञथा।
२) तं जराय अविरलं तहिं तहिं।
३) सोभते सु गीवा पुरे ममं।
४) सोभते सुअकायो पूरे ममं।

**३. रूपे ओळखा.**

१) जराय  २) कोकिला.
३) लम्बन्ति  ४) भमुका

**४. संधी करा.**

१) अन+ अञ्ञथा  २) उत्तम + अङ्गजो

**५. माध्यम भाषेत अर्थ लिहा.**

१) सलोमगन्धिकं  २) कायो
३) गीवा  ४) हत्था


**६. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

१) काननम्हि वनसण्डचारिनी कोकिलाव ........... निकूजिह। (अमधुर/मधुर)
२) ते जराय साणवाकसादिसा,सच्चवादिवचनं ...........। (नञ्ञथा/अनञ्ञथा)
३) ...........अहु अयं समुस्सयो। (तदिसो/एदिसो)
४) सोभते...........पति। (सुयोब्बनं/सुअभियोब्बनं)

**७. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) काळका | अ) सोभते सुदन्ता |
| २) भस्सरासुरुचिरा | ब) कोकिलाव |
| ३) सण्हतुङ्गसदिसी | क) भमरवण्णसादिसा |
| ४) पन्तलीमकुलवण्णासादिसा | ड) यथा मणी |
| | इ) च नासिका |

**८. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**९. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.**

अम्बपालीने सौंदर्याची अनित्यता कशा प्रकारे सांगितली आहे?


# ८) पकिण्णानि सुभासितानि

**प्रस्तावना**

सुभासित हा शब्द 'सु' आणि 'भासित' यांनी मिळून बनलेला आहे, ज्याचा अर्थ असा आहे की योग्य दृष्टी ठेवून सांगितलेले, सुंदर भाषेत सांगितले गेलेले वचन. या सुभाषितांमध्ये सुखी आणि आदर्श जीवनाचे विचार तसेच नीतियुक्त आचरणाचा मार्ग सांगणारे विचार अंतर्भूत आहेत. व्यक्तीच्या जीवनामध्ये सम्यक बदल घडवून आणण्याची प्रेरणा या सुभाषितांमधून प्राप्त होते. एखादे महत्त्वपूर्ण, अर्थपूर्ण वचन मर्यादित शब्दांत व्यक्त करण्याचे सामर्थ्य या सुभाषितांमध्ये आहे. तिपिटकामधील धम्मपद, सुत्तनिपात इत्यादी ग्रंथात अशी सुभाषिते विपुल प्रमाणात आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी ते विखुरलेले आहेत. वेगवेगळ्या प्रसंगी तथागतांनी शील-सदाचार यावर आधारीत जे उपदेश सांगितलेले आहेत, त्यांचे संकलन म्हणजे धम्मपद, सुत्तनिपात इत्यादींमधील सुभाषित होत.

प्रस्तुत सुभाषित हे धम्मपदामधील काही गाथांचा संग्रह आहे. या गाथांमधून अहिंसा, शांती, बंधुता, समानता, मानवी मूल्ये इत्यादींचा उपदेश सांगितलेला आहे. मानवी समाजाच्या हिताकरिता, सुखाकरिता, कल्याणाकरिता या सुभाषितांमधील गाथा महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी आहेत.

**''जात, धर्म, पंथ, लिंग, प्रदेश, भाषा या भेदाच्या पलिकडे जावून समाजातील सर्व लोकांत सामंजस्य व नैतिक मूल्ये वाढीस लावण्यासाठी सुभाषितांचे महत्त्व आहे.''**



सुभानुपस्सिं विहरन्तं, इन्दियेसु असंवुतं।
भोजनम्हि अमत्तञ्ञुं, कुसीतं हीनवीरियं।
तं वे पसहति मारो वातो रुक्खं व दुब्बलं।।१।। (यमक वग्गो)

असुभानुपस्सिं विहरन्तं, इन्दियेसु असंवुतं।
भोजनम्हि च मत्तञ्ञुं,सद्धं आरध्दवीरियं।
तं वे नप्पसहति मारो, वातो सेलं व पब्बतं।।२।। (यमक वग्गो)

उट्ठानवतो सतिमतो, सुचिकम्मस्स निसम्मकारिनो।
सञ्ञतस्स च धम्मजीविनो, अप्पमत्तस्स यसोभिवड्ढति।।३।। (अप्पमादवग्गो)

कुम्भपमं कायमिमं विदित्वा, नगरूपमं चित्तमदं ठपेत्वा।
योधेय मारं पञ्ञायुधेन, जितं च रक्खे अनिवेसनो सिया।।४।। (चित्तवग्गो)

न परेसं विलोमानि, न परेसं कताकतं।
अत्तनो व अवेक्खेय्य, कतानि अकतानि च।।५।। (पुप्फवग्गो)

यथापि रुचिरं पुप्फं, वण्णवन्तं अगन्धकं।
एवं सुभासिता वाचा,अफला होति अकुब्बतो।।६।। (पुप्फवग्गो)

यावजीवम्पि चे बालो, पण्डितं पयिरुपासति।
न सो धम्मं विजानाति, दब्बी सुपरसं यथा।।७।।(बालवग्गो)

मुहुत्तमपि चे विञ्ञू, पण्डितं पयिरुपासति।
खिप्पं धम्मं विजानाति, जिव्हा सूपरसं यथा।।८।। (बालवग्गो)

सेलो यथा एकघनो, वातेन न समीरति।
एवं निन्दापसंसासु, न समिञ्जन्ति पण्डिता।।९।। (पण्डितवग्गो)

सहस्समपि चे वाचा,अनत्थपदसंहिता।
एकं अत्थपदं सेय्यो, यं सुत्वा उपसम्मति।।१०।। (सहस्सवग्गो)

अलङ्कतो चे पि समं चरेय्य, सन्तोदन्तो नियतो ब्रह्मचारी।
सब्बेसु भूतेसु निधाय दण्डं, सो ब्राह्मणो सो समणो च भिक्खू।।११।। (दण्डवग्गो)

अत्तना व कतं पापं, अत्तना सङ्किलिस्सति।
अत्तना अकतं पापं, अत्तना व विसुज्झति।
सुध्दि असुध्दि पच्चतं, नाञ्ञो अञ्ञं विसोधये।।१२।। (अत्तवग्गो)

ये झाणपसुता धीरा, नेक्खम्मूपसमे रता।
देवापि तेसं पिहयन्ति, सम्बुध्दानं सतीमतं।।१३।। (बुद्धवग्गो)

यो दुक्खस्स पजानाति, इधेव खयमत्तनो।
पन्नभारं विसंञ्ञुतं, तमहं ब्रुमि ब्राह्मणं।।१४।। (ब्राह्मणवग्गो)

**(संदर्भ–धम्मपद)**

## शब्दार्थ

**सुभ (नपु.)–** शुभ,चांगले
**अनुपस्सति(वर्त.क्रि.)–** पाहतो, विचार करतो
**सुभानुपस्सि (वि.) –** चांगले माणून चालणारा
**इन्द्रिय (नपु.)–** इंद्रिय
**संवुत– (वि.)** संयमी
**असंवुतं (वि.)–** असंयमी
**मत्तञ्ञू (वि.)–** प्रमाण जाणणारा, मात्रा जाणाणारा
**अमत्तञ्ञू (वि.)–** प्रमाण न जाणणारा
**कुसीतं (नपुं.)–** आळशी
**विरिय (नपु.)–** सामर्थ्य, उत्साह
**हीनवीरिय (वि.) –** उत्साहरहित
**तं (सर्व.)–** त्याला

**वे (अ.)–** खरोखर, निश्चितपणे
**पसहति (वर्त.क्रि.)–** दडपून टाकतो
**मार (पु.)–** मार, मनातील दृष्ट प्रवृत्ती
**वात (पु.)–** वारा
**दुब्बलं (वि.)–** दुर्बल
**पब्बतं (पु.)–** पर्वत
**उट्ठानवतो (वि.)–** उत्साहवान
**सुचि (नपु.)–** पवित्र
**निसम्म(पूर्व.क्रि.)–** विचार करून
**निसम्मकारिनो (वि.)–** विवेकाने आचरण करणारा
**काय (पु.)–** काया, शरीर
**कुम्भ (पु.)–** घडा
**उपम (वि.)–** समान/उपमा
**विदित्वा (पूर्व.क्रि.)–** जाणून
**ठपेत्वा (पूर्व.क्रि.)–** ठेवून
**निवेसन (नपु.)–** घर, निवास
**पर(वि.)–** दुसरा
**विलोम (नपुं.)–** विरूद्ध
**विलोम(नपु.)–** दोष
**कताकतं(नपु.)–**केलेले, न केलेले
**अवेक्खति (क्रि.)** – पाहतो, विचारात घेतो, अवलोकन करतो
**रुचिरं (वि.)–** सुंदर
**वण्णवन्तं (वि.)–** रंग असणारे
**गन्धकं (वि.)–** वास असणारे
**कुब्बतो ( वि.)–** आचरण करणारा
**यावजीवम्पि (स्त्री.)–** जीवनभर सुद्धा
**पयिरुपासति (वर्त.क्रि)–** जवळ बसतो, सेवा करतो
**दब्बी (स्त्री.)–** पळी, चमचा
**सुप(पु.)–** स्वाद, रस्सा, आमटी, कढी
**विञ्ञू(वि.)–** सूज्ञ, पंडित,विद्वान
**मुहुत्त(पु.नपुं.)–** थोडा वेळ,क्षण
**खिप्प (वि.)–** चटकन, शीघ्र, तत्काळ
**समीरति (वर्त.क्रि)–** हलतो
**समिञ्जति (वर्त.क्रि)–** विचलित होतो, हलतो
**अत्थ (पु.)–** अर्थ, लाभ, धन
**अनत्थ (अन+अत्थ)–** अनर्थ, हानी
**अत्थपदं(नपु.)–** अर्थपूर्ण वचन
**सेय्यो (वि.)–** श्रेष्ठ
**सुत्वा (पूर्व.क्रि.)–** ऐकून
**अलङ्कतो(वि.)–** अलंकृत, सजवलेला
**सन्त(वि.)–** शांत
**नियत(वि.)–** स्थिर
**दन्त(वि.)–** दमन केलेला, संयत
**निधाय(पूर्व.क्रि.)–** सोडून
**सुद्धि(स्त्री)–** शुद्धी, पवित्रता
**पच्चत्तं (वि.)–** वेगवेगळे
**विसोधये(कृ.)–** शुध्द करणे योग्य
**झान(नपु.)–** ध्यान
**पसुत(पूर्व.वि.)–** मग्न राहून, लागून राहून
**नेक्खम्मूपसमे(पु.)–** परमशांत निर्वाण
**रत(कृ.)–** अनुरक्त आनंद घेणारा
**पिहयन्ति (वर्त.क्रि.)–** इच्छा करतो, प्रयत्न करतो
**खय (पु.)–** क्षय
**पन्नभारं (वि.)–** ओझे उतरून ठेवलेला
**विसत्तं (वि.)–** आसक्त

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आळशी आणि उद्योगहिन माणसाला मार कसा हाणून पाडतो?
२) मनुष्याची यशवृध्दी कशी होते?
३) स्वत:चे अवलोकन कसे करावे?
४) शरीरास कसे समजावे?
५) माराशी युद्ध कसे करावे?
६) शहाणा माणूस धर्माला कसे जाणून घेतो?
७) 'निन्दापसंसा' या शब्दाचा अर्थ सांगा?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) सुभानुपस्सि विहरन्तं, इन्दियेसु सुसंवुतं।

२) असुभानुपस्सि विहरन्तं, इन्दियेसु सुसंवुतं।

३) न परेसं विलामनि, न परेसं कताकतं।

४) यथापि रुचिरं पुप्फं, वण्णवन्तं सुगन्धकं।

५) सेलो तथा एकघनो, वातेन न समीरति।

### ३. सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.

१) यावजीव (समास ओळखा)

२) सु (पूर्वकालवाचक अव्यय करा.)

३) दुक्खस्स (विभक्ती ओळखा.)

४) 'इन्द्रियेसु सुसंवुतं'(माध्यम भाषेत अर्थ लिहा)

५) तं वे नप्पसहति मारो,...........।
(गाथा पूर्ण करा.)

६) यथापि रुचिरं पुप्फ वण्णवन्तं गन्धक।
(गाथा दुरुस्त करुन लिहा.)

७) अचूक पालि शब्द ओळखून पुन्हा लिहा.
अ) यावजीवम्पि/ याविजीवम्पि/ याविजींवपि
ब) महत्तमपि/ मुहुत्तमपि/ महुतमपी
क) विसुध्दति/ विसुज्झती/ विसुज्झति

### ४. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) भोजनम्हि ..........., कुसीतं हीनवीरियं।
(अमत्तञ्ञुं/मत्तञ्ञुं)

२) योधेय मारं पञ्ञायुधेन, जितं च रक्खे ........... सिया। (निवेसनो/अनिवेसनो)

३) अत्तनो व ..........., कतानि अकतानिच।
(अवेक्खय्य/वेक्खेय)

४) सहस्समपि च वाचा, ...........।
(अत्थपदसंहिता /अनत्थपदसंहिता)


५) यो...........पजानाति, इधेव खयमत्तनो।
(दुक्खस्स/सुखस्स)

### ५. योग्य जोड्या लावा.


| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) यावजीवम्पि चे बालो | अ) वातेन न समीरति। |
| २) सेलो यथा एकघनो | ब) कतानि अकतानि च। |
| ३) अत्तनो व अवेक्खेय्य | क) तमहं ब्रुमि बाह्मणं। |
| | ड) पण्डितं पयिरुपासति। |

### ६. खालील गाथांच्या आधारे जाळरेखाचित्र पूर्ण करा.

१) उट्ठानवतो सतिमतो, सूचिकम्मस्स निसम्मकारिनो।
सञ्ञतस्स च धम्मजीविनो, अप्पमत्तस्स
यसोभिवड्ढति।




२) यो दुक्खस्स पजानाति, इधेव खयमत्तनो।
पन्नभारं विसंञ्ञुतं, तमहं ब्रुमि ब्राह्मणं।।




### ७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) 'धम्मजीविनो' (धम्माप्रमाणे चरितार्थ चालविणारा) विषयी लिहा

२) पालि साहित्यामधील मार संकल्पना स्पष्ट करा.

३) 'पकिण्णानि सुभासितानि' चा सारांश लिहा.

☆☆☆

## थुलवाचन खन्धको

# १) पाचीन विस्सविज्जालयो

**प्रस्तावना**

इसवी सन पूर्व पाचव्या-सहाव्या शतकामध्ये तथागत बुद्धाचा आणि बौद्ध धम्माचा उदय झाला. बुद्धाच्या आधी जम्बुदीपामध्ये गुरूकुल शिक्षण पद्धती होती. त्यात फक्त उच्च वर्णाच्या आणि जातीच्या लोकांनाच शिक्षणाचा अधिकार होता. बुद्ध काळामध्ये तक्षशिला विश्वविद्यालयाचा उल्लेख पालि तिपिटक साहित्यामध्ये आढळून येतो. त्यानंतर बुद्ध धम्माच्या विकासानंतर सार्वजनिक शिक्षणाची संकल्पना पुढे आली. इसवी सनाच्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकापासून भारतामध्ये अनेक बौद्ध विद्यापीठांची निर्मिती झाली. या विद्यापीठांमध्ये कला, भाषा, शास्त्र, आयुर्वेद, व्याकरण, रसायन, वास्तुकला, शिल्पकला, मूर्तीकला, धातुशास्त्र, ज्योतिष, गणित, ज्ञान, विज्ञान इत्यादी विषयांचे अध्ययन-अध्यापन केले जात होते. सर्वांना मोफत शिक्षण दिले जात होते. त्यावेळी पालि भाषा नागरी संस्कृती कालीन लोकांची व्यावहारिक भाषा होती. जी भाषा नितीमत्तेचे रक्षण करते, पालन करते ती पालि. त्या भाषेची लिपी ही धम्मलिपी होती.

प्राचीन काळातील विद्यापीठे व शिक्षणप्रणाली नितीमत्तेवर आधारित असल्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातून शिक्षण घेण्याकरिता आशिया खंडातूनच नव्हे तर विश्वातील पाच खंडातील विद्यार्थी शिक्षण घेण्याकरिता येत असत. त्या काळी जम्बुदीपामध्ये २३ विद्यापीठे अस्तित्वात होती. त्यापैकी सहा विद्यापीठांची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे.

**"राष्ट्राने नेहमी चढती श्रेणी गाठत जाऊन सर्व व्यक्ती व सामुदायिक क्षेत्रात यश संपादन करून वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद व संशोधक वृत्ती विकसित करण्यासाठी शिक्षणाची सोय करणे."** हा या पाठ्यघटकातून बोध घेता येतो.

खिद्दपुब्बं दस सतकेन जम्बद्विपेहि विस्सविज्जालयो होति। तेन खो पन समयेन धम्मनितीमतेन निस्सयति सङ्गणिकेन सत्ताहि अहोसि। इदम्पि जनपदेहि जम्बुद्विपेन समयं सिक्खा च ञाण च विञ्ञाणो पमुखो ठाणं अहोसि। तस्सा जम्बुद्विपेन कित्तिसद्दो वेभवसम्पन्नो जनपदे हि विस्सस गारवेन अहोसि। तं समयेन पालि भासा बहु जनस्स वोहारिको भासा अहोसि। सब्बे जनपदेहि पालेति वा रक्खति, विनयेन 'ति पाली' ति। विज्जा विनयेन सोभति। तं समयेन भासेस्स लिपीयं काले धम्मलिपी वुच्चति। इदंपि लोकेहि तस्स भासास्स जनभासा, लोकभासा च रट्ठियं भासा च वदेहि पालि भासा पचलितो ति। निस्साय विस्सस आजिवकेन आगच्छति अज्झतं अज्झायति सिक्खापदं पञ्च खन्धको ही संसोधको आगतं ति इत्वरेहि विस्सविज्जालयो अस्सोसि, तस्मिं सब्बे विस्सविज्जालयेसु ञाणेहि सम्पादेथ।

### एको) तक्कसिला विस्सविज्जालयो

जम्बुदिपेन सब्बेन पाचीन विस्सविज्जालयो तक्कसिला अहोसि। यं विस्सविज्जालयो कालेन खिद्दपुब्बं एको सहस्सो त ततो खिद्दं चतु सतकं ति। इध विस्सविज्जालयो **आंभिरञ्ञोस्स पुत्तो तक्खक** नगररञ्ञोस्स ठापेतित्वा। तक्कसिला जनपेदहि नामोसि विस्सविज्जालयो तक्कसिला अहोसि। द्वासत्ति विसयं अज्झायति। तक्कसिलेहि विस्सविज्जालयेन अनुतरं सिक्खा मुत्तेहि सब्ब लोकेस्मिं।



तस्स विस्सविज्जालयो सिक्खापदे साहिच्च, कलेन च विञ्आणो गच्छन्ति।

### द्वे) नालन्दा विस्सविज्जालयो

खिट्ठपुब्बं सतसतकं तं ततोखिट्ठ बारस सहस्सो कालेन यथापरं विस्सस पाचिन विस्सविज्जालयो नामे हि कित्तिसद्दो अहोसि। तं विस्सविज्जालयस्स ठापेति खिट्ठपुब्बेहि सतसतकेन वस्सोसि रञ्ञो **सकारादिच्चो** हस्से हि ठापेत्वा ति।



नालन्दा विस्सविज्जालयेन सत्त उच्चतम भुतला वसति। विहारेन संघाराम अहोसि। ततो आचरियेन च आजिवको मुत्तं चतु भुतालेन वसतिगेहं वसेति। दस सहस्सेन आजिवको निवासेति च एको पञ्च सतकं आचरियो निवासित्वा अहोसि। एको सहस्सो अज्झापको तिसो विसयं अज्झायति अज्झापनति। एव पञ्चसतकं अज्झापको विसति विसयं अज्झायति’ ति। तेन खो पन समयेन विस्सविज्जालयस्स कुलपति **महाथेरो सीलभद्दं** अहोसि। चतुसट्ठी कलेन, च अट्ठदस विज्जा अज्झायनं अज्झायितं मुत्तेहि अज्झतं खन्धको अहोसि।

### ततिय) विक्कमसिला विस्सविज्जालयो

पालवंसीय रञ्ञो **धम्मपालेन** नालन्देहि अन्तरेन विक्कमसिला विस्सविज्जालयस्स ततो खिट्ठं नवसतकेन ठापेति। विक्कमसिला विस्सविज्जालयेन द्वेसतंविसट्ठि गब्भेहि ति। तं विस्सविज्जालयेन पमुखोस्स सभापति



सम्बोधति। सभापति च द्वारपालो उक्कीनतो रञ्ञोस्स पतिपाति अहोसि। विस्सविज्जालयेन पवेसतो द्वारपालेन करोन्ति। तेसं समयेन सट्ठो द्वारपालो अहोसि।

### चतु) ओदन्तपुरी (उदन्तपुरी) विस्सविज्जालयो

पाल कुलगोतेहि सन्थापको महारञ्ञो **गोपालं** नालन्दा पदेसो नालन्दा विस्सविज्जालयो परं अन्तरेन बिहारसरीफ निगमो सन्तिके ओदन्तपुरी विस्सविज्जालयस्स बारस सतकेन पतिठापेति। महापण्डितो भिक्खु **पभाकर** तं विस्सविज्जालयस्स कुलपति अहोसि।



### पञ्च) वल्लाभि विस्सविज्जालयो

ततो खिट्ठ पञ्चसत कतं बारस्स सतकं इधं विस्सविज्जालयो हिनयान पन्थियस्स महतम केन्द नामेहि विकसितं ति। गुत्त कुलगोत्तेन सेनीयं सेनापती **भट्टारकस्स मेत्तक रञ्ञो** वंसीय राजधानी वल्लभी गुजराथ जनपदेहि एतरहि विस्स विज्जालयो पतिट्ठापेति। वल्लभी विस्सविज्जालयेन आचरियो **बुध्दपालीत** एस्स कुलपति अहोसि ।



### छट्ठ) जगदल विस्सविज्जालयो

ततोखिट्ठ एक सहस्सो सतसतति तं एको सहस्सो एकसतकं विसति यथापरं पाचिन बंगालो अन्तरेन बुद्धञाणस्स

पमुख पच्छिमो महतम केन्द जगदल विस्सविज्जालयस्स नामे हि कित्तिसद्दो ति। तं विस्सविज्जालयस्स पतिठापेति पालवंस कुलेहि रञ्ञो **रामपाल** इमेहि खिट्ठ ततो एक सहस्सो सतसतति मे ठापेति। आचरिय **मोक्खकारगुत्त** एस्स विस्सविज्जालयस्स कुलपति अहोसि।

**(संदर्भ-संकलित)**



## शब्दार्थ

**खिट्ठपुब्बं**- इसवी सनापूर्वी, ख्रिस्तपूर्व
**निस्सयति (वि.)**- आधारित
**कित्तिसद्दो (वि.)**- किर्तीमान, वैभवसंपन्न
**वुच्चति (क्रि.)**- सांगतो, बोलतो, म्हणतो
**आगतं (वि.)**- येणे
**निगम (पु.)**- शहर
**मुत्तेहि (वि.)**- मोफत, विनामूल्य
**बहुस्सुतो (वि.)**- पंडीत, महापंडीत
**भुतल (पु.)**- मजले
**वेतनिक**- शुल्क, फंड
**ठापेति (वि.)** - स्थापन करणे
**महल्ल** (पु.)- महान
**सन्थापको (वि.)**- संस्थापक
**अस्ससारेन (क्रि.)**- आश्वासन देणे
**एतरहि (वि.)**- आता
**निब्बति (वि.)**- निर्माण करणे
**सङ्गनिका (वि.)**- समाज, जनता
**गारवेन गोरवान्वित**- प्रसिद्धी
**निस्साय (वि.)**- त्यामुळे
**ततो खिट्ठ** - इसवी सनामध्ये
**ठापेतित्वा (पूर्व.वि.)**- स्थापन करुन
**अनुतरं**- सर्वोत्तम
**साहिच्च**- साहित्य
**भग्गोति (क्रि.)**- नष्ट करणे, नाश करणे
**विसय (वि.)**- विषय
**अज्झायति (वि.)**- शिक्षण घेणे
**भता हि भतकेन (क्रि)** भोजनाकरिता
**पयोजन (कि.)**- प्रयोजन, व्यवस्था
**पवेसन्ते**- प्रवेश घेणे
**गननं (वि.)** गिनती करणे, मोजणे
**पतिट्ठापेत्वा (पूर्व.कृ.)** प्रस्थापित करून
**पन्थियस्स**- पंथीयांना
**मितक**- मित्र

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) तक्षशीला विद्यापीठाची शिक्षण पद्धती स्पष्ट करा?
२) नालंदा विद्यापीठाची थोडक्यात माहिती लिहा?
३) विक्रमशीला विद्यापीठाची थोडक्यात माहिती लिहा
४) ओदन्तपुरी विद्यापीठाची थोडक्यात माहिती लिहा?
५) वल्लभी विद्यापीठाची थोडक्यात माहिती लिहा?
६) जगद्दल विद्यापीठाची थोडक्यात माहिती लिहा?

**२. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) तक्कसिला विस्सविज्जालयो | अ) मेत्तकरञ्ञो |
| २) नालन्दा विस्सविज्जालयो | ब) धम्मपालरञ्ञो |
| ३) विक्कमसिला विस्सविज्जालयो | क) आंभिपुत्तो तक्खक |
| ४) वल्लभि विस्सविज्जालयो | ड) रामपाल रञ्ञो |
| ५) जगद्दल विस्सविज्जालयो | इ) सकारादिच्चो हस्स |
| | ई) गोपालं रञ्ञो |

३. जाळरेखाचित्र पूर्ण करा.

पाचीन विस्सविज्जालयानि नाम किं अत्थि

वल्लभि | | | | |

४. तक्ता पूर्ण करा.

अ)

| अ.क्र. | विस्सविज्जालय | कुलपति नाम |
|---|---|---|
| १ | नालन्दा | |
| २ | तक्कसिला | |
| ३ | विक्कमसिला | |
| ४ | उदन्तपुरी | |
| ५ | वल्लभि | |

ब)

| अ. क्र. | रञ्ञोस्स नामो | विस्सविज्जालयस्स निम्मिति |
|---|---|---|
| १ | आंभिरञ्ञोपुत्तो तक्खक | |
| २ | सकारादिच्चो रञ्ञो | |
| ३ | धम्मपालरञ्ञो | |
| ४ | गोपालं रञ्ञो | |
| ५ | रामपाल रञ्ञो | |
| ६ | मेत्तकरञ्ञो | |

☆☆☆

## अठरा विद्या(अट्ठादस विज्जा)

१. अङ्गविज्जा = शारीरिक व्यायाम विषयक विद्या
२. वत्थुविज्जा = भूमिस्पर्श व्यायाम विषयक विद्या
३. रयतविज्जा = शासनविषयक (सत्ता मिळवण्याविषयक विद्या
४. सिवविज्जा = सुरक्षा विषयक विद्या
५. भूतविज्जा = भौतिक परिस्थितीविषयक ज्ञान
६. भूरिविज्जा = भूगर्भविषयक ज्ञान
७. अहिविजा = सर्प विषयक विद्या.
८. विसविज्जा = विष, जहर विषयक ज्ञान
९. विच्छिक विज्जा = मनातील इच्छाविषयक मनोविज्ञान
१०. मूसिकविज्जा = उंदिरविषयक ज्ञान
११. सकुणविज्जा = पक्ष्याबद्दलचे ज्ञान
१२. वायसविज्जा = कावळ्याविषयक ज्ञान
१३. तिरच्छानविज्जा = जनावरे पशुविषयक ज्ञान
१४. मिच्छाजीवाविज्जा= चुकीच्या अर्थाच्या शब्दाचे मूल्यमापन विषयक ज्ञान
१५. अस्स विज्जा = अश्वारोहण विषयक ज्ञान
१६. नागआरोहण (हत्थिआरोहण) विज्जा = हत्तीस्वारी विषयक ज्ञान
१७. धनुगहण विज्जा = मूक, सांकेतिक खुणा विषयक ज्ञान
१८. चेलकविज्जा = युद्धकलेविषयक विद्या.

(संदर्भ- दीघनिकाय, सामञ्ञफलसुत्त,महासील)

## सम्राट अशोकांनी स्थापन केलेल्या २३ विद्यापीठांची नावे

१. इ.स.पूर्व(ख्रिस्तपूर्व) २८४ उज्जेन विद्यापीठ (महेंद्राच्या जन्मदिनी स्थापन)
२. इ.स.पूव २८२- सांची विद्यापीठ (संघमित्राच्या जन्मदिनी स्थापना)
३. इ.स.पूर्व २८०- तक्षशिला विद्यापीठ(स्थापना, विकास व जीर्णोद्धार)
४. इ.स.पूर्व २७९- गांधार विद्यापीठ
५. इ.स.पूर्व २७०- नालंदा विद्यापीठ
६. इ.स.पूर्व २६८- ओदन्तपुरी विद्यापीठ (बिहार)
७. इ.स.पूर्व २६६- सारनाथ विद्यापीठ
८. इ.स.पूर्व २६५- मथुरा विद्यापीठ
९. इ.स.पूर्व २६४- दन्तपूर विद्यापीठ
१०. इ.स.पूर्व २६०- नागरा विद्यापीठ (गोंदिया जिल्हा)
११. इ.स.पूर्व २६०- पवनी विद्यापीठ (भंडारा जिल्हा)
१२. इ.स.पूर्व २५८- श्रीनगर(कनिष्कपूर) विद्यापीठ
१३. इ.स.पूर्व २५७- गिरनार विद्यापीठ (गुजरात)
१४. इ.स.पूर्व २५६- एरागुडी विद्यापीठ
१५. इ.स.पूर्व २५५- गुन्टूर विद्यापीठ
१६. इ.स.पूर्व २५०- बोधगया विद्यापीठ
१७. इ.स.पूर्व २४५- जगद्दलपूर विद्यापीठ
१८. इ.स.पूर्व २४३- कौसम्बी विद्यापीठ(अलाहाबाद जिल्हा)
१९. इ.स.पूर्व२४०- विक्रमशीला विद्यापीठ (भागलपूर बिहार)
२०. इ.स.पूर्व २३९- अवन्ती विद्यापीठ
२१. इ.स.पूर्व २३८- पोतनिक (पितळखोरा) विद्यापीठ
२२. इ.स.पूर्व २३७- पुण्डरिक (पंढरपूर) विद्यापीठ
२३. इ.स.पूर्व २३६- कारले (कार्ला) विद्यापीठ

(संदर्भ- दै. जागरण, दि. ०५/०४/२०१७ व इंटनेटवरून घेतली)

## चतुसट्ठ कलायो (चौसष्ट कला) ६४ कला

१. हत्थियुद्ध = हत्तीवर सवारी, माहूतविषयक युद्धकला.
२. अस्सयुद्ध = घोड्यावरून युद्ध करण्याची कला.
३. मदिसयुद्ध = शारीरिक मालिश करण्याविषयीची कला.
४. उसभयुद्ध = बैलांची झुंज, युद्ध विषयक कला.
५. अजयुद्ध = बकऱ्यांची झुंज विषयक कला.
६. मेण्डयुद्ध = मेंढ्यांची झुंज विषयक कला.
७. कुक्कटयुद्ध = कोंबड्यांची झुंज विषयक कला.
८. वट्ठकयुद्ध = स्थूलपणा कमी करण्याची कला.
९. दण्डयुद्ध = अपराध/ गुन्हाविषयक कला.
१०. मुट्ठीयुद्ध = मूठ मारण्याविषयक (छुमंतर ) कला.
११. निब्बुयुद्धं = पोहण्याची कला.
१२. उय्योधिक = लढाईविषयक कला.
१३. बलग्ग = सैन्यबल, सैनिक विषयक कला.
१४. खलिकं = घोड्याची लगाम विषयक कला (घोडेस्वारी)
१५. घटिकं = मातीचे भांडे तयार करण्याविषयीची कला.
१६. सलाकहत्थ = तीर चालवण्याची कला.
१७. अक्खंपङ्गचीरं = लक्ष्यवेध, जुगार कला.
१८. वङ्कक = मासे, गळविषयक कला.
१९. मोक्खचिक = मुक्ती मिळविण्याविषयक कला.
२०. चिङ्गलिक = चकवा, स्वतःभोवती फिरण्याची कला.
२१. पताळ्हक = ध्वज संचालन कला.
२२. रथकं = रथ चालविण्याची कला.
२३. धनुकं = धनुष्य चालविण्याची कला.
२४. अक्खरिक = क्षणार्धात तीर मारण्याची कला.
२५. मनसिक = मनकवडा, दुसऱ्याच्या मनातील ओळखण्याची कला.
२६. आसान्दिपल्लक गोणकं = खूर्चीवर खेळण्याची कला.
२७. चित्तकं पटिकं पटलिकं = लोकरीचे वस्त्र तयार करण्याची कला.
२८. विकटिकं उद्दलोमि = विक्रिची कला.
२९. कटिस्स कोरियस्सं कुतकं= मटकण्याची, कमर लचकविण्याची कला.
३०. हत्थत्थरं = हात, हस्त पाहण्याची कला.
३१. रथत्थरं = रथ चालविण्याची कला.
३२. अजिनप्पवेणि = बकऱ्यांची झुंज लावण्याची कला.
३३. कदलिमि पवरश्चत्थरणं = मायावी, सोंग करण्याची कला.
३४. उच्छादनं परिमद्दल = अंग चोळणे, मालिश करण्याची कला.
३५. मुखचुण्णं मुखलेपनं = मुखवटा, चेहरे रंगविण्याची कला.
३६. हत्थबन्ध सिखाबन्धदण्डं = भुजांना बावटे बांधण्याची कला.
३७. नालिकं = नालीविषयक कला.
३८. असि = तलवारबाजी विषयक कला.
३९. राजकश्च = राजा बनण्याची कला.
४०. चोरकथं = चोरी करण्याची कला.
४१. भयकथं = भिती निर्माण करण्याची कला.
४२. अन्नकथं = भोजन तयार करण्याची कला.
४३. पानकथ = पाणी पिण्याची कला.
४४. वत्थकथं = वस्त्र तयार करण्याची कला.
४५. गन्धकथं = सुगंधित अत्तर तयार करण्याची कला.
४६. अङ्गनिमितं उप्पात = हवेत वर उडण्याची कला.
४७. सुपिनलक्खणं = स्वप्नांचा अर्थ सांगण्याची कला.
४८. मुसिकच्छिन्नं = उंदीर पकडण्याची कला.
४९. अग्गिहोम = अग्नी लावण्याची कला.
५०. दब्बिहोमं = वास्तू भविष्य कला.
५१. थुसहोमं = आपोआप अग्नि लावण्याची कला, भुसा करणे.
५२. कणहोमं = धान्य फेकून भविष्य सांगण्याची कला.
५३. तंदुरहोमं = तांदूळ फेकून भविष्य सांगण्याची कला.
५४. सप्पिहोमं = साप पकडण्याची कला.
५५. मुखहोमं = चेहरा पाहून भविष्य सांगण्याची कला.
५६. लोहितहोमं = पाण्यापासून रक्त तयार करण्याची कला.
५७. मणिलक्खणं = रत्न, कर्णभूषण कला.
५८. सत्थलक्खणं= शस्त्र चालविण्याची कला.
५९. उसुलक्खणं = तीर चालविण्याची कला.
६०. गोधालक्खणं = घोरपड पकडण्याची कला.
६१. हनुनप्पनं = चेहरा, मुखवटा बदलविण्याची कला.
६२. महतुपट्ठान = मोठेपणा सिद्ध करण्याची कला.
६३. दारकतिकिच्छा = वधुवर परीक्षा करण्याची कला.
६४. सालाकियं सल्लकटियं = डोळ्यात सुई, सळई घालण्याची कला.(संदर्भ = दीघनिकाय, सामञ्ञफलसुत्तं)

# २) पटाचारा थेरी अपदानं

**प्रस्तावना**

थेरीगाथा ग्रंथ प्राचीन कालीन अर्थात बुद्धाच्या काळातील स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा दस्ताऐवज म्हणून संबोधला जातो. या ग्रंथात एकूण ७३ थेरींचे त्यांचे स्वतःचे अनुभव अंकित केलेले आहेत. या ७३ थेरींपैकी पटाचारा थेरी ही एक थेरी होय. पटाचाराचा जन्म श्रावस्तीतील एका श्रीमंत, संपन्न, खूप धनवान कुळात झाला. तारुण्यात आल्यावर ती एका व्यक्तीबरोबर निघून गेल्यानंतर काही दिवसांनी तिचा पती, दोन्ही मुले, आई, वडील व भाऊ हे सर्व जण मृत्यू पावतात. त्यामुळे ती अतिशय दुःखी, चिंतीत, कृश, अनाथ होऊन इकडे-तिकडे भटकत असताना बुद्धांकडे जाते. अल्पावधीतच बुद्धाच्या उपदेशाने ती प्रवज्जीत होऊन अरहंतपद प्राप्त करते.

पटाचारा थेरीने आपल्या जीवनानुभवाचे, व्यथांचे वर्णन या कवितेत केलेले आहे. तसेच त्याकाळी सुध्दा पुरुषांप्रमाणेच स्त्रियासुध्दा अरहंतपद प्राप्त करून लोकसेवा करीत असत. हा स्त्री-पुरुष समानतेचा संदेश या पद्य घटकातून दिलेला असून हा पद्यघटक पालि अपदान या ग्रंथातून घेतलेला आहे.

**'' प्रगतीसाठी व दुक्खमुक्तीसाठी स्त्री-पुरूष असा लिंगभेद न करता लोकसेवेसाठी संधीची समानता, भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्राप्त करून देणे.''**

''पच्छिमे च भवे दानि, जाता सेट्ठिकुले अहं।
सावत्थियं पुरवरे, इद्धे फीते महद्धने''।।१।।

''यदा च योब्बनूपेता, वितक्कवसगा अहं।
नरं जारपतिं दिस्वा, तेन सद्धिं आगच्छहं''।।२।।

''एकपुत्तपसूताहं, दुतियो कुच्छिया ममं।
तदाहं मातापितरो, ओक्खामीति सुनिच्छिता''।।३।।

''नारोचेसिं पतिं मय्हं, तदा तम्हि पवासिते।
एकिका निग्गता गेहा, गन्तुं सावत्थिमुत्तमं''।।४।।





‘‘ततो मे सामि आगन्त्वा, सम्भावेसि पथे ममं।
तदा मे कम्मजा वाता, उप्पन्ना अतिदारूणा’’।।५।।

‘‘उट्ठितो च महामेघो, पसूतिसमये मम।
दब्बत्थाय तदा गन्त्वा, सामि सप्पेन मारितो’’।।६।।

‘‘तदा विजातदुक्खेन,अनाथा कपणा अहं ।
कुन्नदिं पूरितं दिस्वा, गच्छन्ती सकुलालयं’’।।७।।

‘‘बालं आदाय अतरिं, पारकूले च एककं।
सायेत्वा बालकं पुत्तं, इतरं तरणायहं’’।।८।।

‘‘निवत्ता उक्कुसो हासि, तरुणं विलपन्तकं।
इतरञ्च वही सोतो, साहं सोकसमप्पिता’’।।९।।

‘‘सावत्थिनगरं गन्त्वा,अस्सोसिं सजने मते।
तदा अवोचं सोकट्टा, महासोकसमप्पिता’’।।१०।।

‘‘उभो पुत्ता कालङ्कता,पन्थे मय्हं पती मतो।
माता पिता च भाता च, एकचितम्हि डय्हरे’’।।११।।

‘‘तदा किसा च पण्डु च, अनाथा दीनमानसा।
इतो ततो भमन्तीहं, अद्दसं नरसारथिं’’।।१२।।

‘‘ततो अवोच मं सत्था, पुत्ते मा सोचि अस्सस।
अत्तानं ते गवेसस्सु, किं निरत्थं विहञ्ञसि’’।।१३।।

‘‘न सन्ति पुत्ता ताणाय, न ञाती नपि बन्धवा।
अन्तकेनाधिपन्नस्स, नत्थि ञातीसु ताणता’’।।१४।।

‘‘तं सुत्वा मुनिनो वाक्यं, पठमं फलमज्झगं ।
पब्बजित्वान नचिरं, अरहत्तमपापुणिं’’।।१५।।

**(संदर्भ–थेरीगाथा अट्ठकथा)**

## शब्दार्थ

**पच्छिमे (वि.)–** नंतर
**भवे (क्रिया.)–** झाली/ होणे
**दानि (वि.क्रि) –** आता
**महद्धने (वि.)–**सपन्न
**इद्धे ( कृदन्त.)–** समृद्ध
**योब्बनूपेता (पु.)–** तारुण्यात आल्यावर
**जारपतिं (पु.)–** व्यभिचारी परावर्तीत
(इंग्रजीत अर्थ शक्तिमान असा आहे)
**दिस्वा–** पाहून
**नारोचेसिं (क्रिया.)–** न सांगता
**तम्हि (क्रिया.)–** त्यांना दर्शकवाचक
**पवेसिते (क्रिया.)–** प्रवेश करणे
**सामि (पु.)–** नवरा
**एकिका(स्त्री)–** एकाकी, एकटी
**निग्गता (कृ)–** बाहेर गेलेला
**उप्पन्ना ( कृदन्त.)–** उत्पन्न झालेला
**अतदारुणा (वि.)–** भयंकर, भयानक
**मारिता–** मारला गेला
**कुन्नदिं –(स्त्री.)** लहान, खळखळणारी नदी
**सकुलालयं(वि.)**– आई वडील, नातेवाईकांचे घर

**अनाथा(नपुं.)**– निराधार
**उभो(सर्वनाम)**– दोन्ही
**विहञ्ञसि (क्रिया.)**– भटकला
**गवेसस्सु(क्रिया.)**– शोध घेतला पाहिजे
**ताणाय(नपु.)**– शरण/संरक्षण
**बन्धवा(पु.)**– नाते/नातलग
**सायेत्वा(पूर्व.क्रि.)**– उराशी धरून

**किसा(वि.)**– चिंताक्रांत, दमलेली
**पण्डु(वि.)**– पिवळी
**दिनमानसा(नपुं.)**– गरीब, दुःखी
**उक्कुसो(पु.)**– मासे मारुन खाणारा पक्षी
**वही(कृ.)**– वाहिलेले
**सोतो(पु.)**– श्रोत, प्रवाह
**कालङ्कता** – मृत्यू पावले

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) पटाचारा थेरीचा जीवनवृत्तांत लिहा.

२) तथागताने पटाचाराच्या दुःखाचे निवारण कसे केले ते लिहा.


३) पटाचारा थेरीच्या जीवनातील दुःखद प्रसंगातून तुम्ही कोणता बोध घ्याल ते तुमच्या शब्दांत लिहा.

**२. योग्य जोड्या लावा.**


| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) ''पच्छिमे च भवे दानि | अ) दुतिया कुच्छिया ममं। |
| २) ''एकपुत्त पसुताहं | ब) न ञाती नपि बन्धवा। |
| ३) ''बालं आदाय अतरिं | क) जाता सेट्ठिकुले अहं। |
| ४) ''उभो पुत्ता कालङ्कता | ड) पारकुले च एककं। |
| ५) ''न सन्ति पुत्ता ताणाय | इ) पन्थे मय्हं पती मतो। |
| | फ) अरहन्तमपापुणि। |

**३. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**

अ)





ब)




**४) खालील गाथातील पूर्वकालवाचक अव्यय शोधून रेखाजाळे पूर्ण करा.**

''ततो मे सामि आगन्त्वा, सम्भावेसि पथे ममं।
तदा मे कम्मजा वाता, उप्पन्ना अतिदारूणा ।।५।।
''उट्ठितो च महामेघो, पसूतिसमये मम।
दब्बत्थाय तदा गन्त्वा, सामि सप्पेन मारितो ।।६।।
''तदा विजातदुक्खेन,अनाथा कपणा अहं ।
कुन्नदिं पूरितं दिस्वा, गच्छन्ती सकुलालयं ।।७।।
''बालं आदाय अतरिं, पारकूले च एककं ।
सायेत्वा बालकं पुत्तं, इतरं तरणायहं ।।८।।




☆☆☆

# परिसिट्ठं एकं– वेय्याकरण (व्याकरण)

## १) सरं च व्यञ्जनं च वग्गिकरणं

(स्वर आणि व्यंजन वर्गीकरण)

### सर (स्वर)

पालि भाषेमध्ये आठ स्वर आहेत – अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ.

स्वरांचे तीन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते.

१) रस्स सर अर्थात ऱ्हस्व स्वर – अ, इ, उ

२) दीघ सर अर्थात दीर्घ स्वर – आ, ई, ऊ

३) मज्झिम सर अर्थात मध्यम स्वर – ए, ओ

### व्यञ्जन (व्यंजन)

| पकारो | वग्गो | कठोर | मुदु | अनुनासिक |
|---|---|---|---|---|
| १. कण्ठ्य | क – वग्गो | क, ख | ग, घ | ङ (.) |
| २. तालव्य | च – वग्गो | च, छ | ज, झ | ञ (.) |
| ३. मुर्द्धन्य | ट – वग्गो | ट, ठ | ड, ढ | ण (.) |
| ४. दन्त्य | त– वग्गो | त, थ | द, ध | न (.) |
| ५. ओष्ठ्य | प – वग्गो | प, फ | ब, भ | म (.) |
| ६. अन्त | | य, र, ल, व, ळ | | |
| ७. उष्माक्षर | | स | | |
| ८. प्राणध्वनी | | ह | | |
| ९. निग्गहीत | | अं (.) | | |

### वण्णमाला (वर्णमाला)

आपल्या मुखातून जे मूळ ध्वनी बाहेर पडतात त्यांना वण्ण (वर्ण) असे म्हणतात. पालि भाषेमध्ये ८ स्वर आणि ३३ व्यंजने आहेत. असे एकूण ४१ वर्ण आहेत.

### सरपरिवत्तनं (स्वर परिवर्तन)

१) मराठीतील किंवा संस्कृतातील ऋ, ॠ, लृ, ऐ, औ, अः हे स्वर पालि भाषेत आढळत नाहीत. 'ऋ' ऐवजी काही ठिकाणी 'अ,' काही ठिकाणी 'इ' आणि काही ठिकाणी 'उ' होतो.

ऋ ऐवजी अ – कृषि – कसि, घृत – घत, मृत – मत, श्रृंखला – संखला इत्यादी

ऋ ऐवजी इ – कृमि – किमी, ऋण– इण, श्रृंग – सिंग, तृण – तिण, इत्यादी

ऋ ऐवजी उ – ऋतु – उतु, ऋषभ – उसभ, मृदु –मुदु, मृषा – मुसा इत्यादी

२) लृ - मराठीत किंवा संस्कृतात फार क्वचितच ठिकाणी आढळतो.
पालि भाषेत त्याचा सर्वथा अभाव आहे.

३) ऐ ऐवजी ए होतो - तैल - तेल, ऐरावत- एरावत, शैल - सेल, वैशाख - वेसाख इत्यादी
ऐ ऐवजी इ होतो - ऐश्वर्य - इस्सरिव, सैन्धव - सिन्धव, वैभव - विभव इत्यादी.

४) औ ऐवजी ओ होतो - औषध - ओसध, गौतम -गोतम, पौर -पोर, औदारिक - ओदारिक इत्यादी
औ ऐवजी अ होतो - सौम्य - सम्म
औ ऐवजी आ होतो - गौरव - गारव
औ ऐवजी उ होतो - मौत्तिक- मुत्तिक, औधत्व - उद्धच्च, औत्सुक्य - उस्सुक्कं

## २) व्यञ्जन परिवत्तनं (व्यंजन परिवर्तन)

१) पालिमध्ये **श** आणि **ष** हे ध्वनी नाहीत. त्याऐवजी ‘स’ चा उपयोग केला जातो.
(श, ष), स - शेष - सेस, आकाश - आकास, (श, ष, छ) - शावक -छावक, षष्ठ - छट्ठ.

२) पालि भाषेत कोणतेही पद हलन्त अर्थात व्यंजनान्त नसते.
भगवा (न्) - भगवा, गुणवा (न्) - गुणवा, या व (त्) - याव विद्यु(त्)- विज्जु, पश्चा(त्) - पच्छा.

३) पालि भाषेत अन्त्य म च्या स्थानी नेहमी अनुस्वार (.)असतो.
चित्तम् - चित्तं, सत्यम् -सच्चं, तीर्थम् - तित्थं

४) पालिभाषेत विसर्गाचा (:) प्रयोग होत नाही. संस्कृतातील अकारान्त पदाच्या शेवटी जो विसर्ग असतो त्याच्या जागी पालिमध्ये **‘ओ’** होतो.
इतर ठिकाणी विसर्गाचा अभाव असतो.
बुद्धः- बुद्धो, कः - को, एष - एसो.

५) विसर्गाच्या पुढे जर स, श, ष असेल तर विसर्गाच्या स्थानी **स** होतो.
दुःसह-दुस्सह, निःशोक - निस्सोक.

६) पालिभाषेत रकार (्र) चा अभाव आहे. उदा. ब्राह्मण - बाह्मण, ब्रह्म - बह्मा.

अ) सर्व ठिकाणी संयुक्त व्यंजनातील **र** चा लोप होतो व आलेला वर्ण द्‌वित्व पावतो.
कर्म - कम्म, कर्ण -कण्ण, पर्ण - पण्ण, वर्ण - वण्ण, वर्ग -वग्ग, धर्म -धम्म, चक्र - चक्क, सर्व - सब्ब, पर्वत - पब्बतो.

आ) मराठी किंवा संस्कृतमधील शब्दांच्या आरंभी **र** युक्त जोडाक्षर असल्यास पालित त्या र चा लोप होतो. परंतु उरलेला वर्ण द्‌वित्व पावत नाही.
प्रजा - पजा, ग्राम-गाम, प्रिय -पिय, ग्रंथ - गंन्थ प्रकार - पकार, प्रपंच- पपंच(पपञ्च)

इ) **र्य** बद्दल **रिय** होतो व **र्य** मागील दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
भार्या - भरिया, सूर्य -सुरिय, आर्य - अरिय, कदर्य - कदरिय.

७) अ) दीर्घ स्वराच्या पुढे संयुक्त व्यंजन किंवा अनुस्वार आल्यास दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
तीर्थ- तित्थं, मार्दव -मद्दिवं, ईश्वर - इस्सर, नदीम् - नदिं, शालम् - सालं, कुर्म - कुम्म, पराक्रम - परक्कमं
आ) ऱ्हस्व स्वरावरील अनुस्वाराचा लोप होऊन तो ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो व दीर्घ स्वरावर अनुस्वार आला असेल तर तो दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
सिंह- सीह, विंशति - वीसति, मांस- मंस, पांशु -पांसू.

८) पदातील आदि **क्ष** चा **ख** होतो. उदा. क्षीर-खीर, क्षेम-खेम

९) पदातील मध्य क्ष चा काही ठिकाणी **क्ख** तर काही ठिकाणी **च्छ** होतो.

दक्षिण - दक्खिण, मोक्ष - मोक्ख, पक्ष -पक्ख, अक्षि - अच्छि किंवा अक्खि.

१०) ड, ढ चा अनुक्रमे **ळ** किंवा **ळ्ह** होतो. उदा.
गुड - गुळ, दाडिम - दाळिम, षोडस - सोळस, क्रीडा - कीळा, तडाग-तळाक, आषाढ - आसाळ्ह.

११) जोडाक्षरात शेवटचे व्यंजन म्, न्, य् किंवा व् असेल तर त्याचा लोप होतो व उरलेल्यांचे द्‌वित्व होतो. युग्म-युग्ग, नग्न - नग्ग, सौम्य - सम्म, अध्वा - अद्धा. परंतु म, न, य, व हे वर्ण **ह** शी संयुक्त असतील तर त्याचा लोप होत नाही. पण म, न, य, व बदलते. सह्य - सय्ह, परंतु ब्राह्मण व ब्रह्म याऐवजी बाह्मण, बह्म होतात. ब्राह्मण आणि ब्रह्म हे शब्द पालिमधील नाहीत.

१२) जोडाक्षरातील **व** चा ब होतो व त्याचे द्‌वित्व होते. उदा. सर्व-सब्ब, पर्वत -पब्बत.

**१३) जोडाक्षरांचे पालि शब्दातील इतर काही बद्‌दल पुढील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र | जोडाक्षर | शब्दारंभी | शब्दामध्ये |
|---|---|---|---|
| १) | त्य, थ्य, द्य, ध्य | च, छ, ज, झ<br>त्याग - चाग<br>युति - जुति<br>ध्यान - झान | च्च, च्छ, ज्ज, ज्झ<br>नृत्य - नच्च<br>मद्य - मज्ज<br>तत्थ - तच्छ |
| २) | स्त, स्थ, ष्ठ | थ, ट, ठ, ट्ठ<br>स्तुति - थुति<br>स्थान - ठान | अष्ठ - अट्ठ<br>गृहस्थ - गहट्ठ<br>काष्ठ - कट्ठ |
| ३) | श्व, प्स, त्स | -- | च्छ,<br>आश्चर्य - अच्छरिय<br>अप्सरा - अच्छरा<br>वत्स - वच्छ |
| ४) | ष्क, स्क, क्ष | ख<br>स्कन्ध - खन्ध<br>क्षान्ति - खन्ति | क्ख<br>भिक्षू - भिक्खू<br>शुष्क - सुक्ख |
| ५) | क्ष | छ<br>क्षुब्ध - छुद्ध | च्छ<br>इक्षु - उच्छु |
| ६) | स्प, ष्प | फ<br>स्पदन - फन्दन | प्फ<br>पुष्प - पुप्फ |
| ७) | न्य, ण्य, ज्ञ | ञ<br>न्याय - ञाय | ञ्ञ<br>कन्या - कञ्ञा<br>प्रज्ञा - पञ्ञा<br>अरण्य - अरञ्ञ |
| ८) | ष्ण | | ण्ह<br>उष्ण - उण्ह |

## ३) काळ प्रत्यय

### पच्चुपन्नकाल (वर्तमानकाळ)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | (अहं) मि | (मयं) म |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | (त्वं) सि | (तुम्हे) थ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | (सो, सा, तं) ति | (ते, ता, तानि) अन्ति |

### अतीतकाल (भूतकाळ)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इं | (मयं) इम्ह |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इ | (तुम्हे) इत्थ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इ | (ते, ता, तानि) इंसु, उं |

### अनागतकाल (भविष्यकाळ)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इस्सामि | (मयं) इस्साम |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इस्ससि | (तुम्हे) इस्सथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इस्सति | (ते, ता, तानि) इस्सन्ति |

### आज्ञार्थ

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) मि | (मयं) म |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) हि | (तुम्हे) थ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) तु | (ते, ता, तानि) अन्तु |

### विध्यर्थ

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) एय्यामि | (मयं) एय्याम |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) एय्यासि | (तुम्हे) एय्याथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) ए, एय्य | (ते, ता, तानि) एय्युं |

### संकेतार्थ

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इस्सं | (मयं) इस्सम्ह |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इस्स | (तुम्हे) इस्सथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इस्स | (ते, ता, तानि) इस्संसु |

# ४) सन्धी

**एकापुढे एक येणारे जवळजवळचे वर्ण एकत्र जोडण्याच्या प्रकारास 'सन्धी' असे म्हणतात.**

पालिमध्ये तीन प्रकारच्या सन्धी आहेत -

१) स्वर सन्धी  २) व्यंजन सन्धी  ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी

## १) स्वर सन्धी

दोन स्वर एकापुढे एक असल्यास ते एकमेकांत मिळून जातात. त्यास स्वरसन्धी म्हणतात. पालि भाषेतील स्वरसन्धी विषयाचे काही प्रमुख नियम पुढीलप्रमाणे आहेत.

१) अ पासून ऊ पर्यंत स्वरापुढे सजातीय (म्हणजे त्याच प्रकारचा) स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल एक दीर्घ स्वर होतो.

| प्रकार | उदाहरणे | सन्धी | प्रकार | उदाहरणे | सन्धी |
|---|---|---|---|---|---|
| अ + अ | पन + अयं | पनायं | आ + अ | पाद + अपि | पादापि |
| आ + आ | तण्हा + आकुला | तण्हाकुला | इ + इ | उपद्दहन्ति + इति | उपद्दहन्तीति |
| इ + ई | नहि + ईदिसो | नहीदिसो | | | |
| उ + ऊ | बहु + ऊसहन | बहूसहन | उ + उ | बहु + उपकारो | बहूपकारा |

२) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांची सन्धी होताना क्वचित पहिल्या स्वराचा लोप होतो.

पुरिस + उत्तमो ( = अ+उ) = पुरिसुत्तमो

निलानि + एकानि ( = इ + ए) = निलानेकानि

तत्र+ इमे (अ +इ) = तत्रिमे

तत्थ + इमे (अ + इ) = तत्थिमे

अज्ज + उपोसथो ( = अ + उ) = अज्जुपोसथो

एसो + आवुसो (= ओ + आ) = एसावुसो

३) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांची सन्धी होत असता क्वचित पुढच्या स्वराचा लोप होतो.

रूक्खो + अपि (=ओ + अ) = रूक्खोपि

देवो + अम्हि ( = ओ + अ) = देवोम्हि

सो + अहं (=ओ + अ) = सोहं

सो + अपि ( = ओ + अ) = सोपि

चत्तारो + इमे (= ओ + इ) = चत्तारोमे

४) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांची सन्धी होत असता कधी कधी दोहोंपैकी एकाही स्वराचा लोप होत नाही.

कञ्ञा + इव (= आ + इ) = कञ्ञाइव

लता + इव (= आ + इ) = लताइव, लतेव, लताव

५) लोप झालेल्या स्वरापुढे 'इ' असेल तर त्याऐवजी 'ए' होतो आणि 'उ' असेल तर त्याचा 'ओ' होतो.

तस्स + इदं (= अ +इ) = तस्सेद

वात + इरितं (= अ + इ) = वातेरितं;

वाम + उरू (= अ + उ) = वामोरू
वि + उदकं ( = इ + उ) = वोदक.

६) 'इ' (ऱ्हस्व - दीर्घ) अथवा 'उ' (ऱ्हस्व - दीर्घ) यांच्यापुढे इतर वर्ण आल्यास 'इ' चा 'य' आणि 'उ' चा 'व' होतो.
वि + आकतो (= इ+आ) = व्याकतो
इति + अस्स (= इ + अ) = इत्यस्स
सु + आगतं ( = उ + आ) = सुसागतं, स्वागत= सागतं
बहु + आबाधो (= उ + आ) = बव्हाबाधो

## २) व्यंजन सन्धी

**जेव्हा एक व्यंजन दुसऱ्या व्यंजनाबरोबर अथवा स्वराबरोबर मिळते तेव्हा त्याला व्यंजन सन्धी म्हणतात.**

१) जेव्हा एखादया स्वरापुढे पर- अक्षर हे जर व्यंजन असेल तर पूर्वी असलेल्या ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर होतो आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर होतो.
सम्म + धम्मो ( =अ + ध + अ) = सम्माधम्मो
खन्ति + परमं ( = इ + प + अ) = खन्तीपरमं
जायति + सोको (= इ + स + ओ) = जायतीसोको
मुनि + चरे (= इ + च +अ) = मुनीचरे

२) स्वरापुढे व्यंजन आले असल्यास केव्हा केव्हा त्या व्यंजनाचे द्वित्व होते.
वि + गहो (= इ + ग + अ) = विग्गहो
प + गहो (= अ + ग +अ) = पग्गहो
दु +कतं (= उ + क + अ) = दुक्कतं

३) 'ए' आणि 'ओ' च्या नंतर कोणताही वर्ण आल्यास 'ए' आणि 'ओ' चा 'अ' होतो.
याचकं आगते (= ए + आ) = याचकमागते
सो + सीलवा (= ओ + स् + ई) = स सीलवा

## ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी

**अनुस्वारा (निग्गहिता) बरोबर स्वर अथवा व्यंजन मिळते तेव्हा त्याला निग्गहित सन्धी म्हणतात.**

१) काही वेळा निग्गहिताचा लोप होतो. उदा.
सं + रत्तो = सारतो
सं + रागो = सारागो
कथं + अहं = कथाहं
गन्तुं + कामो = गन्तुकामो
बुद्धानं + सासनं = बुद्धानसासनं
एवं + अहं = एवाहं

२) निग्गहिता (अनुस्वारा) पुढे आलेल्या स्वराचा काही वेळा लोप होतो. उदा.
त्वं + असि = त्वंसि
किं + इति = किंति
इदं + अपि = इदम्पि
अलं + इदानि = अलन्दानि

३) जर निग्गहितानंतर 'य', 'एव' तसेच 'हि' हे शब्द आल्यास, निग्गहिताचा काही वेळा 'ञ' होतो. तसेच 'य' पुढे आल्यास पूर्वीच्या 'स' शब्दावरील निग्गहिताचा 'ञ' होतो. उदा.
तं + एव = तञ्ञेव
तं + हि = तञ्हि
एवं + आह = एवमाह
सं + यतो = सञ्ञतो
सं + यमो = सञ्ञमो
एवं + एव = एवमेव

## ५) धातुरुपाविषयी माहिती (काळ)

१) क्रियावाचक शब्दाला 'धातू' म्हणतात. मूळ धातूला परस्मैपदाचे प्रत्यय लावून क्रियापद बनवता येते. एकंदरीत पालिभाषेत आत्मनेपदी क्रियापदांची रूपे कमी आहेत.

२) प्रामुख्याने पालिमध्ये परस्सपदाचा उपयोग करण्यात येतो. आत्मनेपद कर्मणि प्रयोग व कवितेत उपयोगात येते.

३) पालिभाषेत द्विवचन नसल्याने क्रियापद एकवचनी किंवा अनेकवचनी असते.

४) पालि व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पालि व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालील प्रमाणे क्रम आहेत.

| पालि | मराठी | पालि | मराठी | पालि | मराठी |
|---|---|---|---|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष | मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष | पठम पुरिस | तृतीय पुरुष |

५) काळ व अर्थवाचक काही पालि संज्ञा पुढीलप्रमाणे

| पालि | मराठी | पालि | मराठी |
|---|---|---|---|
| १) पच्चुपन्न कालो<br>३) भविस्सन्ती/ अनागत कालो | वर्तमानकाळ<br>भविष्यकाळ | २) हीय्यत्तनी / अतीत कालो | भूतकाळ |

### पच्चुपन्न कालो (वर्तमानकाळ)

### वर्तमानकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) मि | (मयं) म |
| मज्झिम पुरिस | (त्वं) सि | (तुम्हे) थ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) ति | (ते, ता, तानि) अन्ति |

### पच = शिजविणे

| पुरिस (पुरुष)/ वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | पचामि | पचाम |
| मज्झिम पुरिस | पचसि | पचथ |
| पठम पुरिस | पचति | पचन्ति |

खाद, नम, गच्छ, पठ, वस, कस इत्यादी धातू 'पच' प्रमाणे चालतात.

### अतीत कालो (भूतकाळ)

### भूतकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) इं | (मयं) इम्ह |
| मज्झिम पुरिस | (त्वं) इ | (तुम्हे) इत्थ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) इ | (ते, ता, तानि) इंसु, उं |

## खाद (खाणे)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | खादिं | खादिम्ह |
| मज्झिम पुरिस | खादि | खादित्थ |
| पठम पुरिस | खादि | खादिंसु, खादुं |

कीळ, हस, लभ, नम, वस, गच्छ इत्यादी धातू 'खाद' प्रमाणे चालतात.

## अनागतकालो (भविष्यकाळ)

## भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) इस्सामि | (मयं) इस्साम |
| मज्झिम पुरिस | (त्वं) इस्ससि | (तुम्हे) इस्सथ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) इस्सति | (ते, ता, तानि) इस्सन्ति |

## पठ (शिकणे/वाचणे)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | पठिस्सामि | पठिस्साम |
| मज्झिम पुरिस | पठिस्ससि | पठिस्सथ |
| पठम पुरिस | पठिस्सति | पठिस्सन्ति |

लभ, गच्छ, नम, वस, कस इत्यादी धातू 'पठ' प्रमाणे चालतात.

☆☆☆

# ६) समास

**भाषेत जेव्हा दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊन व्याकरण दृष्ट्या एक शब्द होतो तेव्हा त्याला समास किंवा सामासिक शब्द असे म्हणतात.** असे समास हे अभिजात भाषांचे वैशिष्ट्य होय. पालि भाषेमध्ये समासांचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत –

१) द्वन्द (द्वन्द्व) समास
२) तप्पुरिस (तत्पुरुष) समास
३) बहुब्बीहि (बहुव्रीही) समास
४) अव्वयीभाव (अव्ययीभाव) समास

## १. द्वन्द (द्वन्द्व) समासः

दोन अथवा जास्त शब्दातील 'च' (आणि) चा लोप करुन जो समास तयार होतो त्याला 'द्वन्द' (द्वन्द्व) समास असे म्हणतात. यामध्ये सर्व शब्द सारखेच महत्त्वाचे असतात. द्वन्द समास दोन प्रकारे आहेत –

अ) समाहार द्वन्द समास
ब) इतरेतर द्वन्द समास

**अ) समाहार :** दोन संज्ञा समासात येऊन 'च' ने जोडल्यावर अर्थ प्रगट करतात आणि एक समाहाराचा (समूहाचा) बोध करतात तेव्हा तो समाहार द्वन्द समास होतो, हा समास नपुंसकलिंगी असतो.

उदा.

मुखं च नासिका च – मुखनासिकं
गीतं च वादितं – गीतवादितं
युगं च नङ्गलं च – युगनङ्गलं
डंसो च मकसो च – डंसमकसं
दासि च दासो च – दासिदासं
कण्हो च सुक्को च – कण्हसुक्कं

**ब) इतरेतर :** जेव्हा समासातील दोन्ही पदे प्रधान असतात तेव्हा त्यास 'इतरेतर द्वन्द समास' म्हणतात. हा समास नित्य बहुवचनी असून शेवटच्या पदाचे लिंग हे त्या संपूर्ण समासाचे लिंग असते.

उदा.

चन्दिमा च सुरियो च – चन्दिमसुरिया
समणो च ब्राह्मणो च – समणब्राह्मणो
माता च पिता च – मातापितरो
पिता च पुत्तो च – पितापुत्ता

## २. तप्पुरिस (तत्पुरुष) समास :

तत्पुरुष समासाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) विभत्ति तप्पुरिस
२) कम्मधारय
३) द्विगु
४) मज्झिमपदलोपी
५) नञतप्पुरिस
६) अलुत्ततप्पुरिस
७) उपपदतप्पुरिसं

### १) विभत्तितप्पुरिस (विभक्ती तत्पुरुष) :

**दुतिया तप्पुरिस :**

उदा. गामं गतो –गामगतो
देसं गतो – देसगतो
बन्धनं गतो – बन्धगतो

**ततिया तत्पुरिस :**

उदा. बुध्देन भासितं – बुध्दभासितं
पितुना सदिसो – पितुसदिसो

**चतुत्थी तप्पुरिस :**

उदा. सङ्घाय भत्तं – सङ्घभत्तं
कुण्डलाय सुवण्णं – कुण्डलसुवण्णं
रजनाय दोणि – रजनदोणि
नहानाय जलं – नहानजलं

**पञ्चमी तप्पुरिस :**

उदा. चोरस्सा भयं – चोरभयं  पापस्मा मुत्तो – पापमुत्तो

मुसावादा विरति – मुसावादविरति

**छट्ठी तप्पुरिस :**

उदा. रुक्खस्स साखा – रुक्खसाखा  धञ्ञस्स रासि – धञ्ञरासि  रञ्ञो पुत्तो – राजपुत्तो, रञ्ञोपुत्तो

रञ्ञो पुरिसो – राजपुरिसो  मगधानं राजा – मगधराजा

**सत्तमी तप्पुरिस :**

उदा. संसारे दुक्खं – संसारदुक्खं  जले कीळा – जलकीळा

आकासे गमनं – आकासगमनं  अकाले मेघो – अकालमेघो

**२) कम्मधारय समास (कर्मधारय समास):** जेव्हा समासातील दोन्ही घटक एकाच विभक्तीत असतात. (समानाधिकरण) तेव्हा 'कम्मधारय समास' होतो.

उदा. महन्तो पुरिसो – महापुरिसो  मुखं चन्दो विय – मुखचन्दो

पञ्ञा सुरियो विय – पञ्ञासुरियो  विज्जा एव धन – विज्जाधनं

बुध्दघोसो येव आचरियो –बुद्धघोसाचरियो

**३) द्विगु :** जेव्हा कम्मधारय समासाचे पहिले पद संख्यावाचक असते तेव्हा द्विगु समास होतो.

उदा. दस सीलानि – दससीलानि  एको पहारो – एकप्पहारो

**४) मज्झिमपदलोपि :** कर्मधारय समासात दोन पदांना जोडणारे पद जेव्हा गाळले जाते तेव्हा मज्झिपदलोपि समास होतो.

उदा. गन्धेन मिस्सित तेलं – गन्धतेलं पिट्ठिया उग्गतो पासाणो – पिट्ठिपासाणो

**५) नञतप्पुरिस :** जेव्हा नकारवाचक किंवा निषेधवाचक अव्ययाचा नामाशी समास होतो तेव्हा त्याला नञतप्पुरिस समास म्हणतात.

उदा. न मनुस्सो – अमनुस्सो

न कालो – अकालो

न पण्डितो – अपण्डितो

न वसलो – अवसलो

न ब्राह्मणो – अब्राह्मणो

धम्मस्स विरुद्धो – अधम्मो

संसयस्स अभावो – असंसयो

**६) अलुत्त तप्पुरिस :** या प्रकारात पहिल्या पदाचा विभक्ती प्रत्यय-तसाच राहतो, त्याचा लोप होत नाही.

उदा. परस्स पदं – परस्सपदं  अन्ते वसति – अन्तेवासी,  उदके चरन्ति – उदकेचरा

**७) उपपद तत्पुरिस :** जेव्हा समासाचे दुसरे पद धातुसाधित असते आणि ते स्वतंत्रपणे वापरता येत नाही तसेच समासाचा विग्रह केला असता त्या धातुसाधित पदाचे क्रियापदात रुपांतर होते. तेव्हा उपपद तप्पुरिस समास होतो.

उदा.फले जायति इति – फलजं  कुम्भं करोति इति – कुम्भकारो

धनं ददाति इति – धनदो  धम्मं जानाति इति – धम्मञ्ञू

### ३. बहुब्बीहि (बहुव्रीही) समासः

ज्यावेळी दोन किंवा अधिक पदांचा समास तयार होतो संपूर्ण समास दुसऱ्याच एखाद्या नामाचे किंवा अर्थाचे विशेषण होतो व त्याविषयी माहिती सांगतो त्यावेळी ‘बहुब्बीही (बहुव्रीही) समास’ म्हणतात.

उदा. बहूनि धनानि यस्स सो बहुधनो.
जितानि इन्दियानि यस्स सो जितिन्द्रियो.
लम्बा कण्णा यस्स सो लम्बकण्णो.
समानं उदरं यस्स सो सोदरियो.
मना सेट्ठा एतेसं इति मनोसेट्ठा.
उदक पीयते अस्मिं इति उदपान.

### ४. अव्वयीभाव (अव्ययीभाव) समास :

जेव्हा समासाचे पहिले पद अव्यय आणि दुसरे नाम असते तेव्हा संपूर्ण समास अव्यय होतो. म्हणून त्याला ‘अव्वयीभाव (अव्ययीभाव) समास’ म्हणतात.

उदा. दिन दिने - पटिदिनं
वस्स वस्से - अनुवस्सं
नगरा बहि - बहिनगरे
कम्मं अनतिकम्मं-यथाकम्मं
गङ्गाय समीप - उपगङ्गं

## ७) अव्यय

**१. हेत्वर्थक अव्यय :** ‘हे करण्याकरिता’ या अर्थी हेत्वर्थक अव्यय उपयोगात आणले जाते.
धातूला ‘तुं’ ‘ताये’ आणि ‘तवे’ हे प्रत्यय लावून हेत्वर्थक अव्यय तयार होतात.

उदा. सो भोतुं गच्छति । (तो जेवण्याकरिता जातो.)
कातुं गच्छति। (करण्याकरिता जातो.)
कातवे गच्छति । (करण्याकरिता जातो.)


**२. पूर्वकालवाचक अव्यय :** ‘हे काम करून’ या अर्थी पूर्वकालवाचक अव्यय उपयोगात आणले जाते. धातूला ‘त्वा’, ‘त्वान’, ‘तून’ हे प्रत्यय लावून पूर्वकालवाचक अव्यय तयार होतात.

उदा. सो विहारं गन्त्वा बुद्धं वन्दति।
(तो विहारात जावून बुद्धाला वंदन करतो.)
सो सुत्वा याति ।
सो सुत्वान याति ।
सो सोतून याति ।
(तो ऐकून येतो)

☆☆☆

# परिसिट्ठं द्वे– सुलभो पालि (सुलभ पालि)

## १) सरीरस्स अवयवानि




## २) ञातिगणा

| | |
|---|---|
| माता = आई | धीता = मुलगी |
| पिता = वडिल | सस्सु = सासू |
| भाता = भाऊ | सालको = मेहुणा |
| भगिनी = बहिण | दवरो = दीर |
| मातुलो = मामा | ननन्दरा = नणंद |
| मातुच्छा = मावशी | भागिनेय्यो = भाचा |
| पितुच्छ = आत्या | नत्तरो = नातू |
| अय्यको = आजी | भत्तु = पती |
| चुळपिता = चुलता/काका | दारा = पत्नी |
| चुळमाता = चुलती/काकू | पुत्तो = मुलगा |
| तनय = मुलगा<br>तनया = मुलगी | ससुरो = सासरा |

## ३) वण्णानि (रंगानि)

- सेतं (पांढरा)
- नीलं (निळा)
- पीतं (पिवळा)
- लोहितं (लाल)
- पिङ्गलं (तपकिरी)
- हरित (हिरवा)
- कासायं (तांबडा)
- कण्हं (काळा)
- पाटलं (गुलाबी)

## ४) रसानि

| मधुरं | कटुकं | अम्बिलं | तिखिणं |
|---|---|---|---|
| अम्बं = आंबा | कारवेल्लं = कारले | तक्कं = ताक | मरिचं = मिरची |
| उच्छुं = ऊस | ओसधं = औषध | दधिं = दही | पलण्डुक = कांदा |
| पायासं = खीर | काखल्लो = कडू भोपळा | चिचा = चिंच | पिप्पलं = काळीमिरी |

## ५) गेहसेवक पसु



उसभो(बैल)



धेनु(गाय)



महिसा(म्हैस)



ससो/पेलको(ससा)



अजो(बकरा)



एळको (एडका)



सुनखो/कुक्कुरो(कुत्रा)



अस्सो(घोडा)



बिळारो/मज्जारो(मांजर)



मेण्डको (मेंढा)



गदभो(गाढव)

## ६) तिरच्छाना



सीहो (सिंह)



व्यग्घो (वाघ)



अच्छो (अस्वल)



सिगालो (लांडगा)



कुञ्जरो (हत्ती)



कपि (माकड)



मिगो (हरीण)



करभो (उंट)



खग्गविसाणो (गेंडा)



तरच्छो (तरस)



वको (कोल्हा)



सुकरो (डुक्कर)

## ७) जलथलगोचरा



उरगो(साप)



मण्डूको(बेडूक)



ककण्टको(सरडा)



गोधा(घोरपड)



उद्रो(पाणमांजर)



सरभू(पाल)



मच्छो(मासा)



कक्कटको(खेकडा)



कुम्भीलो(मगर)




कच्छपो(कासव)

## ८) किमी



किपिल्लिका(मुंगी)



पटङ्गो (नाकतोडा)



भमरो(भुंगा)



मकसो(मच्छर)



मक्कटकको(कोळी)



मधुपा(मधमाशी)



मकुणो(ढेकूण)



झल्लिका(रातकिडा)

## ९) सकुणा


मयुरो(मोर)



कुणालो(कोकिळ)


कुक्कटो(कोंबडा)



कुक्कुटी(कोंबडी)


उलूको(घुबड)


कोञ्चो(बगळा)


कोट्ठो(सुतारपक्षी)


यालिया(मैना)


गिज्झो(गिधाड)


काको(कावळा)


चटको(चिमणा)


कपोतो(कबूतर)

## १०) फलफलानि च पुष्पानि च



कदली(केळे)



उच्छु(ऊस)



अम्बं(आंबा)



जम्बु(जांभूळ)



बदरं(बोर)



कक्कारिका(काकडी)



पदुमं(कमळ)



कक्कारु(दुधी भोपळा)



लबुजं(फणस)



मल्लिका(चमेली)



कुमुदं(पांढरेकमळ)

## ११) यानानि


रथं(रथ)


आकासयानं(विमान)


नाव(होडी)


सकटं(बैलगाडी)

## १२) आयुधं (हत्यारे)


ककचं(करवत)


असि(तलवार)


वासि(कुऱ्हाड)


कुद्दलं (कुदळ)


विकन्तह(चाकू)


सूलं(भाला)


छुरिका(सुरी)


खुरं(पाते)


कुटं(हातोडी)

## १३) **संख्या** (अंक)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एकं | २९ | एकूनतिंसति |
| २ | द्वे | ३० | तिंसति |
| ३ | तयो/ति/तय | ३१ | एकतिंसति |
| ४ | चतु(चतारो) | ३२ | द्वात्तिसति |
| ५ | पञ्च | ३३ | तेत्तिंसति |
| ६ | छ | ३४ | चतुत्तिंसति |
| ७ | सत्त | ३५ | पञ्चतिंसति |
| ८ | अट्ठ | ३६ | छत्तिंसति |
| ९ | नव | ३७ | सत्ततिंसति |
| १० | दस | ३८ | अट्ठतिंसति |
| ११ | एकादस | ३९ | एकूनचत्ताचाळीसति |
| १२ | द्वादस,(बारस) | ४० | चत्ताळीसति |
| १३ | तेळस(तेरस) | ४१ | एकचत्ताळीसति |
| १४ | चुद्दस, चतुद्दस | ४२ | द्विचताळीसति |
| १५ | पण्णरस, पञ्चदस | ४३ | तेचत्ताळीसति |
| १६ | सोळस | ४४ | चतुचत्ताळीसति |
| १७ | सत्तरस, सत्तदस | ४५ | पञ्चचत्ताळीसति |
| १८ | अट्ठादस, अट्ठादस | ४६ | छत्ताळीसति |
| १९ | एकूणवीसति | ४७ | सत्तचत्ताळीसति |
| २० | वीसति | ४८ | अट्ठचत्तालिसति |
| २१ | एकवीसति | ४९ | एकूनपञ्ञासति |
| २२ | द्वावीसती, बावीसति | ५० | पण्णासा,पञ्चासति |
| २३ | तेवीसति | ५१ | एकपञ्ञासति,एकपण्णासा |
| २४ | चतुवीसति | ५२ | द्वेपञ्ञासति, द्वेपण्णासा |
| २५ | पञ्चवीसति | ५३ | तिपञ्ञासति, तिपण्णासा |
| २६ | छब्बसति | ५४ | चतुञ्ञासति,चतुपण्णासा |
| २७ | सत्तावीसति | ५५ | पञ्चपञ्ञासति, पञ्चपण्णासा |
| २८ | अट्ठावीसति | ५६ | छपञ्ञासति,छपण्णासा |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७ | सत्तपञ्ञासति, सत्तापण्णासा | ८० | असीति |
| ५८ | अट्ठपञ्ञासति, अट्ठपण्णासा | ८१ | एकासिति |
| ५९ | नवु पञ्ञासति, एकुणसट्ठि | ८२ | द्वेअसीति, द्विआसीति |
| ६० | सट्ठि | ८३ | तेसअसति, तिअसीति |
| ६१ | एकसट्ठि | ८४ | चतुरासीति |
| ६२ | द्वासट्ठि, द्विसट्ठि | ८५ | पञ्चअसीति |
| ६३ | तेसट्ठि, तिसट्ठि | ८६ | सट्ठअसीति |
| ६४ | चतुसट्ठि | ८७ | सत्त असीति |
| ६५ | पञ्चसट्ठि | ८८ | अट्ठअसीति |
| ६६ | छसट्ठि | ८९ | एकुननवुति |
| ६७ | सतसट्ठि | ९० | नवुति |
| ६८ | अठसट्ठि | ९१ | एक नवुति |
| ६९ | एकूनसत्तति | ९२ | द्वानवुति, द्विनवुत्ति |
| ७० | सत्तति | ९३ | तेनुवुति, तिनवुति |
| ७१ | एकसत्तति | ९४ | चतुनवुति |
| ७२ | द्वासत्तति,द्विसत्तति | ९५ | पञ्चनवुति |
| ७३ | तेसत्तति, तिसत्तति | ९६ | छनवुति |
| ७४ | चतुसत्तति | ९७ | सत्तनवुति |
| ७५ | पञ्चसत्तति | ९८ | अट्ठनवुति |
| ७६ | छसत्तति | ९९ | एकूनसतं |
| ७७ | सत्तसत्तति | १०० | सतं |
| ७८ | अट्ठसत्तति | १००० | सहस्सं |
| ७९ | एकूनासीति | १०,००० | नहुतं |

| | |
|---|---|
| १,००,००० | सत सहस्सं |
| १,००,००,००० | कोटी |
| १,०००००००००००००० | पकोटी |
| १,००००००००००००००००००००० | कोटी पकोटी |

☆☆☆

# परिसिट्ठं तयो– संवाद कौशल्य, निबन्धो (निबंध)

## संवाद कौशल्य

१) पोत्थकं किं भासाय लिखितं?
पुस्तक कोणत्या भाषेत लिहिले आहे.?
२) पोत्थकं पालि भासाय लिखिता।
पुस्तक पालि भाषेत लिहीले आहे.
३) पालिभासा मधुरं अत्थि।
पालि भाषा मधुर आहे.
४) तथागतो बुद्धेन पालिभासाय धम्मदेसना ददि।
तथागत बुद्धाने पालिभाषेत धम्मोपदेश केला.
५) पालिभासा धम्मगन्थस्स भासा अत्थि।
पालिभाषा धम्मग्रंथाची भाषा आहे.
६) डॉ. बाबासाहेब आम्बेडकरो पालिसद्दकोसं लिखितं।
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पालि शद्बकोश लिहिला आहे.
७) त्वं पालिभासा जानासि?
तू पालिभाषा जाणतोस?
८) अहं पालिभासा जानामि।
मी पालि भाषा जाणतो.
९) तव हत्थस्मिं पोत्थकं किदिसा भासा लिखिता अत्थि।?
तुझ्या हातातील पुस्तक कोणत्या भाषेत लिहीले आहे?
१०) मम हत्थेसु पोत्थकं पालिभासाय लिखितं अत्थि।
माझ्या हातातील पुस्तक पालि भाषेत लिहीले आहे.
११) अहं पालिभासाय अज्झापकं अत्थि।
मी पालिभाषेचा अध्यापक आहे.
१२) मा धितरं भूहणवधं करोथ।
मुलीची भ्रूणहत्या करू नका.
१३) सचे सब्बे माताय पुत्तं इच्छन्ति ते सुण्हा कुहिं लभन्ति।?
जर सर्वच माता मुलांचीच इच्छा करीत असतील तर त्यांना सुना कुठून मिळतील?
१४) त्वं कुहिं वससि?
तू कुठे राहतोस?
१५) अहं लुम्बिनी नगरे वसामि।
मी लुंबिनी नगरात राहतो.
१६) इदं मम गेहं।
हे माझे घर आहे.
१७) मम गेहं एकं उय्यानं समीपं अत्थि।
माझे घर एका उद्यानाजवळ आहे.
१८) विज्जालयं पस्सित्वा ममं अतिव आनन्दो होति।
विद्यालय पाहून मला खूप आनंद होतो.
१९) अहं मातरं च पितरं च वन्दामि।
मी आई आणि वडिलांना वंदन करतो.
२०) अहं आचरियं वन्दामि।
मी आचार्याला वंदन करतो.
२१) मातापितुं उपट्ठानं करेय्य।
आईवडीलांची सेवा करावी.
२२) केचि मनुस्सा न जच्चावं सेट्ठो।
कोणताही माणूस जातीने श्रेष्ठ होत नाही.
२३) सब्बे समसमाना सन्ति।
सर्व समसमान आहेत.
२४) इत्थि च पुरिसो च समाना सन्ति ।
स्त्री पुरुष समान आहेत.
२५) मा मुसा भणथ।
खोटे बोलू नका.
२६) मज्ज मा पिवथ।
मद्य पिऊ नका.
२७) मा पापमित्ते भजथ।
वाईट मित्रांची संगती करू नका.
२८) मा गण्ह अदिन्नं दानं।
न दिलेले घेऊ नको.
२९) द्वेत्थेसु दस अङ्गुलियो।
दोन हाताला दहा बोटे आहेत.

३०) अयं पञ्चसीले धजो।
हा पंचशील ध्वज आहे.
३१) पस्स अयं धजो।
हा ध्वज पहा.
३२) अयं अम्हाक रट्ठधजो।
हा आमचा राष्ट्रध्वज आहे.
३३) रट्ठधजस्स मज्झेभागे असोकचक्कं अत्थि।
राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी अशोकचक्र आहे.
३४) असोकथम्भे चतारो सीहा भारतस्स राजमुद्दा अत्थि।
अशोकस्तंभावर कोरलेले चार सिंह भारताची राजमुद्रा आहे.
३५) सुप्पभातं।
सुप्रभात.
३६) सागतं! भवतो निसिदाह इमस्मिं आसने ।
स्वागत! कृपा करून येथे या आसनावर बसा.
३७) को तुम्हं पिता नामं?
तुझ्या वडिलांचे नाव काय?
३८) मम पिता नाम भिमरावो अत्थि।
माझ्या वडीलांचे नाव भीमराव आहे.
३९) को अत्थि त्वं?
तू कोण आहे?
४०) अहं एको माणवको अत्थि।
मी एक विद्यार्थी आहे.
४१) कुहित्वा त्वं आगच्छसि?
तू कोठून आला आहेस?
४२) अहं नागपुरनगरे आगच्छामि।
मी नागपूर नगरातून आलो आहे.
४३) तुम्हं मातापितरो कुहिं वसति?
तुझे आईवडील कुठे राहतात?
४४) तव भातरो किं करन्ति?
तुझे भाऊ काय करतात?
४५) तुम्हं आयु कित्तं अत्थि?
तुझे वय किती आहे?
४६) इदं मे अक्खी ।
हे माझे डोळे आहेत.
४७) इदं अक्खिनं अहं पस्सामि।
या डोळ्यांनी मी पाहतो/पाहते.
४८) इदं मे कण्णेन अहं सद्दं सुणामि।
माझ्या कानांनी मी शब्द ऐकतो.
४९) इदं मे मुखं अत्थि।
हे माझे तोंड आहे.
५०) मयस्स मुखेन अहं खादामि।
माझ्या तोंडाने मी खातो.
५१) इदं मम हत्थं अत्थि।
हे माझे हात आहेत.
५२) मम हत्थेन अहं कम्मं करोमि।
माझ्या हाताने मी काम करतो.
५३) अहं विज्जालयं गच्छामि।
मी विद्यालयात जात आहे.
५४) अहं विज्जालयं गच्छि।
मी विद्यालयात गेलो होतो.
५५) अहं विज्जालयं गच्छिस्सामि।
मी विद्यालयात जाईल.
५६) अहं पोत्थकं पठामि।
मी पुस्तक वाचत आहे.
५७) अहं पोत्थकं पठि।
मी पुस्तक वाचले.
५८) अहं पोत्थकं पठिस्सामि।
मी पुस्तक वाचेल.
५९) अहं भोजनं भुञ्जामि।
मी जेवन करीत आहे.
६०) अहं भोजनं भुञ्जि।
मी जेवन केले.

## **निबन्धो** (निबंध)

**• खालील दिलेल्या विषयांवर निबंध लिहा.**

१) पाठसाला　२) धेनु　३) उय्यानं　४) कस्सको
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरो　६) आचरियो　७) मयं गामं　८) मम परीवारो

# परिसिट्ठं चतु– अपठितो(अपठित उतारे)

## गज्जो विभागो

### १) सुंसुमार जातकं

अतिते वाराणसियं बह्मदत्ते रज्जं कारेन्ते हिमवन्तपदेसे बोधिसत्तो कपियोनियं निब्बत्तित्वा नागबलो थामसम्पन्नो महासरीरो सोभग्गपत्तो हुत्वा गङ्गानिवत्तने अरञ्ञायतने वासं कप्पेसि।तदा गङ्गाय एको सुंसुमारो वसि। अथस्स भरिया बोधिसत्तस्स सरीरं दिस्वा तस्स हदयमंसे दोहळं उप्पादेत्वा सुंसुमारं आह, 'अहं सामि, एतस्स कपिराजस्स हदयंमंसं खादितुकामा, ति 'भद्दे मयं जलगोचरा, एस थलगोचरा किन्तु तं गण्हितुं सक्खिस्सामा' ति। 'येन केन उपायेन गण्ह, सचे न लभिस्सामि मरिस्सामि' ति। 'तेन हि मा भायि, अत्थेको उपायो' ति खादापेस्सामि तं तस्स हदयमंस' न्ति सुंसुमारो समस्सासि। अथेकदिवसं बोधिसत्तस्स गंगाय पानीय पिवित्वा गङ्गातीरे निसिन्नकाले सन्तिकं गन्त्वा एवमाह– 'वानरिन्द, इमस्मिं पदेसे कसटफलानि खादन्तो किं त्वं चिण्णट्ठाने येव चरसि, पारगङ्गाय अम्ब-लबुजादीन मधुरफलानं अन्तो नन्थि,किं ते तत्थ गन्त्वा फलाफलं खादिंतु न वट्टति' ति।

---

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पूर्वी वाराणसीमध्ये कोण राज्य करीत असे?

२) बोधिसत्व कोणत्या कुळात जन्मला होता?

३) बोधिसत्व शरीराने कसा होता?

४) बोधिसत्व कुठे राहत होता?

५) गंगेमध्ये कोण राहत असे?

६) मगराच्या पत्नीला काय खाण्याची इच्छा निर्माण झाली?

७) प्रस्तुत उताऱ्यात कोणत्या मधुर फळांचा उल्लेख आला आहे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अतिते वाराणसियं बोधसत्तो रज्जं कारेन्ते।

२) यदा गङ्गाय एको सुंसुमारो वसि।

३) अहं सामि, एतस्स कपिराजस्स हदयमसं खादितुकामा ति।

४) किन्ति तं गण्हितुं सक्खिस्सामा ति।

५) येन केन उपायेन गण्ह, सचे न लभिस्सामि मरिस्सामि ति।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**

१) किं जलगोचरा च थल गोचरा

(रिकाम्या चौकटी: २)

२) किं द्वे गोचरा

(रिकाम्या चौकटी: २)

**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) वाराणसियं ब्रह्मदत्ते | अ) कपियोनिचं निब्बति। |
| २) हिमवन्तपदेसे बोधिसत्तो | ब) रज्जं कारेन्ते। |
| | क) वासं कप्पेसि। |

# २) सठस्स पटिसाठेय्यं

अतीते वाराणसयिं ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो अमच्चकुले निब्बत्तित्वा वयप्पत्तो विनिच्छयामच्चो अहोसि। तदा गामवासी च नगरवासी चाति द्वे वाणिजा मित्ता अहेसुं। गामवासी नगरवासिस्स सन्तिके पञ्च फालसतानि ठपेसि। सो ते फाले विक्किणित्वा मूलं गहेत्वा फालनं ठपेत ट्ठाने सिकवच्चं आकिरित्वा ठपेसि। उपरभागे गामवासी आगन्ता ''फालं मे देहि'' ति आह। कुटवाणिजो ''फाला ते मूसिकाहि खादिता' ति मूसिकवच्चं दस्सेसि। इतरो खादिता व होन्तु, मूसिकेहि खादिते किं सक्का कातुं ति। गामवासी नहानत्थाय तस्स पुत्तं आदाय गच्छन्तो एकस्स सहायकस्स गेहे इमस्स दारकस्स कत्थचि गन्तुं मा देथा ति वत्वा अन्तोगब्भे निसीदापेत्वा सयं नहायित्वा कुटवाणिजस्स गेहं आगमासि। सो पुत्तो मे कहं ''ति आह'' सम्म,तव पुत्त तीरे ठपेत्वा मम उदके निमुज्जकाले एको कुलको आगन्त्वा तव पुत्त नखपञ्जरेन गहेत्वा आकासे पक्खन्तो, अहं पाणिं पहरित्वा विरवित्वा वायमन्तोपि मोचेतुं नासक्खि ति''।

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) बोधिसत्व कोणत्या कुळात जन्मला होता?

२) ग्रामवासीने नगरवासी जवळ काय ठेवले होते?

३) नगरवासीने लोखंडी फाळांचे काय केले?

४) ग्रामवासीने कोणता विचार केला?

५) ग्रामवासींनी स्नानासाठी जाताना कोणाला सोबत नेले?

६) नगरवासीने ग्रामवासीला काय विचारले?

७) ग्रामवासीने नगरवासीला त्याच्या मुलाबद्दल काय सांगितले?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) नगरवासिस्स सन्तिके सत्त फालसतानि ठपेसि।

२) फालं मे देही ति आह।

३) इमस्स दारकस्स कत्थचि गन्तुं मा देथा ति।

४) सा पुत्तो मे किं ति आह।

५) तव पुत्तं नखपञ्जरेन गहेत्वा आकासे पक्खन्तो।

### ३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.

१)

द्वे मित्ता।

२)

किं पसु च पक्खी च?

### ४. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) तदा गामवासी च नगरवासी च | अ) खादिता'ति। |
| २) फालं ते मूसिकाहि | ब) किं सक्का कातुं ति? |
| | क) द्वे वाणिजामित्ता अहेसुं। |

# ३) कम्मेनेव सिद्धि न नामेन

अतीते तक्कसिलायं बोधिसत्तो दिसापामोक्खो आचरियो हुत्वा पञ्चमाणवकसतानि मन्ते वाचेसि। तस्से माणवको पापको नाम नामेन। सो एहि पापक। याहि पापकाति वुच्चमानो चिन्तेसि-'मय्हं नामं अवमङ्गलं', अञ्ञं नामं मे आहरापेस्सामी'ति। सो आचरियं उपसङ्कमित्वा 'आचरिय! मय्हं नामं अवमङ्गलं अञ्ञं मे नामं करोथा' ति आह।

अथ तं आचरियो अवोच-'गच्छ तात!' जनपद-चारिकं चरित्वा अत्तनो अभिरुचितं एकं मङ्गलं नाम गहेत्वा एहि, आगतस्स ते नामं परिवतेत्वा अञ्ञ नाम करिस्सामि ति। सो 'साधू' ति पाथेय्यं गहेत्वा निक्खन्तो गामेनं गामं चरन्तो एकं नगर पापुणि। तत्थ एको पुरिसो कालङ्कतो जीवको नामेन। सो तं ञातिजनेन आलाहनं नीयमानं दिस्वा-'किं नामको नामेस्स पुरिसो'ति? पुच्छि जीवको 'नामेसोति'। जीवकोपि मरतीति। जीवकोपि मरति, अजीवकोपि मरति। नामनामं पण्णतिमत्तं। त्वं बालो मञ्ञेति।

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बोधिसत्व कोठे वास्तव्य करीत होते?

२) आचार्य किती विद्यार्थ्यांना शिकवित होते?

३) त्यामध्ये कोणत्या नावाचा विद्यार्थी होता?

४) पापक इकडे ये असे कोण बोलवत होते?

५) आचार्याकडे येवून पापक काय म्हणाला?

६) आचार्याने पापकाला काय सांगितले?

७) पापकाने कोणाच्या मृत्यूची बातमी ऐकली होती?

८) जिवकाच्या मरणानंतर पापकाला काय वाटले?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) तस्से माणवो पापको नाम नामेन।

२) मय्हं नामं अवमङ्गलं अञ्ञम्मे नाम करोथा ति।


३) तत्थं एको पुरिसो कालङ्कतो पापको नाम नामेन।

४) किं नामको नामेस पुरिसोति पुच्छि।

५) जीवकोपि मरति, अजीवकोपि मरति।

६) त्वं पण्डितो मञ्ञति।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) मय्हं नाम अवमङ्गलं | अ) त्वं बालो मञ्ञेति। |
| २) जीवकोपि मरति | ब) अञ्ञं मे नाम करोथा'ति। |
| | क) अजीवकोपि मरति। |

# ४) चीनदेसिय पवासि–युवानच्वांग

अतीते किर भारतस्स विज्जावन्ता पञ्ञावन्ता सब्बत्थ विस्सुता। तेन विविधेही देसेहि जना ञाणं लध्दं सिप्पं च विज्जा च सिक्खितुं एत्थ आगता।चीन देसस्स पि बहवो जना भारतदेसं आगता तेसु एको युवानच्वांग नामको। यदा जम्बुदिपे राजा हस्सवड्ढनो रज्जं कारेन्तो तदा कतिपयानि वस्सानि भारतदेसे वसित्वा सो चीनदेसं पहिनिवतो। हिमवतो उत्तरेन चीनदेसो वत्तति। ततो भारतदेसं आगत्वा यो अध्दा सो अतिविय कठिनो भयपरिपुण्णो च तस्मिं अध्दानि, उच्चा पब्बता च भयङ्करा गुहायो च विसाल नदियाच घोरानि अरञ्ञानि च होन्ति

भारतदेसे पाचिनकाले बहवो राजमग्गा होन्ति। तेहि अध्दानेहि तक्कसिला, वेसाली, राजगहं, पाटलिपुत्तं. सावत्थि, उज्जेनी, वाराणसी, पतिट्ठानं'ति विस्सुतानि नगरानि अञ्ञमञ्ञं सम्बन्धानि। तेसु अध्दानेसु दानरता राजानो विहारे च आरामे च पोक्खरनियो च भोजनसालायो च पथिगेहानि च निम्मिनित्वा पजानं कल्याणाय कम्मं अकरि ति करोन्ति ति युवानच्वांग पण्डितो लिखति।

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) युवानच्वांग कोणत्या देशातील प्रवासी होता?

२) तो भारतामध्ये का आला होता?

३) भारताचे प्राचीन नाव काय होते?

४) युवानच्वांग भारतात आल्यावर भारतात कोणता राजा राज्य करीत होता?

५) हिमालयाच्या उत्तरेला कोणता देश आहे?

६) युवानच्वांच्या प्रवासातील समस्या सांगा?

७) भारतात प्राचीनकाळी पुष्कळ काय होते?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) अतीते किर भारतस्स विज्जावन्ता पञ्ञावन्ता सब्बत्थ न विस्सुता।

२) यदा जम्बुदिपे राजा हस्सड्ढवनो रज्जं कारेति।


३) चीन रट्ठतोपि बहवो जना भारतदेसं न आगता।

४) विस्सुतानि नगरानि अञ्ञमञ्ञं सम्बधानि।

५) युवानच्वांग पण्डितो लिखति।

६) भारतदेसे पाचिन काले बहवो राजमग्गा होन्ति।

### ३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.




### ४. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) चीन | अ) हस्सवड्ढनो |
| २) जम्बुदिप | ब) युवानच्वांग |
| | क) विविधेहि |

# ५) सीहो च सकुणो च

अतीते वाराणसियं ब्रम्हदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो हिमवन्तपदेसे रूक्खकोट्ठकसकुणो हुत्वा निब्बति। अथेकस्स सीहस्स मंसं खादन्तस्स अट्ठि गले लग्गी। गलो उध्दुमायी, गोचरं गण्हितुं न सक्कोति खरा वेदना पवत्तति। अथ नं सो सकुणो गोचरप्पसुतो दिस्वा साखाय निलीनो, किं ते सम्म दुक्खं ति पुच्छि।

सो तं अत्थं आचिक्खि। अहं ते सम्म एतं अट्ठि अपनेय्यं, भयेन पन ते मुखं पविसितुं न विसहामि, खादेय्यासि पि मं, ति। मा भायि सम्म' ति जीवितं मे दे हि ति आह। तं वामपस्सेन निप्पज्जापेत्वा, यथा मुखं पिदहितुं न सक्कोति तथा तस्स अधरोट्ठे च उतरोट्ठेच दण्डकं ठपेत्वा मुखं पविसित्वा अट्ठिकोट्ठि तुण्डेन पहरि। अट्ठि मुखे निपति। सो अट्ठिं पातेत्वा सीहस्स मुखतो निक्खमन्तो दण्डकं तुण्डेन पहरित्वा पातेन्तो व निक्खमित्वा साखग्गे निलियि।

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) बोधिसत्व कोठे राहत होता?

२) सिंहाच्या गळ्यात काय अडकले?

३) सिंहाच्या गळ्यात हाड अडकल्याने काय होत होते?

४) सुतारपक्ष्याने सिंहाला काय विचारले?

५) सुतारपक्ष्याने सिंहाला काय म्हटले?

६) सुतारपक्ष्याने सिंहाच्या गळ्यातील हाड काढण्याकरिता काय केले?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) अथेकस्स सीहस्स मंसं खादन्तस्स अट्ठिं गले लग्गि।

२) गलो उध्दमायि, गोचरं गण्हितुं सक्कोति, खरा वेदना पवत्तन्ति।

३) सो तं अत्थं आचिक्खि।

४) मा भायि सम्म, नाहं तं खादामि, जिवीतं मे देहि ति।

५) यथा मुखं पिदहितु सक्कोति तथा तस्स अधरोट्ठे च दण्डकं ठपेत्वा मुखं पविसित्वा, अट्ठिकोटिं तुण्डेन पहरि।

### ३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.

पसु च सकुणो च नाम।

(रिकामे चौकट) (रिकामे चौकट)

### ४. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) अतीते वाराणसियं | अ) खरावेदना पवत्तति। |
| २) भयेन पन ते मुखं | ब) ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते। |
| | क) पविसितुं न विसहामि। |

## पज्जो विभागो

# १) सम्मापणिहितं चित्तं

न तं माता पिता कयिरा, अञ्ञे वा पि ञातका।
सम्मापणिहितं चित्तं, सेय्यसो नं ततो करे।।

दिसो दिसं यं कयिरा, वेरी वा पन वेरीनं।
मिच्छापणिहितं चित्तं, पापियो नं ततो करे।।

यथापि भमरो पुप्फं, वण्णगन्धं अहेठयं।
पलेति रसमादाय, एवं गामे मुनीचरे।।

न परेसं विलोमानि, न परेसं कताकतं।
अत्तनो व अवेक्खेय, कतानि अकतानि च।।

---

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) माणसाचे चांगल्या प्रकारे कोण मंगल करतो?

२) माणसाचे जास्त नुकसान कोण करते?

३) मुनीने गावात कसे वागावे?

४) भ्रमर फुलातील रस कसे ग्रहण करतो?

५) दुसऱ्याचे दोष न पाहता आपण काय करावे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) पलेति रसमादाय एवं गामे मुनीचरे।


२) अत्तनो व अवेक्खेय कताकतं।

३) सम्मापणिहितं चित्तं सेय्यसो नं ततो करे।

४) सम्मापणिहितं चित्तं पापीयो नं ततो करे।

५) न परेसं विलोमानि न परेसं कताकतं।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) सम्मापणिहितं चित्तं | अ) पापियो नं ततो करे। |
| २) पलेति रसमादाय | ब) एवं गामे मुनीचरे। |
| | क) सेय्यसो नं ततो करे। |

## २) पुण्णिका थेरी

''उदहारि अहं सीते, सदा उदकमोतरिं।
अय्यानं दण्डभयभीता, वाचादोसभयट्टिता।।

कस्स ब्राम्हण त्वं भीतो सदा उदकमोतरि।
वेधमानेहि गत्तेहि,सीतं वेदयसे भुसं'।।

'जानन्ती च तुवं भोति, पुण्णिके परिपुच्छसि।
करोन्तं कुसलं कम्मं, रून्धन्तं कम्मं पापकं।।

'को' नु ते इदमक्खासि, अजानन्तस्स अजानतो।
उदकाभिसेचना नाम, पापकम्मा पमुच्चति।।

सग्गं नून गमिस्सन्ति, सब्बे मण्डूककच्छपा।
नागा च सुंसुमारा च, ये च' ञ्ञे उदकेचरा।।

ओरब्भिका सूकरिका,मच्छिका मिगबन्धका।
चोरा च वज्झघाता च, ये चञ्ञे पापकम्मिनो।
उदकाभिसेचना ते पि, पापकम्मा पमुच्चरे।।

---

### स्वाध्याय


**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पुण्णिका कोणते काम करीत होती?
२) कोणाच्या भीतीने ती थंडीतही काम करीत असे?
३) पुण्णिकेने ब्राम्हणास कोणता प्रश्न विचारला?
४) पापकर्मी कोणास म्हटले आहे?
५) कोणते कर्म करावयास पुण्णिकेने ब्राम्हणास सांगितले?
६) पापकर्म कशाने नष्ट होतात?
७) या पद्यामध्ये कोणाकोणामध्ये संवाद झाला आहे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अय्यानं दण्डभयभीता,वाचादोसभयट्टिता।
२) करोन्त अकुसलं कम्मं, रून्धन्तं कम्मं पापकं।
३) को नु ते इदमक्खासि, अजानन्तस्स अजानतो।
४) वेधमोहि गत्तेहि, उण्हं वेदयसे भुसं।
५) कस्स ब्राह्मण त्वं भीतो सदा उदकमोतरि।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) उदहारी | अ) गमिस्सन्ति। |
| २) सग्गं नून | ब) पापकम्मिनो। |
| | क) अहं सीते। |

# ३) चंपा नगरी

एसा चम्पा नाम नगरी अत्थि।
तत्थ एको आचरियो वसति।।

तस्स सन्तिकं बहवो मानवका अज्झयनं करोन्ति।
सुनितो नामं बुध्दिमन्तो माणवको अत्थि।।

सो विविधेसुं विसयेसु पारंगतो होति।
सुनितो राजगहे पितु सन्तिकं गच्छति।।

तत्थ तस्स विसाखा नाम भगिनी अत्थि।
सुनितो च विसाखा च सायं समये विहारं गच्छन्ति।।

तत्थ तानि बुध्दं वन्दन्ति, थुति च गायन्ति।
सुनितो च विसाखा च, बुध्दं धम्मं च संङ्घं च सरणं गच्छन्ति।।

---

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आचार्य कोणत्या नगरीत राहत होते?

२) आचार्याजवळ विद्यार्थी कशाकरीता येत असत?

३) सुनित नावाचा विद्यार्थी कसा होता?

४) सुनित एकदा कुठे गेला होता?

५) सुनित कोणाच्या जवळ गेला होता?

६) सुनितच्या बहिणीचे नाव काय आहे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) एसा चम्पा नाम नगरी नत्थि।


२) विसाखा नामं बुध्दिमन्तो माणवको अत्थि।

३) सुनितो राजगहे पितु सन्तिकं गच्छति।

४) तत्थ तस्स विसाखा नाम भगिनी अत्थि।

५) सुनितो च विसाखा च सायं समये विहारं गच्छन्ति।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) तत्थ एको | अ) माणवको अत्थि। |
| २) सुनितो राजगहे | ब) आचरियो वसति। |
| | क) पितुं सन्तिकं गच्छति। |

# ४) पराभव सुत्त

सुविजनो भवं होति, सुविजानो पराभवो।
धम्म कायो भवं होति, धम्मदेसी पराभवो।।

निद्दासीली सभासीली,अनुट्ठाता च यो नरो।
अलसो कोधपञ्ञाणो, तं पराभवतो मुखं।।

यो मातरं वा पितरं वा, जिण्णकं गतयोब्बनं।
पहु सन्तो न भरति, तं पराभवतो मुखं।।

जातित्थध्दो,धनत्थध्दो, गोत्तत्थध्दो च यो नरो।
सञ्ञातिं अतिमञ्ञेति, तं पराभवतो मुखं।।

इत्थिधुतो सुराधुतो,अक्खधुतो च यो नरो।
लध्दं लध्दं विनासेति, तं पराभवतो मुखं।।

इत्थिं सोण्डिं विकिरणिं, पुरिसं वा पि तादिसं।
इस्सरियस्मिं ठापेति,तं पराभवतो मुखं।।

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणता पुरुष सहजतेने ओळखता येतो ?

२) धर्मद्वेषी पुरुषाचे काय होते ?

३) आळशी व्यक्तीच्या अधोगतीचे कारण कोणते ?

४) आईवडीलांचे पालन पोषण न करण्याने काय होते ?

५) कोणती स्त्री अद्योगतीचे कारण होऊ शकते ?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) धम्म कायो भवं होति, धम्मदेसी पराभवो।


२) पहु सन्तो भरति, तं पराभवतो मुखं।

३) सञ्ञातिं अतिमञ्ञेति तं पराभवतो मुखं।

४) इत्थिं सोण्डि विकिरणी, पुरिसा वा पि तादिसं

५) अलसो कोधपञ्ञाणो, तं पराभवतो मुखं।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) निद्दासीली सभासीली | अ) गोत्तत्थद्धो च यो नरो। |
| २) जातित्थद्दो धनत्थद्धो | ब) अक्खुधुतो च यो नरो। |
| | क) अनुट्ठाता च यो नरो। |

# ५) गोतमचरियं

हिमवन्तं पस्सतो,कोसलेसु निकेतिनो।
साकिया नाम जातिया, धनविरियेन सम्पन्ना।।

तस्स सकियानं गामे, जनपदे लुम्बिनीवने।
बोधिसत्तो मनुस्सानं हितसुखाय जातो।।

सो सब्बस्स अत्थस्स, सिद्धी कत्ता' ति।
तस्स सिद्धत्थ नाम अकंसु।।

तस्स महेसिनो सुद्धोदन नाम पिता।
बुद्धस्स माता पन नामो महामया।।

मगधेसु उरुवेलायं, बोधिमूले महामुनी।
वेसाखपुण्णिमायं सो, पत्तो सम्बोधिमुत्तमं।।

कुसिनारायं यमकसालानं अन्तरे वने।
वेसाखपुण्णमाय सो, दीपो लोकस्स निब्बुतो ।।

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हिमवंत प्रदेशाजवळ कोणते धनसंपन्न राज्य होते ?

२) सिध्दार्थाचा जन्म कोणत्या ठिकाणी झाला ?

३) बोधिसत्वाचा जन्म कशासाठी होतो ?

४) सिद्धार्थास ज्ञानप्राप्ती कोणत्या पौर्णिमेला झाली ?

५) सिद्धार्थास ज्ञानप्राप्ती कोणत्या ठिकाणी झाली ?

६) बुद्धाचे महापरिनिर्वाण कोणत्या ठिकाणी झाले ?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) तस्स महेसिनो सुध्दोदन नाम पिता।


२) कोलिया नाम जातिया,धनविरियेनसम्पन्ना।

३) बोधिसत्तो मनुस्सानं अहितसुखाय जातो।

४) मगधेसु उरुवेलायं बोधिमूले महामुनी।

५) तस्स राहूलो नाम अकंसु।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) तस्स सकियानं गामे | अ) नाम अकंसु। |
| २) तस्स सिध्दत्थ | ब) जनपदे लुम्बिनीवने। |
| | क) कोसलेसु निकेतिनो। |

☆☆☆

# परिसिट्ठं पञ्च– कथापुत्ती (कथापूर्ती)

## १) बकजातकं

अतीते एकस्मिं अरञ्ञायतने....... अञ्ञतरं पदुमसरं निस्साय ठिते ....... हुत्वा निब्बति। तदा अञ्ञतरस्मि नातिमहन्ते सरे निदाघसमये ......... मन्दं अहोसि, बहु चेत्थ मच्छ होति। अत्थेको.........ते मच्छे दिस्वा, एकेन उपायेन इमे.......वञ्चेत्वा खादिस्सामी, ति गन्त्वा उदकपरियन्ते चिन्तेन्तो निसिदी। अथ तं मच्छा। किं अय्य चिन्तेन्तो निसिन्नोसी, ति पुच्छिसु। तुम्हाकं........ निसिन्नोम्ही' ति। अम्हाकं किं चिंतेसी......,ति। इमस्मिं सरे उदकं परित्तं,गोचरो च मन्दो.......च महन्तो इदानिमे मच्छा किं नाम करिस्सन्ति ति तुम्हाकं चिन्तेन्तो..........ति।

(रुक्खदेवता, बोधिसत्तो, बको, उदकं ,दिस्वा, मच्छे, अय्या, चिन्तेन्तो, निसिन्नोम्ही, निदाघो)

## २) नक्खतजातकं

अतीते वाराणसियं ब्रह्मदत्ते ....... कारेन्ते। नगरवासिनो जनपदवासिनं ....... वारेत्वा दिवसं ठपेत्वा अत्तनो कुलूपकं ......... पुच्छिंसु–भन्ते। अञ्ञ अम्हाकं एका ..........सोभनं नु खो.......न्ति? सो इमे अत्तनो रूचिया ........ ठपेत्वा इदानि मं पुच्छन्ती ति......अञ्ञ नेसं मङ्गलन्तरायं.........ति चिन्तेत्वा....... अज्ज नक्खन्तं। सचे करोथ..........पापुणिस्सथाति। ते तस्स सद्दहित्वा नागमिंसु।

(धीतरं, रज्जं, मङ्गलकिरिया, आजीविकं, दिवसं, नक्खत्तं, कुज्झित्वा, असोभनं, करिस्सामी, महाविनासं)

## ३) कलहो हि विनासमुलो

अतीते .......... ब्रम्हदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो ..... निब्बतित्वा अनेक वट्टकसहस्स......... अरञ्ञे वसति। तदा एको वट्टकलुद्दको तेसं....... गन्त्वा वट्टकवस्सिकं कत्वा तेस ....... ञत्वा,तेसं उपरि जालं खिपित्वा, परियन्तेसु.......... सब्बे एकतो कत्वा पच्छि पुरेत्वा, घरं गन्त्वा, ते विकिणित्वा, तेन मूलेन.......कप्पेति। अथेकदिवसं....... ते वट्टके आह अयं साकुणिको अम्हाकं..........विनासं ञातके,अहं एकं उपायं.......।

(जीविकं, परिवारो, वाराणसियं, महन्तो, जानामि, वट्टकयोनियं, वसनट्ठानं,सन्निपतितभाव, ञातके, बोधिसत्तो.)

## ४) सीलविमंसनं


''अतीते वाराणसियं.........रज्जं कारेन्ते बोधिसत्तो.......... निब्बतित्वा वयप्पतो तथेव दिसापामोक्खस्स सन्तिके......... माणवकसत्तानं जेट्ठो हुत्वा सिप्पं......।आचरियस्स वयप्पत्तधीता..........। सो चिन्तेसि इमेसं माणवकानं सीसं ...........सीलसम्पन्नस्सेत...........'' ति। सो एकं दिवसं.........आमन्तेत्वा 'ताता, मय्हं.......... वयप्पता विवाहं अस्सा कारेस्सामि............लध्दुं वट्ठति।

(विमंसित्वा, अत्थि, माणवके, वत्थलङ्कारं, बह्मदत्ते, उग्गण्हि, बाह्मणकुले, दस्सामि, धीता, पञ्चन्न)

☆☆☆


# परिसिट्टं छ – धम्मलिपी

## स्वर वर्ण




| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अः |


## व्यंजन वर्ण



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ | च | छ | ज | झ | ञ | ट | ठ |




| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ड | ढ | ण | त | थ | द | ध | न | प | फ | ब | भ |




| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | य | र | ल | व | श | ष | स | ह | क्ष | त्र | ज्ञ |

क का कि की कु कू के कै को कं



ख खा खि खी खु खू खे खै खो खं




ग गा गि गी गु गू गे गै गो गं




घ घा घि घी घु घू घे घै घो घ



च चा चि ची चु चू चे चै चो चं




छ छा छि छी छु छू छे छै छो छं




ज जा जि जी जू जु जे जै जो जं



झ झा झि झी झु झू झे झै झो झं




ट टा टि टी टु टू टे टै टो टं




ठ ठा ठि ठी ठु ठू ठे ठै ठो ठं




ड डा डि डी डु डू डे डै डो डं



ढ ढा ढि ढी ढु ढू ढे ढै ढो ढं




ण णा णि णी णु णू णे णै णो णं




त ता ति ती तु तू ते तै तो तं




थ था थि थी थु थू थे थै थो थं




द दा दि दी दु दू दे दै दो दं



ध धा धि धी धु धू धे धै धो धं



न ना नि नी नु नू ने नै नो नं




प पा पि पी पु पू पे पै पो पं




फ फा फि फी फु फू फे फै फो फं



ब बा बि बी बु बू बे बै बो बं



भ भा भि भी भु भू भे भै भो भं




म मा मि मी मु मू मे मै मो मं




य या यि यी यु यू ये यै यो यं



र रा रि री रु रू रे रै रो रं



ल ला लि ली लु लू ले लै लो लं




व वा वि वी वु वू वे वै वो वं




श शा शि शी शु शू शे शै शो शं




ष षा षि षी षु षू षे षै षो षं



स सा सि सी सु सू से सै सो सं



ह हा हि ही हु हू हे है हो हं



# परिसिट्ठं सत्त– पालि भाषेचे महत्त्व

भाषा ही देवाणघेवाणीचे साधन आहे. एकमेकांचे विचार, भावना व्यक्त करण्याचे माध्यम आहे. बोली भाषा म्हणजे सर्वसामान्यांना समजणारी, रोजच्या व्यवहारात बोलली जाणारी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना समजणारी भाषा होय. प्राचीन भारतात पालि ही बोलीभाषा होती. त्यामुळे बुद्धांनी जेव्हा धम्म शिकवायचे ठरविले तेव्हा त्यांनी तो सर्वांना समजावे म्हणून तो पालि भाषेत म्हणजेच सर्वसामान्यांच्या भाषेत दिला.

धम्म म्हणजे निसर्गाचा नियम. आपण ज्या सृष्टीत राहतो त्यात घडणाऱ्या घडामोडींचे कारण माहित होणे म्हणजेच ज्ञान प्राप्त होणे असे समजायला हकरत नाही. बुद्धाला जेव्हा सर्व गोष्टींचे ज्ञान प्राप्त झाले तेव्हा त्यांनी ते इतरांना समजून सांगितले, ज्याला आपण धम्म म्हणतो. उदाहरणार्थ आगीचा धम्म आहे जळणे आणि जाळणे. जगात कुठेही असली तरी आग जाळणार आणि जळणारच. मनात आलेला राग, द्वेष तिरस्कार ही सुद्धा आगच आहे, ती आपल्यालाच जाळणार हे सत्य आहे. कारण तो निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे आपल्याला जळायचे नसेल तर आग पेटवायची नाही, पेटली की जळणार आणि जाळणारच. असे सत्य आणि निसर्गाचे नियम जेव्हा बुध्द सोप्या रीतीने, गोष्टींमधून , उपमा देऊन समजून सांगतात त्यालाच धम्म म्हणतात.

बुद्ध जवळ जवळ ४५ वर्षे धम्म शिकवीत फिरत होते, मिळालेले ज्ञान अत्यंत करूणेने सर्वांना वाटत होते. आपल्याला आता जर बुध्दाने काय शिकविले हे समजून घ्यायचे असेल तर आपल्याला पालि भाषा आली पाहिजे, कारण बुद्धाने ते ज्ञान पालि भाषेत सांगितले आहे आणि म्हणून पालि भाषा शिकणे महत्त्वाचे आहे. मनात साठवून जोपासले पाहिजे, कारण ते प्रत्येकाला उपयोगी तर होतेच शिवाय दुक्खातून देखील मुक्त करीत होते. गमतीची गोष्ट म्हणजे बुध्द धम्म देताना तो सर्वांना लक्षात राहावा म्हणून गोष्टींतून, उपमा सांगून, विविध प्रकारे पाठांतर करून घेऊन लक्षात ठेवायला मदत करायचे. त्यामुळे बोलीभाषेतील हा धम्म सर्वजण समजू शकत तर होतेच पण ते लक्षात ठेवून अनुभवही करू शकायचे. अनुभवयाचे ज्ञान कसे काय विसरता येईल?

उदाहरण द्यायचे झाले तर आपण सर्वांत सोपे उदाहरण घेऊ या. सर्वांनी कमळाचे फुल तर पाहिले असेलच. जेव्हा सर्वजण बुध्दाला विचारायचे की भन्ते! तुम्हांला ज्ञान प्राप्त झाले, तुम्ही बुद्ध झाले म्हणजे काय झाले? बुद्धाने समजवून सांगितले. सांगतांना ते विचारतात की तुम्ही कमळाचे फुल पाहिले का? सर्व म्हणाले– होय. ते कुठे उगवते? चिखलात. फुलाला चिखल लागलेला असतो का? नाही. त्याच्या पानांवर, पाकळ्यांवर पाण्याचा थेंब सुद्धा थांबत नाही आणि ते चिखलातून वर येते, सुंदर असते, तसाच मी आहे. हे जीवन जरी आपल्याला चिखलात मिळाले असले तरी आपण चिखलातल्या कमळासारखे असायला हवे. म्हणून प्रत्येकानी दुक्खातून, दुक्खाच्या चिखलातून वर यायचे आहे, दुक्ख आपल्याला चिटकू द्यायचे नाही. अशी सुंदर उपमा देऊन बुद्धाने सांगितल्यावर सामान्यांना कळणार नाही असे होणारच नाही.

त्यामुळे सर्वजण बुद्धाचा धम्म अनुसरत आणि आपल्या दुक्खातून बाहेर येत. आपला फायदा झाला, आपण दुक्खातून बाहेर पडलो. दुसऱ्याचा देखील फायदा व्हावा, तो देखील त्याच्या दुक्खातून बाहेत

पडावा, असे प्रकर्षाने वाटायला लागते आणि त्यामुळे धम्माचा प्रचार-प्रसार दूर दूरपर्यंत झाला. धम्म पालि भाषेत असल्यामुळे पालि भाषा देखील दूर दूरपर्यंत पोहोचली. धम्माची भाषा म्हणून पालि भाषाच ओळखली जाऊ लागली. धम्म सांभाळून ठेवणारी भाषा म्हणजे पालि असाही तिचा अर्थ झाला.

कालांतराने भाषेमध्ये बदल होत गेले. जवळ जवळ दोन हजार वर्षानंतर बोलली जाणारी पालि आजची मराठी झाली, बंगालमधली बंगाली झाली, गुजरात मधली गुजराती झाली आणि अशा प्रकारे मूळ पालि भाषा परिवर्तित होऊन काळाच्या विस्मृतीच्या पडद्या आड गेली; परंतु बुद्धाचा धम्म असल्यामुळे २५०० वर्षापूर्वीची पालि त्यांच्या शिष्यांनी जतन करून तशीच ठेवली. सम्राट अशोकाने त्याच भाषेत ब्राम्ही लिपीत शिलालेख लिहून तिला लिपिबध्द देखील केले. जसे गुरु – शिष्य परंपरेनुसार मुखोदगत करून पिढ्यानपिढ्या बुद्धांचा धम्म जपला गेला तशीच पालि भाषाही जपली गेली.

दुर्दैवाने भारतातून बुद्धाचा धम्म लयाला गेला. भाषा विसरली गेली आणि लिपी वाचता येईनाशी झाली. परंतु श्रीलंका, म्यानमार सारख्या आपल्या शेजारच्या देशांनी बुद्धाच्या धम्मासह पालि भाषेचे जतनच केले नाही तर ती भाषा जोपासली, वाढवली आणि दूरवर पसरवली. जगभरातील बौद्ध राष्ट्रांमध्ये अभ्यासली जाणारी पालि भाषा भारतात मात्र परकी आणि नवीन भाषा असल्यासारखी वाटते. पण आपण हे विसरायला नको की पालि भाषा ही आज भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषांच्या आदिभाषेसारखी आहे आणि त्यामुळे आपल्याला खूप जवळची आहे. ऐकताना ओळखीची वाटते आणि कित्येक शब्द तर अगदी बोली भाषेतील वाटतात.

पण पुन्हा प्रश्न पडतो की आता पालि भाषाच कशाला शिकायची? पालि भाषेतील बुद्धाचा धम्म तर इंग्रजीतून, मराठीतून सुद्धा शिकता येतो, समजून घेता येतो. मग पालि भाषाच का शिकायची किंवा जगभरातील लोक आता २५०० वर्षापूर्वीची भाषा कशाला शिकतात किंवा बोलतात किंवा अभ्यासतात? तर त्याचे उत्तर असे आहे की बुद्धाने जो धम्म दिला, जे ज्ञान दिले ते जितके सखोल, सूक्ष्म, गंभीर आहे तितकेच सोपे, सुंदर आणि अतुलनीय आहे, परंतु ते ज्ञान जगातील कोणत्याही भाषेत योग्यप्रकारे भाषांतरीत करता येत नाही. कारण जगभरातील कोणत्याही भाषेत तो शब्दच राहतो त्याचे भाषांतर करता येत नाही ज्याला, ज्ञान प्राप्त झाले, तो अशी त्या शब्दाची व्याख्या करता येते पण भाषांतरित करता येत नाही. त्यामुळे जगातील सर्व भाषेत बुद्धच म्हणतात. संपूर्ण पालि भाषा अशीच असल्यामुळे भाषांतरात फार चुका होतात.

अजून एक उदाहरण बघूया, 'भग्ग रागो, भग्ग दोसो, भग्ग मोहो ति भगवा,' ही पालि भाषेतील भगवा ह्या शब्दाची व्याख्या मराठीतून समजल्यासारखी वाटते. असं वाटतं की सोप तर आहे. ज्याने आपला राग, दोष आणि मोह भग्न केला तो भगवा. पण ते चुकीचे आहे. पालि मधील राग आणि मराठीतील राग यामध्ये जमीन –अस्मानाचा फरक आहे. पालितील राग म्हणजे मराठीतील लोभ, मोह किंवा आसक्ति तसेच पालितील दोस म्हणजे तिरस्कार, प्रचंड द्वेष आणि मोह म्हणजे अज्ञान, अविद्या किंवा अंधार आणि भग्ग म्हणजे नष्ट करणे, फक्त तोडणे नव्हे.

अजून एक महत्त्वाची गोष्ट पालि भाषेतील शब्दांमध्ये आहे आणि ते म्हणजे पटिवेदन अर्थात अनुभव. पालितील प्रत्येक शब्दाचा अनुभव करता यतो जो इतर भाषांतरित शब्दाचा करता येईलच असे नाही. त्यामुळे मूळ पालि भाषा शिकणे सोपे आहे. 'पा पालेति, रक्खती ति पालि' अर्थात जी पालन करते, रक्षण करते ती पालि. बुद्धवचनांचे पालन करते, रक्षण

करते म्हणून पालि.

पालि तिपिटकामध्ये तथागत बुद्धाच्या त्या काळातील चारिकांचा विस्तारने उल्लेख आलेला आहे. अगं, मगध, कासी, कोसल, वज्जी, मल्ल, चेदि, वत्स, कुरु, पांचाळ, मत्स, सौरसेन, अस्मत, अवंती, गांधार, आणि कंबोज या सोळाही जनपदांमध्ये तथागतांनी विचरण केल्याचे आणि पालि भाषेमधून उपदेश केल्याचे उल्लेख आपल्याला पालि साहित्यात आढळून येतात, म्हणजे तथागत बुद्ध जिथे- जिथे जात तिथे तिथे ते पालिमध्येच उपदेश देत असत आणि तेथील लोक सुध्दा तथागत बुद्धांच्या उपदेशांना ऐकत असत, समजून घेत असत व ग्रहण करीत असत.

तथागतांनी स्वतः पहिल्यांदा कुठे बौद्धिक विकास केला, त्यांनी उच्चतम अशा स्वरूपाचे ज्ञान प्राप्त केले, विशुद्ध आचरण केले, त्यांनी आपल्या मनातील सर्व विकारांना नाश करून संपूर्ण मानवतेप्रति प्रेम, दया, करूणा, मैत्री, मुदिता, उपेक्षा, मानवी संवेदनशिलता निर्माण करून लोकांना दुक्ख मुक्तीवर मार्ग सांगितला. ते आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी बुद्धत्वाला प्राप्त करून निरंतर ४५ वर्षापर्यंत आपल्या धम्म विचारांचा उपदेश लोकांना देत राहिले. त्यांचा तो उपदेश म्हणजेच पालि साहित्य होय, तिपिटक साहित्य होय.

पालि भाषेचा जर आपल्याला अभ्यास करावयाचा असेल तर तो तीन अंगांनी करता येतो, तो म्हणजे - परियत्ति, पटिपत्ति व पटिवेदन. परियत्ति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे. पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा, विचार-विमर्श करणे आणि पटिवेदन म्हणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे पालिमधील शब्दांची असे तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही, तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

पालि भाषेच्या अध्ययानाच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब ही की, इतर भाषांचा अभ्यास हा गद्य, पद्य, नाटक, कथा- कथन इत्यादी पुरताच मर्यादित असतो; परंतु पालि भाषेचा अभ्यास आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करू शकतो. पालि भाषा ही आपल्याला नऊ अंगांनी शिकता येते, तिला 'नवांगसत्थुसासन' असे सुद्धा म्हणल्या गेलेले आहे. ते म्हणजे -

१) सुत्त २) गेय्य ३) वेय्याकरण ४) गाथा
५) उदान ६) इतिवुत्तक ७) जातक
८) अब्भूतधम्म आणि ९) वेदल्लं (जाणून घेणे).

म्हणून पालि शिकण्याकरिता वेगवेगळी दालने उपलब्ध आहेत. आज पालि साहित्य सुद्धा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

पालि भाषा शिकण्याच्या दृष्टीने व समजण्याच्या दृष्टीने सोपी आहे. मोग्गलायन व्याकरणानुसार पालि भाषेमध्ये अक्षरांची संख्या ४३ आहे व कच्चायन व्याकरणनुसार ४१ आहे. मोग्गलायन व कच्चायन व्याकरणामध्ये अक्षरांच्या संख्येमध्ये हा जो फरक पडलेला आहे, तो पालिमधील व्यंजन संख्येमध्ये नसून पालिमधील स्वरांच्या संख्येमध्ये आहे. या भाषेमध्ये व्याकरण सूत्रांची संख्या सुद्धा ७००/८०० पेक्षा जास्त नाही. म्हणून आधुनिक भाषाशास्त्राच्या दृष्टीने सुद्धा या भाषेला फार महत्त्व आहे.

पालि भाषेचा अभ्यास करताना पालि भाषा ही मराठी, हिंदीच्या जवळची आहे असे जाणवते. व्याकरणाचा भाग सोडून दिला तर अनेक शब्द मराठी-हिंदी भाषेमध्ये पहायला मिळतात. उदा. सदा, परम, सुकर, अहित, यदा-कदा, अङ्गार, सीत, थूल, अङ्गुली, वेसभूसा, जननी, मुट्ठी, नगर, नुतन इत्यादी. पालि भाषा अधिक सोपी करावयाची असेल तर पालिमधील शब्द आपण मातृभाषेत बोलतांना रूढ केले पाहिजे. उदा. प्रमुख-पमुख, निर्वाण-निब्बान, दुर्लभ - दुल्लभ, वर्ष - वस्स, अग्नि-अग्गि, सर्व-

सब्ब, नित्य-निच्च, पुस्तक-पोत्थक, विद्यालय - विज्झालय, क्लेश-किलेस, औषध-ओसध, मार्ग-मग्ग इत्यादी. म्हणून पालि भाषा शिकतांना सर्वप्रथम ती भाषा काय आहे? ती आपल्याला कशा पद्धतीने बोलता येईल? ती व्यवहारामधील बोलचालची भाषा कशी होईल? यादृष्टीने पालि भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण पालि व्याकरणाच्या अभ्यासाच्या दृष्टीने सुद्धा पालि भाषेची स्वतंत्र व्याकरण परंपरा आहे. प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत बौद्ध संस्कृती, तत्वज्ञान, इतिहास, जीवनमूल्ये समजून घेण्याच्या दृष्टीने पालि भाषेचे फार महत्व आहे. प्राचीन भारताचा इतिहास, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, भूगोल, सांस्कृतिक देवाण-घेवाण, भूभाग इत्यादींना समजून घेण्याच्या दृष्टीने सुद्धा पालि भाषेच्या अध्ययनाचे महत्व आहे.

मानवी जीवनात निर्माण होणारी दुक्ख हे आपल्या अज्ञानामुळे अविचारामुळे निर्माण होतात. प्रज्ञाबुद्धीने, विवेकबुद्धीने न वागल्यामुळे निर्माण होतात, पालि भाषेमधील हा धम्मविचार इहवादाला स्विकारणारा आहे, मानवतावाद निर्माण करणारा आहे.

पालि हा विषय इयत्ता आठवीपासून तर पदवी, पदवीव्युत्तर पर्यंत शिकविला जातो. तसेच या विषयात संशोधनही केले जाते. दिवसेंदिवस या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे दिसत आहे. सध्या हा विषय महाराष्ट्रामधील अनेक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये शिकविला जातो. यामध्ये प्रामुख्याने मुंबई, पुणे, नागपूर, गडचिरोली, अमरावती, औरंगाबाद, सोलापूर, नांदेड इत्यादी विद्यापीठांमध्ये शिकविला जातो. या विद्यापीठांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे जाणवते. याचे कारण हे आहे, की या विषयामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही जीवनमूल्ये, सामाजिक मूल्ये शिकविली जातात. त्यामुळे प्रत्येकाला शिकविताना या विषयाचे महत्त्व सांगताना हा विषय संविधानिक पद्धतीने सांगता येतो. यामुळे असे म्हणता येईल की, पालि विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये भारतीय संविधानिक मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने सुद्धा अतिशय महत्त्वाचा विषय आहे.

पालि विषयाच्या या महत्त्वामुळेच आज हा विषय आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेला आहे. भारतातील विविध विभागीय शिक्षण मंडळ (एस. एस.सी, एच.एस.सी.) तसेच अनेक विद्यापीठांमध्ये हा विषय शिकविला तर जातोच, परंतु जगातील अनेक देशांमध्ये सुद्धा हा विषय शिकविला जातो. तिसऱ्या संगितीपासून याची सुरुवात झाली. आज या भाषेचा अतिशय मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार देश-विदेशांत होत आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रीलंका, थायलंड, बांगला देश, चीन, जपान, कंबोडिया, म्यानमार इत्यादी अनेक देशांचा उल्लेख करता येईल.

☆☆☆




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

पालि पकासो, इयत्ता बारावी

₹ 102:00